म. ग्रं. सं. ठाणें
विषय
संग्रहालय क्रमांक
लेखक
पुस्तकाचें नांव हेमंत व्याख्यान माला हिंदू युनियन क्लब
सन

८०

हेमंतव्याख्यान माला
हिंदू युनियन क्लब
(धर्म)

म. ग्रं. सं. ठाणें
य धर्म
नं. २४८
१८८८

# 'हिंदु यूनियन् क्लब्'

नामक मंडळीच्या आश्रयाखालीं आरंभिलेली

## हेमंतव्याख्यानमाला-वर्ष चौथें.

व्याख्यान दुसरें.

विषय

## ब्राह्मण व ब्राह्मणीधर्म किंवा वेद व वैदिकधर्म.

व्याख्यानकार,

## राजाराम रामकृष्ण भागवत

पुणें
"आर्यभूषण" छापखान्यांत छापिलें.

१८८९

किंमत ४ आणे.

2..०

स.ध १८

# ब्राह्मण व ब्राह्मणधर्म किंवा वेद व वैदिकधर्म.

## १–ब्राह्मण शब्दाची व्युत्पत्ति व जुनाटपणा.

ब्राह्मण शब्दाचा मुळचा अर्थ "ब्रह्म जाणणारा" ण आहे. "ब्रह्म" शब्द "बृहि=विस्तारे" या ासून आला, असें समजतात. तेव्हां जें वस्तार पावत गेलें," यज्ञादिक कर्मांवर विशेष ा ठेवणाऱ्या "ऋषी" पासून तें "ब्रह्म" ा "ब्रह्म" शब्दाचा अर्थ झाला. सारांश, ब्रह्म" म्हणजे यज्ञास लागणारा मंत्रसमूह. हा मूह जो अध्ययन करी तो ब्राह्मण,–हा ब्राह्मण चा मुळचा अर्थ. "ब्रह्माऽधीते वेद वा ब्रा- तर्कंश व्याकरणमधीते वेद वा वैयाकरणः।" कूल शब्दांतील "अ" प्रत्यय मुळचा स्वार्थी व वि...ता येईल. जें "विभव" तेंच ...' त्याप्रमाणें जें मुळचें "ब्रह्मन्" तेंच कालें ब्राह्मणशब्दाभिधेय झालें. जे यज्ञयागादिक नाहीत, त्यास समूहार्थी "ब्रह्मन्" शब्द लाव- दी... ब्रह्मन्" शब्द कालेंकरून "ब्राह्मण" शब्द... "ब्रह्मन्" शब्द जसा मुळचा नपुंसकलिंगी, फार... ब्राह्मण" शब्दही नपुंसकलिंगीचहोता. वेदाच्या ...स "ब्राह्मण" असा शब्द लावण्यांत येतो "...लिंगीच असतो. समूहवाचक नांवें अका- द... असतात, तीं प्रायः नपुंसकलिंगी असतात, "...कृत वैयाकरणांचा सिद्धान्त आहे. तेव्हां ब्रा...किंवा "ब्राम्हण" हा शब्द मुळचा जातिवाच ती,... पुल्लिंगी व्यक्तीस लावण्यांत येई, तेव्हां के..." किंवा "ब्राम्हण" असा व स्त्रीलिंगी ...लावण्यांत येई तेव्हां "ब्राम्हणी असा चा प्रयोग होऊं लागला.

...द्धांच्या व जैनांच्या धर्मग्रंथांत "ब्राम्हण" शब्द ...थी य...मा लिहिलाजातो. हा प्राकृतांतील "माह- ...ाम्हण शब्दांतील "म्हण" या दुसऱ्या अ- अल... रूपसमजण्यास हरकत नाहीं. पण प्राकृत ...त "ब्रा"चा पत्ता लागत नाहीं. या कोटीचा विचार करतां "ब्रम्हन्" किंवा "ब्राम्हण" हा शब्द मुळ- चा सिद्ध नसून सामासिक होता, अशी शंका येते. या सामासिक शब्दाचा जो अंत्यावयव होता, त्याचें "माहण" असें प्राकृतांत रूप झालें व पूर्वावयव होता, तो संमानार्थक किंवा अशाच दुसऱ्या अर्थाचा वाच- क असल्यामुळें प्राकृतांत गाळून टाकण्यांत आला. पूर्वावयव असल्यास तो "वर"=उंचा या अर्थाचा होता कीं "बृहत्"=मोठा या अर्थाचा होता, हें ठरविणें थोडेंसें जोखिमाचें काम आहे. "माहण" शब्दा- चा अर्थ मुळचा "पूज्य" असावा, कारण "मह" हा पूजार्थक धातु संस्कृतांत बराच प्रसिद्ध असून याच धातूपासून "महत्" हा शब्द निघाला आहे. या- प्रमाणें मुळचे अवयव कल्पिल्यास "अतिशय पूज्य" असा मुळच्या शब्दाचा अर्थ असावा.

संहितेंत "ब्रम्हन्" शब्द प्रायः मंत्रवाचक येतो. "ब्रम्हवादिनो वदंति" असें ब्राम्हणांत जागोजागीं येतें. "ब्रम्हवादी" शब्दांत "ब्रम्ह" शब्दाचा अर्थ यज्ञांत उपयोगीं पडणारे "मंत्र" असाच केला पाहिजे. "ब्रम्हण" शब्दही संहितेमध्यें आढळतो. तेव्हां श्रौत काळाच्या पूर्वी "माहण" शब्दाची प्रकृति विद्यमान असावी. श्रौत काळीं व श्रौतकाळापासून "ब्रम्हन्" किंवा "ब्राम्हण" याच शब्दाचा प्रयोग जात्यर्थी होत असे, तो हल्लींही तसाच होत असतो.

ब्राम्हण शब्द लाटिन भाषेंत फ्लामेन (Flamen) झालेला आढळतो. लाटिन भाषेंत "फ्लामेन" शब्दा- चा अर्थ पुजारी होतो. आपले ब्राम्हण हेही मुळचे त्या त्या देवतेचे पुजारी होत.

## २–ब्राह्मणांचा मुळचा मुलूख.

सर्व स्मृतींमध्यें मनुस्मृति आद्य व वेद वाक्या- च्या मातब्बरीची मानितात. "जें कांहीं मनूनें सां- गितलें आहे, तें औषधासारखें" (हितकारक) अशा अर्थाची श्रुति सुप्रसिद्ध आहे. सरस्वती व दृषद्वती या दोन "देवांच्या नद्या" व या "देवांच्या नद्यांम- धील जो मुलुख त्याचें नांव ब्रम्हावर्त" असें मनु म्हणतो. "ब्रह्म"=ब्राम्हण व "आवर्त"=मुलुख "आ- वर्त" या शब्दाचा "मुलूख" या अर्थी प्रयोग झालेला एका आर्यावर्त शब्दांत मात्र आपण पहातो. आर्या- वर्त=आर्यांचा मुलूख. "नीवृत्" व "उपवर्तन"

हे दोन देशवाचक शब्द " आवर्त " शब्दाप्रमाणें " वृत् " धातूपासूनच आलेले होत. पण या दोन शब्दांचा देशार्थी प्रयोग जितका संस्कृत भाषेंत होतो तितका "आवर्त" शब्दाचा होत नाहीं. सरस्वती ही लहानशी नदी अंबाल्याच्या दक्षिणेस असून, अंबाल्याचा हल्लीं पंजाबांत समावेश होतो. मनुस्मृति व व श्रुति या दोहोंचा या संबंधानें मेळ मिळतो. सत्रांमध्यें जीं सत्रें सरस्वतीच्या तीरावर होत, त्यांस " सारस्वत " असें नांव सूत्रकारांनीं दिलें आहे. सर्व सूत्रकार " सारस्वत " सत्रांचें माहात्म्य विशेष समजतात. सरस्वती नदी ज्या वाळवंटांत नाहीशी होतें, त्या वाळवंटास विनशन असें नांव सूत्रकारांनीं दिलें आहे. जसें सरस्वतीचें विनशन होतें, तसें दृषद्वतीचेंही होतें. दृषद्वतीचें व तिच्या विनशनाचें माहात्म्य सरस्वतीच्या व तिच्या विनशनाच्या माहात्म्यापेक्षां निःसंशय कमी होतें. सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांचा संगम झालेला होता, असें सत्रांवरून सिद्ध होतें. या सर्व गोष्टींचा विचार करितां मनूनें दिलेली माहिती सूत्रकारांनीं दाखल केलेल्या श्रौत संप्रदायाशीं जुळते. ब्रम्हावर्तांत परंपरेनें चालत आलेला जो आचार तो सदाचार, असा मनूनें शेरा मारिला आहे. कुरुक्षेत्र, मत्स्य, पांचाल व शूरसेन मिळून जो मुलुख होतो त्यास मनु ब्रम्हर्षिदेश म्हणतो, व ब्रम्हर्षिदेशांतील ब्राम्हणांपासून दरोबस्त लोकांनीं आपापले धर्म शिकावे, असा सिद्धान्त करितो. मत्स्य शब्दाच्या ठिकाणीं अस्सलचा पाठ वत्स असावा. वत्स देश संस्कृतांत प्रसिद्ध असून त्याची राजधानी कौशांबी होती. कौशांबीस हल्लीं कोसम म्हणतात, व ती प्रयागासून फारशी दूर नाहीं. हिंदुस्थानांतील इतिहासांत नांवाजलेलें थानेश्वर किंवा स्थानेश्वर ही कुरुक्षेत्राची राजधानी होती. या कुरुक्षेत्रास लागून पांचाल व ूरसेन हे देश होते. पांचालाची राजधानी अहि-ूत्र गंगानदीच्या तीरीं होती. शूरसेनांची राजधानी मथुरा ही यमुना नदीवर होती. गंगा व यमुना या दोन नद्यां मधील प्रदेशास संस्कृतांत अंतर्वेदी ह्मणतात. तेव्हां ब्रह्मर्षिदेश ह्मणजे अंतर्वेदींतील मुलुख झाला. हिमालय व विंध्य या दोन पर्वतांच्या मध्यें पूर्वसमुद्रा-पासून तों पश्चिम समुद्रापर्यंत जो मुलुख त्यास मनु "आर्यावर्त" ह्मणतो. पण पुढें आवंत्यांस ( माळव्यांतील लोकांस ), मागधांस ( बिहार प्रांतांतील लोकांस, ) वैदेहकांस ( मिथिला-प्रांतांतील लोकांस ), अंबष्ठांस व याचमारख्या दुसऱ्या पूर्वेकडील लोकांस तो संकरजन्य समजतो, त्यापक्षीं " पूर्वसमुद्र " शब्दाचा अर्थ फारच संकोचित करावा लागतो. अंबष्ट हें मुळचें वराहमिहिरावरून पूर्वेकडील प्रांताचें नांव ठरतें. हल्लीं हें नांव जरी आढळत नाहीं, तरी बंगाली लोकांमध्यें वैद्य नांवाची जी जात आहे, ती आपणास अंबष्ट ह्मणविते, त्यावरून अंबष्ट नांवाच्या मुलुखाचें अनुमान सहज करितां येतें. पश्चिमेस समुद्र नाहीं, इतकेंच नाहीं, तर पंजाबांतील वगैरे लोकांची विशेष निंदा महाभारत वगैरे ग्रंथांत केलेली असून या सर्व लोकांस पिशाच लोकांची संतति ठरविण्याचा प्राचीन संस्कृत ग्रंथांत संप्रदाय आहे. या मुद्याचा विचार केला ह्मणजे आर्यावर्ताची जरी उत्तरेकडील व दक्षिणेकडील हद्द कायम राहिली, तरी पूर्वेकडची व पश्चिमेकडची पुष्कळ पाठीं हटवावी लागत. ऐतरेयब्राह्मणकारानें कुरु व पांचाल ही पृथ्वीची " मध्य" दिशा ठरवून ही "ध्रुव "= कधीं न हालणारी, अर्थात शाश्वत, असा सिद्धांत केला आहे, त्यावरून याप्रांतांचें माहात्म्य वैदिक ग्रंथांवरून विशेष ठरतें. या " ध्रुव " दिशेच्या दक्षिणेस " सात्वत " नांवाच्या लोकांस ऐतरेयब्राह्मणकार घालतो, व "सात्वतांस मनु संकरजन्य ठरवितो. सात्वत हा एक यादवांचा पोटभेद होता. गंगेस नेपाळांतून मिळणारी एक कोसी नांवाची नदी आहे. कोसी हा कौशिकी शब्दाचा अपभ्रंश होय. जशी या नदीवर रहाणाऱ्या पुंड्र लोकांची तशीच आंध्र लोकांची ऐतरेयब्राह्मणकारानें त्यांस " दस्यु " ह्मणून " उदंत्य " लोकांमध्यें गणना केली आहे. " उदंत्य " आर्यावर्ताच्या सीमेच्या बाहेरचे.

सप्तसिंधु शब्द श्रुतींत बराच आलेला आहे, त्यापक्षीं सूक्तें रचलीं गेलीं त्याकाळीं सप्तसिंधु ब्राह्मणांस माहित झालेले होते, याविषयीं शंका नको. हा सप्तसिंधु शब्द पारशांच्या आगमांत " हप्तहिंदु " होतो. हे सप्तसिंधु कोणते? पंजाबांतील पांच नद्या व सहावी सिंधु या सहा नद्या सप्तसिंधुमध्यें येत होत्या, असें पाश्चात्य लोकांचें ह्मणणें आहे. पण हें त्यांचें ह्मणणें आह्मांस सप्रमाण दिसत नाहीं. वसिष्ठ-व-

रोबर संबंध कल्पिला गेल्यामुळें शतद्रू ( सतलज ) व विपाशा ( ब्यास ) या दोन नद्या प्रसिद्ध झालेल्या होत्या असाव्या; पण इरावती ( रावी ), चंद्रभागा ( चेनाब ) व वितस्ता ( जहिलम ) या नद्यांचें माहात्म्य बिलकूल श्रवण होत नाहीं इतकेंच नाहीं, तर उलट महाभारतासारख्या ग्रंथांत यांची निंदा श्रवण होते. वितस्ता नदी काश्मीर देशांतून वहात येते. काश्मीर देशाचा ब्राह्मणांबरोबर बिलकूल संबंध नसून, जलौका नांवाचा अशोकाचा मुलगा जेव्हां राजा झाला, तेव्हां त्यानें ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे वर्णव्यवस्था कान्यकुब्ज देशांतून पहिल्यानेंच आपल्या देशांत आणिली, असें काश्मीरी लोक ह्मणतात. या काळाचे पूर्वी नाग नांवाचे लोक होते, त्यांचें काश्मीर देशांत राज्य होतें. या काश्मीरी लोकांच्या दंतकथेवरून या दिशे बरोबर ब्राम्हणांचा पूर्वी बिलकूल संबंध नव्हता, हें निर्विवाद होतें. तेव्हां शतद्रू व विपाशा या दोन नद्यांचा सप्तसिंधूंमध्यें समावेश करण्यास हरकत नाहीं. पण सिंधु नदीस किंवा तिच्या दुसऱ्या फांट्यांस सप्तसिंधूंमध्यें घालणें रास्त नाहीं. सप्तसिंधु शब्दांतील सिंधु शब्दाचा सिंधु नदीबरोबर संबंध कल्पिण्याची जरूरी नाहीं. "सिंधु" शब्द "स्यंद" धातूपासून निघालेला असून, तो फारसींतील "दर्या" शब्दाप्रमाणें मुळचा नदीमात्राचा वाचक होय. तेव्हां सप्तसिंधु शब्दाचा अर्थ "सात नद्या" असा आम्हीं समजतों; "सिंधु नदी बरोबर संबंध असणाऱ्या सात नद्या" किंवा "सिंधु नदीचे सात फांटे" असा समजत नाहीं. ब्राम्हणांच्या संप्रदायावरून पहातां सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांचा सप्तसिंधूंमध्यें अवश्य समावेश केला पाहिजे. दृषद्वती दूर असल्यास यमुनेंत अवभृत स्नानाचें विधान सूत्रकारांनीं केलें आहे, त्या पक्षीं यमुनेचाही समावेश सप्तसिंधूंमध्यें होईल. राहिलेल्या दोन नद्या अलकनंदा व गंगा किंवा भागीरथी या असाव्या. तेव्हां सरस्वती, दृषद्वती, यमुना, अलकनंदा, गंगा, शतद्रू व विपाशा या मुळच्या सप्तसिंधु होत. पारशांच्या आगमांत सप्तसिंधु शब्द येतो, त्याचें कारण जी ब्राम्हणांची एक टोळी कुरुक्षेत्रांतून पश्चिमेस पसरत गेली व इतर लोकांबरोबर संकीर्ण झाली, तिच्या संततीनें पारशांचे आगम रचलेले. तेव्हां सहजच "सप्तसिंधु" शब्दाचा "हप्त-हिंदु" असा अपभ्रंश पारशांच्या आगमांत झाला.

ज्या धर्माची जन्मभूमि जो प्रदेश समजला जातो, त्या प्रदेशास त्या धर्माचे लोक विशेष मान देतात व तिकडची यात्राही करितात. खिस्ती लोक यरूशलेमची यात्रा करितात, कारण यरूशलेम ही खिस्ती धर्माची जन्मभूमि होय. मक्का व मदिना या दोन स्थळांस अविंध वंद्य समजतात; कां तर, त्यांच्या पैगंबराचा संबंध या दोन स्थळांबरोबर विशेष होता. ब्राह्मणांच्या श्रुतींत, स्मृतींत व पुराणांत एका कुरुक्षेत्राचें माहात्म्य येतें. एऱ्हवीं जीं क्षेत्रें ब्राम्हणांनीं यात्रेचीं मानिलीं आहेत, त्यांची प्राचीन काळीं प्रसिद्धि बिलकूल नव्हती.

सारांश, ब्राह्मणांचा मुळचा मुलूख अंतर्वेदीचा उत्तरेकडील भाग होय. ब्राम्हण हे मुळचे या मुलखांतले लोक होत. या लोकांचा जो मुळचा धर्म होता, तो ब्राम्हणी धर्म. ब्राम्हण कांहीं इराणांतून हिंदुस्थानांत आलेले नव्हत. ते हिंदुस्थानांतून इराणापर्यंतच नव्हत, तर इराणाच्याही पलीकडे अति प्राचीन काळीं गेले होते.

### ३—वर्ण.

ब्राह्मणांच्या ह्मणण्याप्रमाणें पूर्वी वर्ण एकच होता, व वेद ओंकारमय होता. ही आख्यायिका उपनिषदांत बरेच ठिकाणीं आली आहे. तेव्हां चार वर्ण व चार वेद नव्हते असा काळ पूर्वी कधीं तरी निःसंशय होता. "ब्रह्म" शब्द हा मूळचा या काळीं जो एक वर्ण होता, त्याचा वाचक असावा. या "ब्रह्म" चा जो मुलूख तो ब्रह्मावर्त, हा ब्रह्मावर्त शब्दाचा अति जुनाट अर्थ आह्मी समजतों. ब्रह्मावर्ताच्या सीमा वर देण्यांत आल्याच आहेत. तेव्हां "ब्रह्म" हा मूळचा जनवाचक शब्द झाला. विशिष्ट जनांचे वाचक असे जे अति प्राचीन काळचे शब्द आहेत, त्या सर्वांची व्युत्पत्ति करितांच येते, असें नाहीं. एका विशिष्ट जनास गुर्जर शब्द लावण्यांत येई, कारण गुर्जर शब्दाचा अर्थ गोप असून, मुळचा दरोबस्त गोपांचा धंदा गाई राखण्याचा होता. महारथ किंवा महारथि ह्मणजे "मोठा लढवय्या." जे मोठे लढवय्ये अशी ख्याति होती, त्यांस महारथ किंवा महारथि शब्द लावण्यांत आला, व या "महारथ" किंवा "महारथि" शब्दापासून "मऱ्हाठा"

किंवा "मऱ्हाठी" शब्द निघाला. महारश्रांमध्येंही गोपांच्या रक्ताचा अंश बराच आहे. अशा रीतीनें जरी कित्येक विशिष्ट जनवाचक शब्दांची व्युत्पत्ति करितां येते, तरी अंग, कलिंग, वगैरे शब्दांची व्युत्पत्ति नीट होत नाहीं. "ब्रह्म" या अतिप्राचीन व विशिष्टजनवाचक शब्दाचीही अवस्था हीच.

"ब्रह्मावर्तांत एकटा ब्रह्म नांवाचा वर्ण होता" अशा अभिप्रायाची पंक्ति वर आली आहे, तिचा अर्थ दुसरे वर्णांची या काळीं जरूरी नव्हती, असा समजावा. ब्रह्म नांवाचे लोक होते, त्यांच्यामध्यें लिहिण्याचा धंदा नव्हता, व्यापार नव्हता, किंवा शेतकी नव्हती. "ब्रह्म" नांवाच्या लोकांची एक मंडळी स्थापन झाली होती, असें समजण्याची जरूरी नाहीं. जो तो स्वतंत्रपणानें रहात असे व एकाची दुसऱ्यास फारशी गरज पडत नसे, अशी स्थिति या काळीं होती.

कांहीं काळानें ऋषि नांवाचा वर्ग "ब्रह्म" लोकांमध्यें अस्तित्वांत आला. "ऋष"=जाणें, व "ज्याच्या जवळ" मंत्र "गेले" ह्मणजे ज्यास मंत्र "दिसले" तो "ऋषि" अशी "ऋषि" शब्दाची व्युत्पत्ति करण्याचा संप्रदाय आहे. मुळचा अर्थ "मंत्र" शब्दाचा "बोलावणें" होय. पशु मारण्याच्या पूर्वी किंवा मारल्यानंतर ज्या शब्दांची देवता बोलाविण्याकडेस योजना होई, ते शब्द "मंत्र" या नांवानें नांवाजले. जे या मंत्रांचें अध्ययनाध्यापन करीत व प्रसंगीं नवे मंत्रही करीत, त्यांस "ऋषि" शब्द लावूं लागले. पुढें दरोबस्त "ऋषी" मिळून "ब्रह्म" नांवाची मंडळी झाली व दरोबस्त लढाई करणारे मिळून "क्षत्र" नांवाची मंडळी झाली. याप्रमाणें मुळचें एक "ब्रह्म" होतें तें दुभागलें, व दोन वर्ण किंवा मंडळ्या स्थापन झाल्या. जसा "ब्रह्म" शब्दाचा समूहार्थी संस्कृतांत प्रयोग होतो, तसा "क्षत्र" शब्दाचाही होतो. ब्रह्माच्या अवयवभूतास जसा "ऋषि" शब्द लावण्यांत येऊं लागला, तसा "क्षत्रा"च्या अवयव भूतास क्षत्रिय शब्द लावण्यांत येऊं लागला.

या दोन मंडळ्या होतपर्यंत "राजा" शब्द बिलकूल नव्हता, असा आमचा तर्क आहे. क्षत्रिय आपआपसांमध्यें लढाया मारीत, व ऋषी असत ते क्षत्रियांचे यज्ञ करून मंत्रांनीं त्यांच्या देवता प्रसन्न राखण्यास यत्न करीत.

ब्रम्हावर्तांतून ब्राह्मण पहिल्यानें कुरुक्षेत्रांत व पांचालांत पसरले. "कुरु" नांवाच लोक ज्या "क्षेत्रां"त ह्मणजे मुलखांत रहात असत, तें "क्षेत्र" किंवा तो मुलुख "कुरुक्षेत्र".

कुरु व पांचाल या दोन मुलखांत "राजा" हा शब्द प्रचारांत असून, जे राजाच्या जातीचे असत त्यांस 'राजन्य' ह्मणत. शूरसेनांमध्येंही राजे व राजन्य होते. हे राजे व राजन्य काळें करून क्षत्रियांमध्यें मिसळून गेले. "राजति"=अंमल चालवितो, या धातूपासून राजा शब्द आला आहे. "राजन्" शब्दाचें अतिप्राचीन रूप "राज्" हें होय. जसा "ब्रह्मन्" शब्द ईषद्विकृत झालेला लाटिन भाषेंत आढळतो, तसा "राज्" शब्द ही "रेक्स" (Rex) असा ईषद्विकृत झालेला आढळतो. शूरसेनांवर या काळीं राज्य हरिवंशाचें होतें, व राजधानी मथुरा नगरी यमुना नदीवर होती. "हरी" शब्द निघालेला "हल"=नांगर या शब्दापासून. या लोकांमध्यें शेतकी पसरलेली होती. सारांश, "हरि" हे मुळचे शेतकी करणारे लोक होते. या लोकांमध्यें जो मुख्य मानलेला असे, त्यास "हर्य" ह्मणत. "हरि" शब्दाचा हकार जाऊन "अरि" शब्द शत्रूचा वाचक निघाला, व "हर्य" शब्दांतील हकार जाऊन "अर्य" शब्द स्वामींचा किंवा वैश्य वर्णाचा वाचक निघाला. अतिप्राचीन शत्रूचा वाचक शब्द "दस्यु" होय. "हरि" व "हर्य" हे ब्राह्मण लोकांचे मुळचे "दस्यु"=शत्रु होत. 'अरि' व 'अर्य' या शब्दांच्या व्युत्पत्तीचा सूक्ष्म विचार करितां, जसें "ब्रम्हावर्त" होतें, तसें त्यासच लागून "हर्यावर्त" किंवा "अर्यावर्त" ही होतें. 'हर्यावर्त'=हरींचा किंवा हर्यांचा मुलुख. हरि हा शब्द जनवाचक निघंटूत दिला आहे अर्यावर्त ह्मणजे अरींचा किंवा अर्यांचा मुलुख. शेतकी करणारे लोक होते, तेच प्रसंगीं शिवाजी महाराजांच्या मावळ्यांप्रमाणें धनुष्य धारण करित. हरींमध्यें शेतकी करणारा वर्ग धनुर्धर वगाहून निराळा होता, असें दिसत नाहीं. धनी व चाकर असे दोन वर्ग मात्र हरींमध्यें झालेले होते. धनी होते, ते क्षत्रियांमध्यें मिसळून गेले; व केवळ

शेतकी करूं लागले त्यांस ब्राम्हणांनीं व क्षत्रियांनीं आपणापेक्षां निकृष्ट ठरवून "विप्" शब्द लावण्याचा प्रघात पाडला. "विप्" =अन्न वाढणारे, अर्थात् कर देणारे. लौकिक संस्कृतांत अन्न वाढणें या अर्थी "विप्" धातु वापरतात, तो प्रायः 'परि' उपसर्ग लावुन वापरतात. राजे होते, त्यांपैकीं कित्येकांस ऋषींनीं आपणांबरोबर लेखिलें व 'राजर्षि' शब्द त्यांनीं अस्तित्वांत आणिला. पण शेतकी करणारे लोक होते, त्यांस आपणामध्यें घेण्यास ब्राह्मणांनीं बरीच नाखुशी पहिल्यानें दर्शविलेली दिसते. अस्सल संस्कृत ग्रंथांत वैश्यांची प्रायः शूद्रांबरोबर गणना होते. तरी असेरीस ब्राह्मणांनीं वैश्यांस आपल्या धर्मांत घेतलें व त्यांचे सर्व संस्कार करण्याचें ठरविलें. अशी स्थिति झाल्यानंतर "आर्य" अर्यांचे अर्थात वैश्यांचे स्वामी या अर्थी जो "आर्य" शब्द ब्राह्मण व क्षत्रिय आपणास लावीत असत, तो हळू हळू तीनही वर्णांतील लोकांचा वाचक झाला; व जे "आर्य" नव्हते, त्यांस ब्राह्मण "अनार्य" किंवा "व्रात्य" शब्द लावूं लागले. पुढें आर्यांचा मूळचा मुलुख व ब्रम्हांचा मूळचा मुलुख मिळून एक "आर्यावर्त" झालें. तरी मूळचें ब्रह्मावर्त व आर्यांचा अंतर्वेदींतील मुलुख या दोहोंस मिळून "ब्रह्मार्षिदेश" असें नांव देऊन त्या मुलुखाची मातब्बरी ब्राह्मणांनीं आर्यावर्तापेक्षां अधिक ठरविली. ब्रह्मर्षिदेशामध्यें तीन वर्ण होते, ते आर्यावर्तांत चार झाले. चवथा वर्ण "सूद्र" नांवानें प्रसिद्ध झाला. "सूद्र" शब्द "सूद्"=मारणें, या धातूपासून आला. जसा "दस्यु" शब्दाचा मूळचा अर्थ शत्रु तसाच "सूद्र" शब्दाचाही मूळचा अर्थ शत्रु समजणें रास्त दिसतें. व्यापार करणें, शेतकी करणें व पाशुपाल्य करणें हे तिन्ही वैश्य वर्णाचे धर्म सांगितले आहेत, व तीन वर्णांची सेवा करणें, हा एकच सूद्राचा धर्म सांगितला आहे. यावरून घरांतलें कामकाज करणें व पाणी आणून स्वैपाक करणें, हें मूळचें सूद्राचें काम ठरतें. स्वैपाक्याचा वाचक "सूद" शब्द संस्कृतांत आहे तो या गोष्टीच्या संबंधानें ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. ज्यांस आर्य लढाईंत पकडीत त्यांस गुलाम करीत; व गुलामाचें सर्व काम त्यांस आर्यांचे घरीं करावें लागे. अशा प्रकारें लढाईंतल्या कैद्यांस गुलाम करण्याचा संप्रदाय या भूमंडळावर प्राचीनकाळीं सर्वत्र अव्याहत होता. सारांश, सूद्र=गुलाम. याप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व सूद्र हे ब्राह्मणी धर्मांतील चार वर्ण उत्पन्न झाले.

### ४—धर्म व देवता

ब्रम्हावर्तांतील ब्रह्म लोक होते त्यांचा व कृषिकर्माचा परिचय होता, असें ह्मणण्यास कांहीं आधार नाहीं. उलट कृषिकर्म जाणणाऱ्या लोकांची ज्या पक्षीं तिसऱ्या वर्णांत गणना करून पहिले दोन वर्ण ब्राह्मणी धर्मानें उत्कृष्ट मानिले आहेत, त्यापक्षीं अगदीं पहिल्यानें तरी ब्राह्मणधर्मी लोक कृषिकर्म करणारांस तुच्छ मानीत, हें उघड होतें. ऐतरेय ब्राह्मणांत एके ठिकाणीं यज्ञाचा पशु जमिनींत शिरला व त्याच्या निरनिराळ्या अवयवांपासून भाताचे निरनिराळे अवयव उत्पन्न झाले, अशी एक आख्यायिका दिली आहे. या आख्यायिकेवरून पूर्वी एक पशूचा मात्र याग ब्राह्मणांस माहीत होता, व भाताचा किंवा पिठाचा याग पुष्कळ वर्षांनीं पुढें—ह्मणजे शेतकरी लोकांबरोबर संबंध जडून शेंकडों वर्षांनीं निघाला, असें सिद्ध होतें.

मुळचा यज्ञाचा "वाचक" शब्द "मेध" होय. 'मेध' शब्दाचा मुळचा अर्थ "कापणें" असावा. ज्याचा मेध करायाचा, त्यास "पशु" ह्मणत. देवतेच्या नावानें जो पशु कापायाचा त्याच्या जातीवरून यज्ञास नांव ठेवीत. ज्या यज्ञांत पुरुषास कापीत, त्यास "पुरुषमेध" ह्मणत. पुरुषमेधाचे अनेक प्रकार तैत्तिरीय शाखेंत आढळतात. ज्या यज्ञांत "अश्व" =घोडा कापीत त्यास अश्वमेध ह्मणत. ज्या यज्ञांत गाईस किंवा बैलास कापीत त्या यज्ञास "गोमेध" ह्मणत. हवा तो पुरुष, हवा तो घोडा व हवी ती गाय किंवा बल यज्ञास चाले, असें नव्हतें. ज्याचा यज्ञ करायाचा त्याच्या मध्यें ठरविलेली लक्षणें असलीं तरच त्यास कापीत. कापण्याच्या पूर्वी सांगितलेली सर्व लक्षणें पशूमध्यें आहेत कीं नाहीं, त्याची परीक्षा करावी लागे. जर सर्व लक्षणें दिसलीं, तर पशूस मेध्य =मेध करायास योग्य ठरवीत. जर सांगितलेली सर्व लक्षणें नसलीं, तर पशु "अमेध्य" झाला. जसे पूर्वी पशूच्या कापाकापीच्या संबंधानें नियम ब्राह्मणांमध्यें होते, तसेच पृथ्वींत इतर लोकांमध्यें ही होते. जो पशु देवतेस द्यावयाचा तो चांगला व सर्वलक्षणसंपन्न पाहून द्यावयाचा. जे शब्द पशूस कापतांना किंवा पुढें देवतेस अर्पण करितांना

ह्मणत, त्या शब्दांस मंत्र ह्मणत. जो मंत्र ह्मणे व करी तो ऋषि.मंत्रांचा समूहवाचक शब्द "ब्रह्म"होय.

कांहीं वर्षांनीं पुरुषमेध बंद पडला. हरिश्चंद्र नांवाच्या राजाचा नवस होता कीं मला मुलगा झाल्यास मी पुरुषमेध करीन. मुलगा झाल्या नंतर नवस फेडण्यासाठीं हरिश्चंद्रास एक पुरुष हवा होता. आंगिरस गोत्रांतील एक अजीगर्त नांवाचा ब्राह्मण होता, त्यानें आपला मुलगा शुनःशेप विकला. आणखीं कांहीं द्रव्य कबूल केल्यामुळें अजीगर्तानेंच आपल्या मुलाची मान कापण्याचें पत्करलें. अजीगर्त शुनःशेपाची मान कापण्यास तयार झाला, इतक्यांत त्या रडणाऱ्या अर्भकाची दीनवाणी ऐकून विश्वामित्रास करुणा आली व तो मध्यें पडला.विश्वामित्रानें शुनःशेपास सोडविलें इतकेंच नाहीं, तर आपला वारसही करून त्याचें सर्वतोमुख कल्याण केलें. या शुनःशेपानें सोम आणिला, असें ह्मणतात. सोम पूर्वी गंधर्वांमध्यें होता, असें श्रुतींत अनेक वेळां येतें. या गोष्टीचा विचार करितां ब्रम्हावर्तांतील ब्रह्म लोकांचा या काळीं"गंधर्व" नांवाच्या लोकांबरोबर परिचय झालेला दिसतो.

कांहीं काळानें भात पिकविणाऱ्या लोकांबरोबरहीं ब्राह्मणाचा परिचय झाला, व त्यांपैकीं बरेच ब्रम्हावर्तांतील पसरलेल्या ब्रम्हांमध्येंही मिळाले. हे भात पिकविणारे लोक देवतेस प्रायः अहिंसामय पदार्थांचा नैवेद्य दाखवीत. या लोकांमध्यें इष्टीचें प्राधान्य होतें. "इष्टि" शब्द "यज" धातूपासून निघालेला समजण्याचा संप्रदाय आहे. पण आम्हांस असें वाटतें कीं "इष्" ह्मणून जो एक अन्नवाचक शब्द संस्कृतांत आहे व ज्या शब्दावरून भात पिकविणाऱ्या महिन्यासही "इष" शब्द लावण्याचा संप्रदाय पडला, त्या शब्दाबरोबर "इष्टि" शब्दाचा संबंध कल्पिणें अधिक प्रशस्त होय. सूत्रांमध्यें जितक्या ह्मणून "इष्टि" येतात. तितक्या अहिंसक असतात.

"स्तोम" ह्मणून एक शब्द याज्ञिक भाषेंत वारंवार येतो. मुळच्या स्तोमाचें स्वरूप नीट कळण्यास कांहीं साधन नाहीं, तरी शब्दाच्या अवयवार्थावरून पहातां, "स्तोम" हा शब्द मुळचा एका स्तुति करण्याच्या प्रकाराचा वाचक असावा. इष्टि असे तीन नैवेद्य देवतेस दाखवीत; व स्तोम असे, त्यांत केवळ देवतेची एका प्रकारानें स्तुति केलेली असे, असें आह्मांस वाटतें.

तेव्हां "मेध" किंवा "पशु, सोम, इष्टि" व "स्तोम" हे यागाचे चार प्रकार पूर्वींच्या काळीं होते.

अग्नि नव्हता. असाही एक काळ पूर्वी होऊन गेला. पुरूरव्यास अग्निचा लाभ गंधर्वांपासून झाला, अशी एक आख्यायिका याज्ञिकांमध्यें सुप्रसिद्ध आहे. पुरूरव्याच्या पूर्वी अग्नि हा पदार्थच बिलकूल माहीत नव्हता, असें आह्मांस वाटत नाहीं. तेव्हां "अग्नीचा लाभ झाला" या वाक्याचा अर्थ "अग्नीस पूज्य मानून त्याच्या नांवानें द्रव्यत्याग करण्याचा रिवाज पडला" असा समजावा. सारांश, अग्नि नांवाच्या वंद्य समजून गेलेल्या देवतेचा लाभ पुरूरव्यास झाला, तो गंधर्वांपासून झाला. तेव्हां गंधर्व हे मूळचे अग्नियागी ठरतात. "अग्निस्" हा शब्द ईषद्रूपांतर झालेला Igins ( इग्निस ) या लाटिन शब्दांत आपल्या नजरेस पडतो. पूर्वींचे रूमी लोक होते ते झाडून अग्नियागी होते. अग्नीच्या पूर्वीही देवता व यागाचे प्रकार हे निःसंशय असले पाहिजेत. ज्या काळीं अग्नि नव्हता, त्या काळीं वायु ही देवता पुष्कळांस वंद्य असावी. वृत्तबद्ध किंवा गीतिबद्ध मंत्र नसतात, त्यांस "यजुस्" ह्मणतात. यजुर्वेदाचा जन्म वायूपासून झाला, असा समज आहे. पहिल्यानें सुटे मंत्र असून कालांतरानें गीति व वृत्तें निघालीं, यांत शंका नको. ब्रह्मावर्तांतील ब्रह्म लोकांस वायु व आप् या दोहोंपेक्षां अधिक देवता माहीत असण्याचा संभव नाहीं. गंधर्व हे झाडून इंद्राचे सेवक समजण्याचा पौराणिकांचा संप्रदाय आहे, त्यापक्षीं इंद्रही देवता मूळची गंधर्वांची असावी. इंद्र हा मूळचा पावसाचा देव होय. "वृत्र" शब्दाचा अस्सलचा अर्थ मेघ व वज्र = वीज. जो गडगडाट करून विजेनें मेघास फाडतो व त्यानें कोंडलेलें पाणी खालीं सोडून देतो, तो इंद्र. असुरांबरोबर परिचय झाला, तेव्हां वरुण ही देवता ब्रह्मावर्तांतील लोकांस मिळाली. वरुण ही मुळची असुरांची देवता होय. श्रुतींतही वरुणास "असुर" शब्द लाविलेला आढळतो. भृगु नांवाच्या ऋषीस साक्षात् वरुणाचा मुलगा समजतात. या भृगूचा मुलगा शुक्र हा असुरांचा गुरु.तेव्हां वरुणाचा व असुरांचा संबंध असा

ळचा असून असुरांपासूनच ब्राह्मणांस वरुण देवतेचा लाभ झाला. "अग" व "वंग" हे शब्द पूर्वीचे जसे एक होत, तसे "वरुण" व "अरुण" हेही शब्द मूळचे एक होत. या पक्षाचा परिग्रह केल्यास, 'वरुण" हें रूप पूर्वीचे सूर्याचें ठरतें. "वरुण" हें जरी विरोचन शब्दाचें संक्षिप्त किंवा अपभ्रष्ट रूप मानिलें-जसें "पुराण" हें "पुरातन" शब्दाचें संक्षिप्त किंवा अपभ्रष्ट रूप-तरी तें सूर्याचेंच रूप होय. "विरोचन" हा सूर्यवाचक शब्द संस्कृतांत प्रसिद्ध आहे. जसा देवांचा राजा इंद्र, तसा असुरांचा विरोचन अशी उपनिषद्रांमध्यें प्रसिद्धि आहे. "वरुण" हें मूळचें आकाशाचें नांव, असेंही समजण्यास हरकत नाहीं. "वृ" = पसरणें, या धातूपासून "वरुण" शब्द निघालेला. वरुण शब्दाचें ग्रीक भाषेमध्यें "युरेनोस" (Uranos) असें रूप होतें.

देवताद्वंद्वेंही वेदांत येतात. एक देवता स्त्री व दुसरी देवता पुरुष, अशी कल्पना करून देवताद्वंद्वें मानण्यांत आलीं. पूर्वी असा एक काळ होता कीं, तो असतां स्त्रीस व स्त्रीत्वास विशेष मान असे. या काळास आपण स्त्रीप्रधान काळ ह्मणूं. जें दिसण्यांत मोठें असेल किंवा अनेक गुणांनीं स्मरणीय असेल, त्यास स्त्रीरूप या काळीं मिळालें. "सूः" व "सूर" हे सूर्याचे वाचक शब्द "सू" = प्रसवणें, या धातूपासून निघाले. तेव्हां सूर्यास बाप न समजतां या काळीं आई समजत. "सू" हा मुळचा आईवाचक स्त्रीलिंगी शब्द झाला. "सविता" हा शब्दही मुळचा आईचा वाचक असून, सूर्यास लावण्यांत आला. हा शब्द हल्लीं जरी पुल्लिंगी समजतात व तो तसा दिसतो, तरी तो मुळचा स्त्रीलिंगी व केवळ आईचा वाचक होय. "माता, दुहिता, याता" वगैरे पुल्लिंगी शब्दांप्रमाणें दिसणारे कांहीं शब्द स्त्रीलिंगांत विराजणारे हल्लींही संस्कृतांत सुप्रसिद्ध आहेत. "सूर्या" असा स्त्रीलिंगी सूर्याचा वाचक शब्द वैदिक भाषेत क्वचित् आढळतो. सूर्यास "मित्रा" असाही शब्द लावण्यांत येई. पारसी लोकांच्या आगमांत "मित्रा" ही स्त्रीलिंगी देवता प्रसिद्ध आहे, व या "मित्रा" शब्दाचा "मिलित्ता"[१३] (Mylitta) असा अपभ्रंश पूर्वीच्या असुरांच्या भाषेत झाला होता. "आप्" हा पाण्याचा वाचक शब्द स्त्रीलिंगी आहे, इतकेंच नव्हे, तर नित्य बहुवचनी आहे. "अग्नी" शब्द मुळचा ईकारान्त दिसतो, अर्थात् तो मुळचा स्त्रीलिंगी होय. लाटिन भाषेत "इग्निस" हा शब्द जरी पुल्लिंगी समजतात, तरी अग्नीची पूजा करण्यासाठीं कुंवारींचीच योजना होत असे, ही मोठी गोष्ट लक्षांतून घालवितां कामा नये. अग्नीपासून स्कंदाचा जन्म झाला, ही आख्यायिका पुराणांत येते. अग्नीस गर्भ राहिला वगैरे गोष्टी या आख्यायिकेंत येतात, त्यांवरूनही अग्नीचें स्त्रीत्व पूर्वी कधीं तरी माहीत असावें, असें अनुमान निघतें. "उषासा" किंवा "उषस्" हा शब्द मुळचा रात्रीचा वाचक होय. लौकिक संस्कृतांतही "उषा" शब्दाचा क्वचित् रात्र्यर्थी प्रयोग होतो. "दिव्" हा स्त्रीलिंगी शब्द मुळचा दिवसाचा वाचक होय. खुद्द "देवता" शब्दही याच काळचा आह्मी समजतों. ऋत्विजांचा वाचक अति प्राचीन शब्द "होत्रों" होता, असें पाणिनीच्या[१४] सूत्रांवरून ठरतें. "बोलाविणारी" किंवा "हवन करणारी" ह्मणून "होत्रा". देवतेस आमंत्रण करणें किंवा तिच्या उद्देशानें हवन करणें हें काम याकाळीं स्त्रियांचें असे. याप्रमाणें या अभिधान केलेल्या दरोबस्त देवता स्त्रीप्रधान काळांतलि होत. या स्त्रीप्रधान काळानंतर पुरुषप्रधान काळ आला. याकाळीं जें कांहीं मोठें किंवा वंद्य असेल, त्यास पुरुषत्व देण्यांत आलें. या काळीं पहिल्यानें देवताद्वंद्वें निघालेलीं असलीं पाहिजेत. जसा आपणांमध्यें स्त्रीपुरुषभाव असतो तसाच देवतांमध्यें असतो, अशी याकाळीं कल्पना झाली, व वंद्यत्व कायम राखून स्त्रीचें नांव समासांत पहिल्यानें ठेवण्यांत आलें. याप्रमाणें देवताद्वंद्वें निघालीं. "सूर्याचंद्रमसौ, मित्रावरुणौ, अग्नीषोमौ" वगैरे देवताद्वंद्वांचे वाचक शब्द झाडून या काळचे होत. हळू हळू पुरुषप्रधान काळांत सूर्यासारिख्या पुष्कळ देवता पुल्लिंगी झाल्या, व "देवताद्वंद्व" = एका पात्रांतून सोमपान करणारे दोन देव, असा देवताद्वंद्व शब्दाचा अपूर्व अर्थ झाला. पण "द्वंद्व" शब्दाचा मुळचा अर्थ स्त्रीपुरुष असा होय. पुढें देवताद्वंद्व शब्दाचा अधिक अर्वाचीन अर्थ प्रचारांत आला होता, तो घेऊन पाणिनीनें आपल्या सूत्रांची रचना केली.

पूर्वी मेध करणारे, सोम करणारे, इष्टि करणारे व स्तोम करणारे, हे लोक परस्परनिरपेक्ष होते. या

लोकांचा परस्पर विशेष संबंध असे, अशी कल्पना करण्याची जरूरी नाहीं. मेध करणारे व सोम करणारे यांचा कदाचित् संबंध असेल, कारण मांस खाणें व मद्य पिणें या दोहोंचा बराच संबंध असतो. पण इष्टि करणारे व स्तोम करणारे, यांचा पूर्वी निकट संबंध असण्याचा संभव नाहीं. अग्नीचा लाभ झाल्यानंतर अग्नीची उपासना पुष्कळ वाढलेली दिसते. अग्निहोत्रांत मांसाचा होम होत नाहीं व वैवाहिक अग्नींतही मांसाचा होम निषिद्ध आहे, त्यापक्षीं अग्नीचा याग मुळचा अहिंसक असावा. रूमी लोकांमध्यें अग्नि ठेवलेला असे, त्यांत मांसाचा होम करण्याचा संप्रदाय दिसत नाहीं पारशांच्या अग्यारींत जो अग्नि असतो, त्यांतही मांसाचा होम नाहीं. तेव्हां अग्नियाग मुळचा अहिंसक होता. कांहीं काळानें या सर्व प्रकारांचा मिलाफ झाला. पूर्वी मेध करणाऱ्या लोकांमध्यें गाईविषयीं किंवा बैलाविषयीं पूज्य बुद्धि असण्याचा संभव नाहीं. पूर्वींचे मेध करणारे सर्व लोक मोठे हिंसक दिसतात. पुढें अग्नीचा प्रवेश झाला, तरी या लोकांचा हिंसकपणा फारसा कमी झाला नाहीं. यांचा गोघ्नपणा पूर्वी मनस्वी होता. जेव्हां शूरसेनांमध्यें ब्रह्मावर्तांतील लोक पसरले, तेव्हां हरींबरोबर त्यांचा संबंध जडला. हरी हे मुळचे दक्षिणी लोक गोपांमधून निघालेले होत. गोप लोकांची गाईविषयीं पूज्य बुद्धि असे, हें त्यांचें नांवच सांगतें. शेतकी जसजशी ब्राह्मणधर्मी लोकांमध्यें पसरली, तसतशी गाईविषयीं व बैलाविषयीं त्यांची पूज्य बुद्धि वाढत जाऊन, कोणी वेदज्ञ अतिथि आल्यास त्याच्यासाठीं गाय कापण्याची जी चाल पूर्वी होती, ती अखेरीस पुष्कळ ठिकाणीं बंद पडली. कोणी मोठा अतिथि आल्यास ब्रह्मावर्तांतील लोक पूर्वी 'मधुपर्क' करीत. 'मधु' शब्दाचा मुळचा अर्थ मद्य होय पहिल्यानें पिण्यास मद्य देऊन, नंतर त्याच्या नांवानें गाय कापायाची, व तिचें मांस शिजवून जमलेल्या मंडळीनें भक्षायाचें. हा अति जुनाट मधुपर्क झाला. असा रिवाज असल्यामुळें 'गोघ्न' शब्द अतिथीस संकृत भर्पेन लाविण्यांत येतो. "ज्याच्यासाठीं गाय कापली जाते तो गोघ्न" अशी व्युत्पत्ति पाणिनीनें दिली आहे. 'ही गाय (अकरा) रुद्रांची माता, (आठ) वसूंची मुलगी, (बारा) आदित्यांची बहीण व अमृताची खाण आहे; या निरपराधी अदितीसारख्या पूज्य गाईस तूं मारूं नको' अशा अभिप्रायाचा मंत्र म्हणून मधुपर्कांत आणलेली गाय सोडून देण्याचा संप्रदाय जो वाचण्यांत येतो, तो हरींसारख्या व दुसऱ्या गोपांच्या संततीचा पुष्कळ दिवस सत्संग झाल्यावांचून गोघ्न लोकांमध्यें पडलेला नव्हे. जशी गोपांची संतति पश्चिमेकडेस गेली, तशीच गोघ्नांचीही संतति गेली. मिश्रदेशांतील लोक गाईस अतिशय पूज्य मानीत, व यवन (ग्रीक) गोमांस भक्षण करीत, म्हणून त्यांच्यी भांडयांस शिवत सुद्धां नसत. नार्वे व स्विदन या देशांत पूर्वीच्या काळीं वसाहत करून राहिलेल्या लोकांस स्कांद म्हणत. या स्कांद लोकांमध्यें गाय पूज्य मानलेली असे. सारांश, ब्रह्मावर्तांतील लोक जसजसे आर्यावर्तांत पसरत चालले व इतर लोकांचा मिलाफ ब्राह्मणी धर्मांत होत चालला, तसतसें त्या धर्माचें मुळचें स्वरूप पुष्कळ बदललें. जशा नव्या देवता आंत येऊं लागल्या, तसे नवे संप्रदायही घुसूं लागले.

"तूं व मी एकाच गलबतांत बसलों" असें वसिष्ठ वरुणास एका सूक्तांत म्हणतो. यावरून वरुणाची मूर्ति किंवा चित्र पूर्वीच्या काळीं निःसंशय होतें. "तुझ्या हजार दरवाजाच्या देवळांत गेलों" असेंही लेख वरुणाच्या संबंधानें येतात. तेव्हां जरी इतर देवतांची मूर्ति किंवा चित्र होतें, असें म्हणण्यास आधार नाहीं, तरी वरुणाच्या संबंधानें तसें म्हणतां येत नाहीं.

वरुणाच्या सूक्तांत आपणांमधील एव्हांच्या देवस्कीचाही पुष्कळ भास होतो. "मी वरुणाजवळ गेलों व त्याला विचारिलें कीं मी तुझी नीट सेवा करीत असतां तुझा माझ्यावर राग कां? तेव्हां वरुण म्हणाला" वगैरे मजकूर पुष्कळ सूक्तांतून आढळतो. असला प्रकार वरुणाच्या सूक्तांतुन मात्र येतो. यावरून वरुणाची प्रतिमा असे इतकेंच नाहीं, तर त्या प्रतिमेस कौल किंवा प्रसाद लावीत, व तो पडेल त्याप्रमाणें मनाची समजूत करून घेऊन नवस करीत व फेडीत, याविषयींही कांहीं शंका नको. वरुणाच्या सूक्तांखेरीज दुसऱ्या सूक्तांमध्यें असला प्रकार आढळत नाहीं.

### ५—गोत्रें.

आंगिरस, भार्गव, काश्यप, कौशिक, वसिष्ट, अत्रि

व अगस्त्य हीं मूळचीं ब्राह्मणांचीं सात गोत्रें. आंगिरस हें गोत्र मूळचें गंधर्वांमधील होय. सोमलाभ झाला, तो आंगिरस गोत्रांतील शुनःशेपापासून झाला. "अंगिर:" असें संबोधन कित्येक ठिकाणीं अग्नीस लाविलेलें मंत्रांत आढळतें. अग्नीचा लाभ गंधर्वांपासून झाला, हेंही सुप्रसिद्ध आहे. भार्गव हें गोत्र मूळचें असुरांमधील होय. काश्यप हें गोत्र मूळचें सर्पांमधील. सर्प या नांवाचे लोक वेदांत व पुराणांत येतात, व ते झाडून कश्यप ऋषींची संतति समजले जातात. कश्यप ऋषि हें कश्यप सरोवराचें कवितामय नांव होय. कौशिक हे कनोज प्रांतांतील. वसिष्ट अयोध्या प्रांतांतील. अत्रि हे मूळचे दंडकारण्यांतील, व अगस्ति हे द्रविडमंडळांतील. एकेक ऋषि हा कोणी एकेक पुरुष होता व एकेक गोत्र हें सगळें त्या एकेक पुरुषाची संतति, असें समजणें रास्त नाहीं. सात ऋषींचीं नांवें हीं मूळचीं सात निरनिराळ्या जनांचीं नांवें होत. ब्रह्मवर्तांतील ब्रह्म लोक पसरण्याच्या पूर्वी आर्यावर्तांत हे निरनिराळे लहानमोठ्या जनांमधील लोक पसरलेले होते. आंगिरस व भार्गव या दोहोंचें माहात्म्य अग्निहोत्रांत विशेष येतें. त्यावरून विचार करितां अग्नियागाबरोबर या लोकांचा संबंध पुष्कळ असावा. कश्यप व सर्प ऋषी हेही स्थळोस्थळीं वेदांत येतात. आंगिरस नांवाच्या लोकांनीं ज्यांस ब्राह्मणी धर्माची दीक्षा दिली, ते सर्व मिळून आंगिरस गोत्र झालें. भार्गव वगैरे गोत्रें याप्रमाणें पहिल्यानें अस्तित्वांत आलीं. ज्या निरनिराळ्या जनांमधील लोकांस आंगिरसांनीं आपल्या धर्माची दीक्षा दिली किंवा जे मूळचे आंगिरस या मोठ्या भेदाचे पोटभेदांपैकीं दीक्षा मिळालेले होते, ते निरनिराळे लोक आंगिरस गोत्राचीं उपगोत्रें झालें. काण्व हे लोक मूळचे कलिंगी ह्मणजे तेलंगी होत. काण्व गोत्र हें आंगिरस गोत्राचें उपगोत्र मानिलें जातें, कारण काण्व जातीच्या लोकांस ब्राह्मणी धर्माचा उपदेश मिळाला. पहिल्यानें आंगिरसांपासून भरद्वाज हा मूळचा आंगिरसांचाच पोटभेद पूर्वी दीक्षा मिळालेला, ह्मणून भरद्वाज हें आंगिरस गोत्राचें उपगोत्र झालें, कुंडिन हे लोक मुळचे विदर्भांतले होत. यांच्यामधील कित्येकांस पहिल्यानें ब्राह्मणी धर्माची दीक्षा मिळाली वसिष्ठांपासून किंवा ते मुळचे वसिष्ठांमधीलच होते, ह्मणून कुंडिन हें वसिष्ट गोत्राचा एक फाटा झाला. जितके ह्मणून आंगिरस वगैरे होते, तितके सर्व ब्राह्मणधर्मी नव्हते. कित्येक आंगिरस वगैरे जे अंतर्वेदींत वसाहत करून होते, ते ब्रह्मावर्तांतील ब्रह्मामध्ये मिळून ब्राह्मणधर्मी बनले. गोत्रवाचक शब्द हे मुळचे निरनिराळ्या जनांचे वाचक मानिले ह्मणजे जसे निरनिराळ्या गोत्रांचे पूर्वी ब्राह्मण होते, तसे क्षत्रियही असले पाहिजेत. "मधु" गोत्राचा ब्राह्मण असल्यास त्यास "माधव्य" ह्मणावें व क्षत्रिय असल्यास त्यास माधव म्हणावें, असा पाणिनीनें नियम बांधिला आहे, त्यापक्षीं एकाच गोत्रांतील कांहीं लोक ब्राह्मणांमध्यें खपत व कांहीं लोक क्षत्रियांमध्यें खपत, हें उघड होय. बुद्ध हा जातीचा क्षत्रिय होता. बुद्धाच्या आईस गौतमी म्हटलेलें असतें, कां तर तिचा जन्म गोतम गोत्रांत झालेला होता. तिचें ठेविलेलें नांव "माया" होतें. जी क्षत्रियांची स्थिति होती, तीच वैश्यांची होती, असें अनुमान करण्यास अडचण नाहीं. वरील मुद्याचा विचार केल्यास, सात गोत्रें ह्मणजे सात निरनिराळे जन आर्यावर्तांत वसाहत करून राहिलेले होते, व प्रत्येक गोत्राचे जसे ब्राह्मण होते तसे क्षत्रिय होते व तसेच वैश्य होते, असें पूर्वीच्या स्थितीचें दिग्दर्शन होतें. पुढें बराच काळ गेल्यानंतर, ज्या गोत्राचा पुरोहित क्षत्रियाचा किंवा वैश्याचा असेल, तेंच क्षत्रियाचें व वैश्याचें गोत्र ठरवून, दोन्ही वर्णास प्रातिस्विक गोत्र ह्मणून नाहीं, असा ब्राह्मणांनीं सिद्धान्त केला.

सात गोत्रें वर दिलीं आहेत, तीं आश्वलायन सूत्रावरून दिलीं आहेत. मधु गोत्राचें सात गोत्रांच्या उपगोत्रांमध्यें नांव नाहीं. दक्ष नांवाचा प्रजापति पुराणांत येतो, व पाणिनीची आई दक्ष गोत्रांतील होती; कारण पाणिनीस 'दाक्षीपुत्र' म्हणतात. तेव्हां जरी दक्ष गोत्राचें नांव आश्वलायनांत नाहीं, तरी तें प्राचीन काळीं निःसंशय असावें. सारांश, पूर्वी सात गोत्रांपेक्षां अधिक गोत्रें असावीं. पण तीं काळेंकरून गुप्त होऊन गेलीं, व जीं उपलब्ध होतीं, तीं आश्वलायनानें आपल्या सूत्रांत दाखल केलीं.

### ६—वर्णव्यवस्था.

" ऋषीचें कुळ व नदीचें मूळ " या दोहोंचा

विशेष चौकशी करूं नये, अशी आपल्या भाषेंत ह्मण पडली आहे, तीं यथार्थ आहे. ज्याकाळीं ' ऋषि ' शब्द प्रचारांत होता, त्याकाळीं जो मंत्र करी त्यास ' ऋपि ' शब्द लावीत. कौशिक गोत्र हें मुळचें क्षत्रिय. पण विश्वामित्रानें मंत्र केले, व मधुच्छंदा वगैरे विश्वामित्राचें पुत्र होतें, त्यांनींही मंत्र रचिलें. ह्मणून या क्षत्रियांचा ब्राह्मणांमध्यें समावेश झाला. पराशर गोत्र हें वसिष्ट गोत्राचा पोटभेद समजतात.पराशराची बायको सत्यवती ही एका मच्छीमारूची मुलगी.साक्षाद्र वसिष्ठ हा वेश्येचा पुत्र समजला जातो. जामदग्न्य गोत्र हें भार्गव गोत्राचा एक पोटभेद होय. जमदग्नीची बायको रेणुका ही राजकन्या होती. अगस्तीची बायको लोपामुद्रा हीही एका राजाची मुलगी होती.

वामदेवाचीं जीं सूत्रें ऋग्वेदांत आहेत, त्यांतून एकामध्यें आंगिरस गोत्राचें वर्णन केलें आहे. वामदेव ऋपि आंगिरसांस ' दिवस्पुत्र ' ह्मणतो. तेव्हां ' दिवस ' हें मुळचें आंगिरसांच्या मुलखाचें नांव असावें. ' उशिज् ' असेंही आंगिरसांस याच सूक्तांत ह्मटलें आहे. 'उशिज्' हा आंगिरसांचा पोटभेद असावा किंवा हें आंगिरसांचेंच नामांतर असावें. "आंगिरसां"प्रमाणें किल्ला काबीज करणारे व पैशानें प्रकाशणारे आपण व्हावें " अशी देवाजवळ प्रार्थना ऋपि व त्याचें बांधव एका ऋचेंत करितात. यावरून आंगिरस जसे तपस्वी होतें, तसेच निःसंशय योद्धेही होते. सारांश, वर्णानें ते नुसते ब्राम्हण नव्हते, तर ब्राह्मणक्षत्रिय होते. पुराणांतही असलीं उदाहरणें आढळतात. द्रोण, रुप, अश्वत्थामा हेही ब्राह्मणक्षत्रिय होते. भीष्म हा क्षत्रियब्राह्मण होता, व जनक हाही क्षत्रियब्राह्मण होता, हे मुळचे क्षत्रिय असून ब्राह्मणांमध्यें मिसळून गेलेले.

ययाति वर्णानें क्षत्रिय होता, तरी त्यानें पहिली बायको केली ती ब्राह्मणाची मुलगी. त्याची दुसरी बायको शर्मिष्ठा ही असुराची मुलगी. तेव्हां ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यामध्यें कर्मभेद कडक झालेला न व्हता, इतकेंच नाहीं, तर दोहोंमध्यें बेटीव्यवहार होता व जे असुरांसारखे ब्राह्मणी धर्माच्या बाहेर होते, त्यांच्या बरोबरही ब्राम्हणी धर्माचे सर्व प्रकारचे संबंध होत.

याप्रमाणें क्षत्रिय व वैश्य या दोन वर्णांमध्येंही लग्नव्यवहाराची चाल पूर्वीच्या काळीं निःसंशय होती. वैश्य वर्णाचें अधिक प्राचीन नांव " अर्य " होय. जी जातीची अर्य, ती " अर्या " किंवा ' अर्याणी " व जी अर्याची लग्नाची बायको ती कोणत्याही जातीची असली, तरी " अर्यी " झाली. जी जातीची क्षत्रिय, ती " क्षत्रिया " किंवा " क्षत्रियाणी; " व जी क्षत्रिचाची बायको, ती " क्षत्रियी ". इतकेंच नाहीं, तर " सूद्र " वर्णाबरोबरही त्रैवर्णिकांचा वैवाहिक संबंध बराच होत असे, ह्मणून शूद्राची बायको ' शूद्री " व जी जातीची शूद्र ती " शूद्रा " असे " शूद्री " व " शूद्रा " हे दोन शब्द प्रचारांत आले.

पारस्कर गृह्य सूत्रांतही ब्राह्मणांस तीन्ही वर्णांतील ,क्षत्रियांस दोन वर्णांतील व वैश्यास त्याच्याच एका वर्णांतील मुलाबरोबर लग्न करण्यास सूट दिलेली असून, लागलेंच पुढें "शूद्रामप्येके मंत्रवर्जम्" असें वचन घातलें आहे. तीन्ही वर्णांतील लोकांनीं सूद्र जातीच्या कन्येबरोबर विवाह लावावा; इतकेंच कीं असल्या विवाहांत वैदिक मंत्रांचा प्रयोग करूं नये. या वचना वरून तीन्ही वर्णांतच काय पण चाऱ्ही वर्णात पूर्वीच्या काळीं लग्नव्यवहार निःसंशय सुरू होता.

भिन्न वर्णाच्या मुलीबरोबर विवाह होऊन जी संतति होई, ती जनकाच्या वर्णांत ढकलली जाई. आई कोळीण, पण बाप ब्राह्मण, ह्मणून पराशर ऋषीचा मुलगा ब्राह्मण. आई क्षत्रिय, पण बाप ब्राह्मण, ह्मणून परशुराम ब्राह्मण. आई ब्राह्मण पण बाप क्षत्रिय, ह्मणून ययातीचा वडील मुलगा क्षत्रिय; व आई जातीची असुर, तरी बाप क्षत्रिय, ह्मणून ययातीचा धाकटा मुलगा क्षत्रिय.

ब्राह्मण आर्यावर्ताच्या बाहेर अयोध्या प्रांतांत व मगध देशांत पसरले, तेव्हां व्रात्य नांवाच्या लोकांबरोबर त्यांचा संबंध जडला. हे व्रात्य लोक लाट्यायन सूत्रावरून चांगले सुधारलेले ठरतात. काळ्या कोरीचीं धोत्रें नेसणें, पायांत जोडा घालणें, नाणें चालू असणें, श्रीमंत व विद्यावंत असे दोन विभाग असणें, हीं सर्व कांहीं जंगलीपणाचीं लक्षणें नव्हत. या व्रात्य लोकांस " व्रात्यस्तोम " नांवाचा यज्ञ करून, ब्राह्मण ब्राह्मणधर्मी करीत.

इतकेंच नाहीं, तर ब्राह्मण हळू हळू कमजातीचा होत जाऊन, अखेरीस शूद्र होतो; व सूद्र हळू हळू वर्णानें उंच होत जाऊन अखेरीस ब्राह्मण होऊं शकतो, असें आपस्तंब उघड ह्मणतो.

सारांश, पूर्वीची आर्यावर्तातील वर्णव्यवस्था अगदीं कायमची नव्हती. जे उच्चावच वर्ण आर्यावर्तात ठरीव झाले होते, त्यांच्यामध्यें रोटीव्यवहार व बेटीव्यवहार होत असे; इतकेंच नाहीं, तर अनार्य लोकांसही व्रात्यस्तोम करून आर्य आपणांमध्यें घेत व एकदा व्रात्यस्तोम झाला म्हणजे त्याच्यापासून ब्राम्हणांस दक्षिणा जाहीरपणें घेतां येई, व त्रैवर्णिक त्याच्या बरोबर सर्व प्रकारचा व्यवहार चालवीत. आर्यांमध्यें व ब्राम्हणांमध्यें पूर्वीच्या काळीं दुसरें रक्त मिसळलेलें नव्हतें, असें ज्यांस वाटत असेल त्यांस खुशाल वाटो; पण निदान आह्मांस तरी तसें वाटत नाहीं. वैदिक धर्म हा पूर्वीच्या काळीं एव्हांच्या दुसऱ्या जिवंत धर्मांप्रमाणेंच होता. हवें त्यानें हल्लीं ख्रिस्ती व्हावें, व हवें त्यानें अविध व्हावें. त्याचप्रमाणें पूर्वीच्या काळीं हवें त्यास ब्राह्मणांच्या धर्मांत जाण्यास सांपडे. जर श्रीमंत किंवा विद्यावंत असला, तर लागलाच उंच वर्णांतही प्रवेश होई. जरी पहिल्यानें नीच वर्णामध्येंच एखाद्याचा प्रवेश झाला, तरी अखेरीज उंच वर्णांचें पदही त्यास किंवा त्याच्या संततीस हवें असल्यास मिळू शके.

मनूच्या नांवाची श्रुतींत प्रशंसा केली आहे खरी. तरी ऋषी कांहीं आपणास मनूची संतति समजत नसत. ऋषींचा झोंक भृगु वगैरे प्रजापतींप्रमाणें मनु हा एक स्वतंत्र प्रजापति मानण्याकडेस अधिक आहे. मनु हा एक प्रजापति मानितात, व पहिला राजा मानितात. मनूपासून सूर्यवंशाचे राजे मुलाकडून निघाले व सोमवंशातले मुलीकडून निघाले, अशी आख्यायिका आहे. या आख्यायिकेवरून जितका मनूचा व क्षत्रियांचा संबंध ठरतो, तितका मनूचा व ब्राह्मणांचा ठरत नाहीं. सूर्यवंशाबरोबर ब्राह्मणांचा थोडाबहुत संबंध पूर्वीच्या काळीं होता, यांत कांहीं शंका नाहीं; कारण हरिश्चंद्र वगैरे राजे येतात, ते इक्ष्वाकु वंशाचे असून, इक्ष्वाकु वंश हा मनुवंशाचा एक फांटा होय. तरी कुरुक्षेत्रांतील लोक आपणांस सोमवंशी समजत, व कुरुक्षेत्राचा ब्राह्मणांबरोबर व ब्राह्मणी धर्माबरोवर विशेष संबंध जडल्यामुळें, सोमवंशाचें माहात्म्य जसें ब्राह्मणांच्या ग्रंथांत वाढलें तसें सूर्यवंशाचें वाढलें नाहीं. सूर्यवंशाचें माहात्म्य थोडें वाढलें, ब्राह्मणी धर्म आर्यावर्तांतून कोसल लोकांमध्यें पसरला तेव्हां. आर्यावर्तांतून ब्राह्मणी धर्म पहिल्यानें कोसलांत पसरला, व अनेक कारणांनीं कोसलांतील सूर्यवंशी राजांचाही संबंध त्या धर्माबरोबर पुष्कळ जडला. हा संबंध पुढें जडला व पूर्वी फारसा नव्हता, ह्मणून निराळे प्रवर राजांस लावणें असल्यास मानव, ऐल व पौरूरवस हे लावावे, असें सूत्रकारांनीं[33] ठरवून एका सोमवंशाचा मात्र उल्लेख केला आहे. तेव्हां सूर्यवंश व सोमवंश हे दोन्ही राजांचे वंश जरी मनूपासुन निघालेले, तरी ब्राह्मणांच्या सात गोत्रांचा मनूबरोबर संबंध नसून, सात गोत्रांचे ऋषी मनूपासून भिन्न होते, असा निदान ब्राह्मणांचा तरी पूर्वीचा समज दिसतो. राजे व 'राजन्य '=राजांचे संबंधी असत, ते आपणास मनूचे वंशज समजत, यांत तर कांहीं शंका नको. असें आहे, त्यापक्षीं मनूचे वंशज ब्रह्मावर्तांतील क्षत्रियाहून मूळचे भिन्न होते. लाटिन भाषेंत 'राजन्' किंवा 'राज्' शब्द आहे, पण 'क्षत्रिय' किंवा क्षत्र' शब्द नाहीं; कां तर, जे लोक पश्चिमेकडेस पहिल्यानें पसरले, त्यांच्यामध्यें 'ब्राह्मण' शब्दाप्रमाणें 'राज्' किंवा 'राजन्य' शब्द होता, पण 'क्षत्र' किंवा 'क्षत्रिय' शब्द नव्हता. पुढें कांहीं काळानें ब्रह्मवर्तांतील 'क्षत्र'व 'क्षत्रिय' हे शब्द वापरणारे लोकही पश्चिमेकडेस पसरले. हे लोक पसरल्यामुळें 'द्रुद्यु' (Darius) च्या शिलालेखांत[34] 'क्षत्र' शब्दापासून क्षि = राज्य करणें, या धातूपासून निघालेला शद्ब राजाचा वाचक झालेला वाचण्यांत येतो. "शहा" व "पादशाहा" सिंहासनवाला शहा किंवा (बादशाहा) हे शद्ब या "क्षि" धातूपासून निघालेले होत. पहिल्या वसाहतींतून लाटिन भाषा बोलणारे लोक निघाले, व दुसऱ्या वसाहतींतून साक्सन भाषा बोलणारे लोक निघाले, म्हणून पूर्वीच्या भाषेंत rex rego हे शब्द ऐकण्यांत येतात, व दुसऱ्या भाषेंत King, can हे शब्द ऐकण्यांत येतात.

या गोष्टींचा विचार करितां, ऋषी होते ते मनूच्या संततीपैकीं समजण्याचा संप्रदाय नव्हता. आंगिरस, भृगु व कश्यप यांची संतति मनुसंततीहून निराळी

समजण्यास हरकत नाहीं. पण कौशिक गोत्र कुशापासून निघालेलें, व कुश हा रामाचा मुलगा समजतात. वसिष्ठाचा व मनुसंततीचा संबंध पुष्कळ होता. अत्रि गोत्र मूळचें दंडकारण्यांतील असून, सोम हा अत्रीचा मुलगा समजतात. तेव्हां कौशिक, वसिष्ट व अत्रि हीं तीन गोत्रें निःसंशय मनुसंततीपैकीं होत. अगस्ति हा द्राविडी भाषेचा अगदीं पहिला व्याकरणकार समजला जातो, त्यापक्षीं हें गोत्र दनुसंततीपैकीं होतें. आंगिरस गोत्र गंधर्वांची संतति आह्मीं समजतों. भृगु गोत्र असुरांची संतति असून, काश्यप गोत्र सर्पांची संतति होय. याप्रमाणें मनु, दनु, गंधर्व, असुर व सर्प या पांच मोठ्या जनांतील लोक मिळून, ऋषी व ऋषींची संतति झाली.

या पांच मोठ्या जनांपैकीं दानव, असुर व सर्प या तिहींनीं ब्राह्मणांस व ब्राह्मणधर्मास बराच त्रास दिलेला आढळतो, त्यापक्षीं ब्राह्मणी धर्मामध्यें न मिसळलेले असे या तीन्ही जनांमध्यें लोक पुष्कळ होते. तरी असुरांची मुख्य देवता वरुण ब्राह्मणी धर्मांत येते. "सर्पांनीं सत्रें केलीं" अशींहीं वचनें श्रुतींत येतात. सोम व अग्नि या दोहोंचा लाभ ऋषींस गंधर्वांपासून झाला. सोमास व अग्नीस न मानणारेही गंधर्व पुष्कळ होते. पण या गंधर्वांनीं ब्राह्मणांस व त्यांच्या धर्मास त्रास दिलेला ऐकिवांत नाहीं. मनुसंततिही ऋषींच्या बाहेर पुष्कळ असली पाहिजे. तरी ब्राह्मणांमध्यें व ब्राह्मणधर्मामध्यें जसा मनुसंततीचा भरणा होता, तसा दुसऱ्या कोणाचा नव्हता. हा मनुसंततीचा भरणा विशेष असल्यामुळें " मनुष्य, मानुष, मनुज, मानव " हे शब्द मनुष्यमात्राचे संस्कृत भाषेंत वाचक झाले. अशी स्थिति असल्यामुळें संस्कृत भाषेचें जें या काळचें अति जुनाट रूप, त्यास "मानवी रूप" असें नांव दिल्यास साजेल. हें मानवी रूप ज्या काळीं जिवंत होतें, त्या काळीं लोकांच्या विभागाचा वाचक शब्द 'जन' हा होता. मऱ्हाठे, गुजराथी, कानडी वगैरे लोकांचे विभाग जसे आपण करितों तसे 'पांच विभाग' या काळीं लोकांचे करीत, व त्यांस 'पंचजन' (पांच जन) ह्मणत. हे 'पंचजन' कोणते तें ठरविणें मोठें जोसिमाचें काम आहे. पण मनु, दनु, गंधर्व, असुर व सर्प हे ते 'पांचजन' समजण्यास फारसा प्रत्यवाय दिसत नाहीं.

संस्कृताचें मानवी रूप अगदीं शुद्ध नव्हतें, हें वरील लेखावरून सिद्ध झालेंच. मानवी रूप असें नांव या रूपास दिलें, तें मानवी लोकांचे शब्द त्यांत पुष्कळ होते ह्मणून दिलें. या मानवी रूपांत गंधर्वांच्या वगैरे भाषांतील थोडे बहुत शब्द नव्हते, असें नाहीं. पण विशेष भरणा होता मानवी शब्दांचा. सारांश, ऋषी जसे अठरा धान्याचें कोडबोळें होते, तशी त्यांची भाषाही निःसंशय अठरा धान्याचें कोडबोळें होती.

हातास एक 'हात' शब्द असला ह्मणजे दुसरा शब्द असण्याची जरूरी नाहीं. पायास एक 'पाय' शब्द असला ह्मणजे दुसरा शब्द कशास हवा? डोळ्यास एक 'डोळा' शब्द असला ह्मणजे पुष्कळ झाला. असें असतां, संस्कृत भाषेंत पर्याय शब्दांचें बाहुल्य आहे, त्यावरून ती भाषा ज्यांची पूर्वीच्या काळीं होती ते निःसंशय अठरा धान्याचें कोडबोळें होते. पांच मुख्य जनांतील लोक मिळून ऋषिसंतति झाली, असा लेख वर आलाच आहे. पण मुख्य जन होते, त्यांच्यामध्यें आणखी अवांतर जन होतेच. मऱ्हाठे दरोबस्त मिळून एक मोठा जन होतो. पण कोंकणी व देशुरे असे दोन मुख्य अंतर्भेद होऊन, प्रत्येकाचे पोटभेद आहेतच. कित्येक लोक 'पाय' शब्द वापरीत, कित्येक 'अंघ्रि' शब्दाचा प्रयोग करीत. कित्येकांच्या वापरण्यांत 'चरण' शब्द येई. हे तिन्ही लहान लहान जन होते ते मिसळून गेले, तेव्हां त्यांच्या संततीमध्यें 'पाद, अंघ्रि' व 'चरण' हे तिन्ही शब्द एकाच अर्थाचे वाचक राहिले.

कित्येक शब्द पुढें केवळ ऋषींनीं मंत्र करितांना निर्माण केले. 'अग्नि' हा मुळचा शब्द पुष्कळ झाला. पण ऋषींनीं कवितेंत 'शोचिष्केश' शब्द वापरला. 'शोचिस्'=ज्वाळा याच ज्याचे 'केश' तो 'शोचिष्केश'. 'कृष्णवर्मा, उषर्बुध' वगैरे शब्द झाडून ऋषींनीं निर्माण केलेले. 'इंद्र' हा मुळचा एका देवतेचा वाचक शब्द. यासच पुढें ऋषी मंत्रांमध्यें 'मरुत्वान्, वज्रपाणि, पुरंदर, गोत्रभिद्' वगैरे शब्द लावूं लागले. अशा रीतीनें ऋषींनीही मंत्र रचून शेंकडो शब्द निर्माण केले. या एका

मुयाचा सूक्ष्म विचार करितां, संस्कृताच्या मानवी रूपांतील शब्द फारच परिमित असले पाहिजेत.

## ८—त्रयी.

मेध किंवा सोम, इष्टि व स्तोम हे तीन यागाचे स्वतंत्र प्रकार पूर्वी उल्लेखिण्यांत आले आहेत. अग्नीचा लाभ झाल्यापासून तिन्ही प्रकारांत हळू हळू त्याचा प्रवेश झाला इतकेंच नाहीं, तर अग्नि हाच देवांचें व पितरांचें "मुख" ठरला. जें कांहीं देवांस किंवा पितरांस द्यायाचें; तें अग्नीच्या द्वारें देऊं लागले. त्यामुळें अग्नि जसा "हव्यवाहन" तसाच "कव्यवाहन" झाला.

कांहीं वर्षांनीं या तिन्हीं प्रकारांमध्यें अंगांगिभावाची कल्पना झाली. "क्रतु" ज्यास ह्मणतात, त्यांत हे तिन्ही प्रकार अंगभूत आहेत. जे मंत्र मेधांत ह्मणत, त्यांस "यजुस्" हें नांव होतें. "यजुस्" शब्द "यज्" = यज्ञ करणें, या धातूपासून आलेला. जे मंत्र इष्टींत ह्मणत, त्यास "छंदस्" हें नांव मिळालें होतें. "छंदस्" शब्दाचा मूळचा अर्थ "मनाचा ओघ" असा होता, व हा "छंदस्" शब्द "स्वच्छंद" वगैरे शब्दांत आपणास आढळतो. स्तोमांत ज्या मंत्राचा प्रयोग होई, त्यास "सामन्" ह्मणत. "सामन्" हा शब्द मूळचा गाण्याचा वाचक असावा.या तीन प्रकार मानणाऱ्या लोकांचा मिलाफ होऊन गेल्यामुळें तिन्ही प्रकार एकमेकांत मिसळून जाऊन "क्रतु" शब्द निघाला.

याप्रमाणें क्रतूमध्यें सामें, छंदें व यजुषें या तिहींचीही जरूरी लागूं लागली. मेधामध्यें किंवा सोमामध्यें अग्नीचा प्रवेश झाला, तेव्हांपासून यजुषांचें माहात्म्य मावळूं लागलें. सामांचें माहात्म्य ब्राह्मणांनीं विशेष ठरविलें आहे. सामवेद व ऋग्वेद या दोहोंमध्यें सामवेद विशेष माहात्म्याचा, अशा अभिप्रायाच्या श्रुती आहेत सामवेद हा सूर्यापासून निघालेला समजतात. सामवेदाच्या शाखा हजार मानण्याचा संप्रदाय आहे. सारांश, सामें अति प्राचीन काळीं केव्हां तरी एकदा इतकीं पसरलीं होतीं कीं जिकडे तिकडे सामांचेंच माहात्म्य श्रवणीं पडत असे. प्रत्येक सामाचे तीन भाग केलेले असत. "साम" हें एका प्रकारचें गाणें होतें, असें पूर्वी उल्लेखिण्यांत आलें आहे. आपल्या गाण्याचे तुकडे पाडलेले असतात, त्यांस "कडवीं" ह्मणतात. पहिलें कडवें असतें, त्यास "ध्रुपद" ह्मणतात. हें पुनः पुनः प्रत्येक कडव्याच्या शेवटीं गाण्याची वहिवाट आहे. बाकीचीं कडवीं असतात, त्या सर्वांस मिळून "अंतरा" शब्द लावितात. प्रत्येक सामाचे तीन तुकडे केलेले असत. आरंभाच्या तुकड्यास "प्रस्ताव" = आरंभ, ह्मणत. मधल्या तुकड्याचें नांव "उद्गीथ" असावें. शेवटच्या तुकड्यास "प्रतिहार"=शेवट, म्हणत. याप्रमाणें प्रत्येक सामाचे तीन तुकडे केलेले असत. हे तीन तुकडे गाणारे ऋत्विज क्रतूमध्यें निरनिराळे असत. प्रस्ताव गाई त्यास "प्रस्तोता" म्हणत. "उद्गाता" असे, तो उद्गीथ गाई. प्रतिहार गाणाराचें नांव "प्रतिहर्ता" होतें. क्रतूमध्यें होम करण्याचें काम "अध्वर्यु" करी. दुसरी उठण्या बसण्याची खटपट असे, ती "प्रतिप्रस्थाता" करी. छंदें म्हणून देवतांस बोलविण्याचें काम "होता" नांवाचा ऋत्विज असे, तो करी.

क्रतू उत्पन्न झाल्यानंतर कांहीं वर्षांनीं मूळचीं सामें लुप्त झालीं, व छंदांचें व छंदांबरोबर अग्नियागाचें माहात्म्य वाढत चाललें. "होते" होते, त्यांनीं सामाच्या ऐवजीं छंदांचाच प्रयोग उद्गात्यांजवळून करविण्याचा परिपाठ घातला. त्यामुळें सामवेद्यांस "छंदोग"=छंदें गाणारे, असें नांव मिळालें.

लौकरच कर्मकांड व त्याच्याबरोबर ब्राह्मणांचें माहात्म्य वाढत चाललें. "छंदस्" शब्द होता, त्याचा लोप होऊन, "ऋच्" शब्दाची प्रवृत्ति झाली. "ऋच्" ह्मणून एक "स्तुति करणें" या अर्थी धातु आहे, त्याच्यापासून "ऋच्" शब्द निघाला; व जे ऋचांचें अध्ययन करूं लागले, त्यांस "बव्हृच" शब्द लावण्यांत येऊं लागला. बव्हृचांमध्यें शौनक नांवाचा मोठा आचार्य झाला. "ऋच्" शब्दाची प्रवृत्ति झाल्यापासून, नवे मंत्र ऋग्वेदाचे फारसे रचले गेले नाहींत. एका शौनकानें मात्र कांहीं नवीन छंदें बरींच रचलीं, व "ऋषि" म्हणवून घेतलें. दुसरेही कांहीं "ऋषी" या काळीं होते. पण त्यांमध्यें अधिक नांवाजलेला शौनक होय.

शौनकापर्यंत मंत्रकाळ किंवा ब्रह्मकाळ होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण शौनकाच्या पश्चात् लौकरच संहिताकाळास व ब्राम्हणकाळास आरंभ झाला. शौनकाच्या पश्चात् कांहीं वर्षांनीं वेद-

व्यास झाला. वेद्व्यासाचें मूळचें नांव कोणतें होतें, तें समजत नाहीं. "वेदांचा संग्रह" केला, म्हणून वेद्व्यास हें नांव मिळालेलें. वेद्व्यासाचे पूर्वी ऋचा होत्या, यजुषें होतीं व सामेंही होतीं. पण हे निरनिराळे मंत्र एकत्र करून वेद्व्यासानें निरनिराळे ग्रंथ केले व प्रत्येक ग्रंथास "संहिता" असें नांव दिलें. वेद्व्यासाचे पूर्वी दरोबस्त मंत्रांस मिळून ब्रह्म शब्द लावण्यांत येई. त्यामुळें वेद्व्यासाचे पूर्वीच्या काळास "मंत्रकाळ" किंवा "ब्रह्मकाळ" ह्मणण्यास हरकत नाहीं. मंत्रकाळास आरंभ केव्हां झाला तें बरोबर ठरविण्यास हवीं तितकीं साधनें हल्लीं नाहींत. तरी शौनक वगैरे ऋषी झाले, तो काळ मंत्रकाळाचा शेवट होय.

वेद्व्यासाचे काळीं "अथर्व" नांवाचे मंत्रही बरेच जमत गेले होते. अथर्व शब्दाच्या व्युत्पत्तीची भानगड करण्याच्या खटपटींत पडण्याची तूर्त जरूरी नाहीं. जारण, मारण वगैरे कर्मे करण्यांत अथर्वाचा पूर्वीच्या काळीं प्रयोग होत असे. तेव्हां अथर्वे अध्ययन करण्याचें काम पूर्वी पुरोहिताचेंच विशेष असावें. पुरोहितानें आपल्या यजमानाचें हित करायाचें, तें अथर्वाचा प्रयोग करून. क्रतूंतही क्वचित् मारण येतें, व "श्येन" वगैरे कांहीं याग आहेत, त्यांत केवळ मारण आहे. तरी तसलीं कर्मे त्रयींत फारशीं नाहींत. तीं सर्व अथर्वामध्यें येऊन, अथर्वें हीं मूळचीं पुरोहितासाठीं वाढत गेलेलीं असावीं, असा आमचा तर्क आहे.

वेद्व्यासाचे पूर्वीही "वेद" होते. पण आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद व वास्तुवेद अशीं चार वेदांचीं नांवें होतीं. "विद्या" हा शब्द "वेद" शब्दापेक्षां आम्हीं अधिक जुनाट समजतों. तेव्हां अगदीं मूळचे शब्द आयुर्विद्या, धनुर्विद्या, गांधर्वविद्या व वास्तुविद्या असे होत वास्तुविद्या=घर बांधण्याची विद्या. हे चार वेद जे वेद्व्यासाचे काळीं होते, त्यांच्या ऐवजीं ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असे चार वेद वेद्व्यासानें केले, व मूळचे मुख्य वेद होते, त्यांस "उपवेद" ठरविलें.

वेद्व्यासानें चार वेदांच्या चार संहिता रचिल्या; व त्या पैल, वैशंपायन, जैमिनि, सुमतु या चार शिष्यांच्या हवालीं अनुक्रमानें केल्या. पांचवी महाभारताची संहिता वेद्व्यासानें केली, व ती "सूत" जातीचा शिष्य होता, त्यास शिकविली. "सूताचा" मुलगा सौति झाला, त्यानें नैमिषारण्यांत ही संहिता व वेद्व्यासानेंच केलेली पौराणिक संहिता, अशा दोन संहिता शौनाकादिक ऋषींस सांगितल्या, अशी आख्यायिका आहे; त्यापक्षीं वेद्व्यासास शौनकादिक ऋषींच्या पूर्वी घालणें अधिक प्रशस्त दिसतें. वेद्व्यासानें मंत्र केलेले नाहींत. वेद्व्यास कांहीं ऋषि नव्हता. त्यानें निरनिराळे मंत्र गोळा केले, याच्या पलीकडेस दुसरें कांहीं केलें नाहीं. आह्मांस असें वाटतें कीं "सूत" हा वेद्व्यासाच्या पूर्वीचा असावा. "सूता"नें शौनिकादिकांस महाभारत व पौराणिक कथा सांगितल्या, तेव्हां त्या एकत्र केल्या गेल्या. महाभारत मूळचें २४००० होतें. पुढें वेद्व्यासानें महाभारताची संहिता केली, तीं आख्यानें व उपाख्यानें घालून पुष्कळ वाढविली. ही संहिता व पौराणिक संहिता अशा दोन संहिता वेद्व्यासानें आपला मुलगा शुक यांस पढविल्या. पाणिनीनें शौनकीच्या नांवाचें अभिधान केलें आहे. पण व्यासाचें नांव पाणिनीच्या सूत्रांत येत नाहीं, तें कात्यायनाच्या वार्तिकांत येतें. तेव्हां शौनक हा वेद्व्यासापेक्षां जुनाट असावा, असें जें अनुमान केलें आहे यास बळकटी येते.

याप्रमाणें निरनिराळे मंत्र एकत्र करून ब्राह्मणांस अभिमत अशा चार वेदांचा पाया घालणारा वेद्व्यास होय. पौराणिक संहितांचाही पाया घातला वेद्व्यासानें. सारांश, ब्राह्मणांच्या वेदांस व पुराणांस रूप दिलें अगदीं पहिल्यानें वेद्व्यासानें.

वेद्व्यासानें याप्रमाणें कर्मकांडाचा पाया घातला खरा. पण तो मजबूत पुढें कधींही झाला नाहीं. लौकरच यजुर्वेद्यांत दोन तट पडले— एक वैशंपायनाचा व दुसरा याज्ञवल्क्याचा. विदेह देशाची मिथिला नांवाची राजधानी असून, तींत जनक नांवाच्या वंशांतील राजांचें राज्य होतें. याज्ञवल्क्याची कर्मकांडावर बिलकूल श्रद्धा नव्हती. याज्ञवल्क्यानें यजुर्वेद्यांमध्यें दुफळी केली. याज्ञवल्क्याच्या फळीस शुक्लयजुर्वेद ह्मणूं लागले, व वैशंपायनाच्या फळीस कृष्णयजुर्वेद ह्मणूं लागले.

याज्ञवल्क्यानें जी नवी विद्या आणिली, तीस "पुरुषविद्या" असें नांव मिळालें. पूर्वी जी विद्या ब्राह्मणांजवळ होती, तीस "कर्मविद्या" असें आ-

पण ह्मणूं. कर्मविद्या जातिभेद मानी. कर्मविद्येनें चार वर्ण ठरविले होते. या काळीं ब्राह्मणानें क्षत्रिय न होण्याविषयीं व क्षत्रियानें ब्राह्मण न होण्याविषयीं कर्मकांड्याची विशेष सावधगिरी असे सर्वांत उत्तम वर्ण ब्राह्मण असून, ब्राह्मणाच्या खालीं क्षत्रियाचा पायरी, क्षत्रियाच्या खालीं वैश्याची पायरी व वैश्याच्या खालीं शूद्राची पायरी, अशी व्यवस्था कर्मकांडांनीं लाविली होती. ही व्यवस्था पुरुषविद्येचा अभिमान धरणाऱ्या याज्ञवल्क्य वगैरे ब्राह्मणांस बिलकूल मान्य नव्हती. उपासनामार्गास व ज्ञानमार्गास कोणत्याही वर्णाचा असला, तरी तो चालतो. जो उपासना करितो किंवा ज्ञान मिळवितो, तो सूद्र असला, तरी त्याचें सूद्रपण जातें. कर्मठ होते, त्यांस हें पुरुषविद्येचें निरूपण पसंत पडलें नाहीं. " पुरुष="सर्वज्ञ व सर्वशक्ति देव. त्याची जी " विद्या " ती " पुरुषविद्या. "

या पुरुष विद्येचा लाभ याज्ञवल्क्यास सूर्यापासून झाला, अशी आख्यायिका आहे. आह्मांस असें वाटतें कीं याज्ञवल्क्याचे काळीं सूर्याचे उपासक मगध, विदेह वगैरे देशांत पुष्कळ पसरलेले होते. या काळचे ब्राम्हण होते, त्यांचा मुख्य देव अग्नि होता व इंद्रही होता. सूर्याचीं सूक्तें थोडीं बहुत होतीं खरीं; पण तितक्यावरून सूर्याची उपासना या काळीं ब्राह्मणांमध्यें होती, असें समजणें बरोबर नाहीं. तेव्हां सूर्याची उपासना करणारे लोक जे ब्राह्मणांच्या मुलुखाच्या बाहेर सर्वत्र पुष्कळ पसरलेले होते, त्यांचा सत्संग याज्ञवल्क्यास झाला; व तेणेंकरून त्याची कर्मविद्येवरील श्रद्धा अजीबात उडाली.

याज्ञवल्क्याचा तट पडल्यापासून " ब्रह्म " शब्दाचा अर्थ पालटला. पूर्वी " ब्रह्म " ह्मणजे " याज्ञिक मंत्र " असा अर्थ होत होता. पण आतां " ब्रह्म " शब्द जगताच्या आदिकारणास लावूं लागले. " लोक जें ब्रह्म समजतात तें ब्रह्म " नव्हे, तर आपण ज्याचें निरूपण करितों तें ब्रह्म " अशा अभिप्रायाचीं वचनें उपनिषदांमध्यें अनेक ठिकाणीं येतात. कर्मकांडाचें प्रतिपादन करणारे जे तीन वेद त्यांस " अपरविद्या " = खालच्या पायरीची विद्या, व " पुरुषा"चें प्रतिपादन करणारी जी विद्या, तीस " परविद्या " = वरच्या पायरीची विद्या, अशीं नांवें उपनिषदांत मिळालेलीं आहेत. पुरुषविद्येचें प्रतिपादन ज्यांत केलेलें असतें तो भागही हळूहळू वेदाचें अंग समजला गेला ; व त्यास "वेदान्त"=वेदाचा " अंत "=शेवटचा भाग, अर्थात् उत्कृष्ट भाग, असें नांव मिळालें.

याप्रमाणें वेद व वेदांत असे पूर्वीच्या ब्रह्माचे दोन मोठे विभाग होऊन, ब्रह्म शब्द हळूहळू वेदान्तांतील तत्त्वास मात्र लागूं लागला. वेदान्त ज्या वेदाच्या भागांत असतो, त्यास " आरण्यक " ह्मणतात; कां तर, असल्या भागाचें अध्ययन "अरण्यां"त करण्याचा संप्रदाय पडला.समंजस लोक एकत्र बसत, व ब्रह्माच्या संबंधानें जो विचार करीत, त्यास उपनिषद् म्हणत. उपनिषद् शब्दाचा मूळचा अर्थ एकत्र बसलेली मंडळी होय. या मंडळीचे जे विचार पुढें प्रसिद्ध झाले, त्यांसही उपनिषद् शब्द हळूहळू लावण्यांत येऊं लागला. उपनिषदें हीं प्रायः 'आरण्यकां ' त असतात. 'आरण्यकें' क्वचित् स्वतंत्र असतात, पण पुष्कळ ठिकाणीं "ब्राह्मणां"मध्येंच ढकललेलीं असतात. संहिता ज्या वेदव्यासानें केल्या, त्यांतील मंत्रांचा विनियोग व संक्षिप्त व्याख्यान ज्यांत येई, त्यांस ' ब्राह्मणें ' ह्मणत. तेव्हां ब्राम्हणें हीं गद्यरूपी विवरणग्रंथ होत.

जितकीं म्हणून ब्राम्हणें आहेत तितकीं संहितेप्रमाणें ऋषींनीं ' पाहिलेलीं ' मानण्याचा संप्रदाय मीमांसकांचा आहे. पण हा संप्रदाय फारसा प्राचीन नव्हे. मीमांसकांचा संप्रदाय " संहिता, ब्राह्मण " व " आरण्यक " हे तिन्ही भाग सारखे प्रमाण मानण्याचा आहे. "कल्पसूत्रें" हे ग्रंथ विचारा अंतीं "ब्राह्मणां "सारखेच ठरतात.तरी "कल्पसूत्रें" हीं "ब्राम्हणां"च्या किंवा "आरण्यकां"च्या जातीचीं नव्हत,असें मीमांसक समजतात.पण पाणिनीय संप्रदायें "ब्राम्हण व कल्पसूत्रें" हीं एकाच वर्गांतील समजतो. "ब्राह्मण व कल्पसूत्रें" हीं ऋषींनीं पाहिलेलीं नव्हत,तर त्यांच्या " तोंडून निघालेलीं " होत, असें पाणिनीचें ह्मणणें आहे. सारांश, पाणिनीच्या मतें "ब्राह्मणें" व "कल्पसूत्रें " या दोहोंचीही मातब्बरी सारखीच. याप्रमाणें दोहोंचीही मातब्बरी सारखीच मानणें निःसंशय अधिक सोपपत्तिक दिसतें. जो " ब्राह्मणां"चा विषय तोच ' कल्पसूत्रां 'चा. जी व्यवस्था " ब्राह्मणां" नीं क्वचित् क्वचित् सोडून दिलेली असते, ती 'कल्पसूत्रां 'नीं लाविलेली असते. जसें "ब्राह्मण" यज्ञास

आवश्यक होय, तसेंच "कल्पसूत्र" ही होय. नुसत्या संहितेवरून यज्ञाची कोणत्याही प्रकारें तड लागणें नाहीं. तेव्हां दोहोंची मातब्बरी सारखीच मानणें अधिक सयुक्तिक होय. मंत्रांस प्राय: "पाहिलेले" असा शब्द पाणिनि लावितो. ऋषींनीं घोर तप केलें व तप पूर्ण झालें, तेव्हां मंत्र ऋषींस स्वतःच्या पुढें दिसले. ते जसे "दिसले" तसे त्यांनीं ध्यानांत ठेवून, आपल्या शिष्यवर्गास शिकविले. मंत्र हे ऋषींनीं "केलेले" नव्हत, तर "पाहिलेले" होत. प्रत्येक मंत्रामध्यें विलक्षण शक्ति असून, ते सर्व अनादि होत. त्यांस कोणी कर्ता नाहीं. ज्यांस मंत्र दिसले तो ऋषि. अशा प्रकारचा मंत्रांच्या संबंधानें व ऋषींच्यासंबंधानें आपल्या पूर्वजांचा प्राय: समज होता.पाणिनि तरी सर्व मंत्र'दिसलेले' समजत नाहीं. जीं छंदें शौनकादिक ऋषींचीं आहेत तीं त्यांनीं 'पाहिलेलीं' नव्हत, तर त्यांच्या 'तोंडून निघालेलीं' होत, अशा अर्थाचें पाणिनीचें एक सूत्र आहे. या सूत्राचा सूक्ष्म विचार केल्यास जशीं 'जुनीं ब्राह्मणें' व जुनीं कल्पसूत्रें पाणिनि समजतो, तशींच 'जुनीं छंदें' व 'नवीं छंदें' समजत होता, असें अनुमान निघतें. 'पूर्वींचे ऋषी अग्नीची स्तुति करीत व एव्हांचे ऋषीही करितात' अशा अभिप्रायाची एक ऋचा आपल्या रोजच्या ब्रह्मयज्ञांतही येते. 'परिशिष्ट' ह्मणून ऋचामय एक संहितेचा भाग असतो, त्यांत प्राय: फलश्रुति असते. या परिशिष्टाची व संहितेची मातब्बरी सारखीच, असें आपले दक्षिणी ब्राम्हण तरी समजत नाहींत. या मुद्याचा विचार करितां पाणिनीचें मत निराधार म्हणतां येत नाहीं.

याज्ञवल्कयाच्या पश्चात् ब्राह्मणांची यज्ञावरची श्रद्धा पुष्कळ कमी झाली. एक यज्ञ करणें ह्मणजे एका प्रकारें विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करणें होतें. या सव्यापसव्याचें माहात्म्य ब्राम्हणांमध्येंही मावळलें, व पाकयज्ञांस आरंभ झाला. सोमाची सर्व खटपट ब्राम्हणांस नकोशी झाली, व अग्निहोत्राचें लटांबरही त्रास देऊं लागलें. तेव्हां पाकयज्ञाची प्रवृत्ति ब्राम्हणांमध्यें पडली. "पाकयज्ञ" ह्मणजे घरांत रोज जो "पाक" सिद्ध होतो तोच घेऊन त्यांतून देवतांस आहुति देणें. या काळीं "बलिकर्म" व "ब्राह्मणभोजन" हीं दोन अपूर्व कर्में निघालीं. पूर्वींच्या काळीं देवतांस जी आहुति देत, ती अग्नींत टाकीत. या काळीं अग्नींत न टाकितां, देवतेच्या नांवानें जमिनीवरच आहुति ठेवण्याचा प्रघात पडला. "ब्राह्मणभोजन" म्हणजे "ब्रह्म" अर्थात् वेद जाणणारे जे ब्राह्मण वर्णांतील असतील त्यांस जेऊं घालणें. याप्रमाणें "हुत, प्रहुत" व "ब्रह्मणिहुत" हे तीन प्रकार पाक यज्ञाचे निघाले. "देवयज्ञ, भूतयज्ञ, पितृयज्ञ, मनुष्ययज्ञ" व "ब्रह्मयज्ञ" हे पांच पाकयज्ञ या काळीं प्रसिद्ध झाले. अग्निहोत्राच्या मुख्य देवता 'सूर्य' व "प्रजापति" प्रातःकाळीं, व "अग्नि" व "प्रजापति" सायंकाळीं. या दोहोंसही पाकयज्ञाच्या योगानें दररोज आहुति मिळूं लागली,त्यामुळें अग्निहोत्राची गरज उरली नाहीं.अग्निहोत्राच्या देवतांस दररोज आहुति मिळे, इतकेंच नाहीं, तर इतर देवतांसही मिळे. या "देवयज्ञा" नंतर लागलाच "भूतयज्ञ" ह्मणजे पूर्वींच्या देवतांस व इतर देवतांस "बलिहरण" होई. लागलीच पितरांच्या नांवानें आहुति ठेवीत. हे तिन्ही यज्ञ आपल्या वैश्वदेवांत दर दिवस होतात.याप्रमाणें तीन यज्ञ उरकले ह्मणजे जेवणाची वेळ झाली व या वेळीं कोणी पाहुणा आल्यास त्याच्या जातिगोताची विचारपूस न करितां अन्नदान होई. हा "मनुष्ययज्ञ". "ब्रह्मयज्ञ" ह्मणजे वेदाच्या ऋचा यथाशक्ति रोज ह्मणून ऋषींच्या नांवानें उच्चारपूर्वक पाणी सोडणें. जसे पूर्वीं अग्निहोत्र्यांचे "दर्श" व "पौर्णमास" होते, तसे या काळीं पाकयज्ञ्यांचेही होते. विवाह झाला ह्मणजे विवाहांतील अग्नि असे, तो पाकयज्ञी जपून ठेवीत; व अग्निहोत्राच्या खटपटींत बिलकूल पडतनासे झाले. या अग्नीस "औपासन" ह्मणत, व त्यांत मांसाचा होम कधींही करीत नसत. तांदूळ, सातू व तीळ या तिहींपैकीं कोणत्या तरी द्रव्यानें "औपासन" अग्नींत होम करावा,असें "गृह्य" सूत्रांत सांगितलें आहे.

याप्रमाणें यज्ञाच्या व अग्निहोत्र्याच्या ऐवजीं ब्राह्मणांनीं साध्या पाकयज्ञांची योजना केली, व तेव्हांपासून यज्ञादिक खटपटीची पुराणांतल्या वांग्याप्रमाणें स्थिति झाली. या काळास सौत्र काळ किंवा स्मार्त काळ ह्मणतात. "गृह्य" सूत्रें या काळीं रचलीं गेलीं. "गृह्य" ह्मणजे गृहस्थांसंबंधीं. सर्व वैदिक खटपट सोपी व सुकर करून सर्वसाधा-

रण करण्याकडेस "गृह्य" सूत्रांचा कल असतो. याप्रमाणें जरी कर्मठांनीं बराच खटाटोप केला, तरी पुरुषविद्या वाढत चालली व उपनिषदांची रेलचेल होऊन गेली.

संहिताकाळ, ब्राह्मणकाळ, उपनिषत्काळ व स्मार्त काळ या चार काळांमध्यें फारसें अंतर नाहीं. संहिताकाळास वेदव्यासाच्या काळापासून आरंभ झाला, तेव्हांच ब्राह्मणकाळास आरंभ झाला. संहितांचा संग्रह होऊं लागला, तेव्हांच ब्राह्मणांचाही संग्रह होऊं लागला. ब्राह्मणांचा संग्रह होत असतांच, उपनिपत्काळास सुरवात झाली. याच समयास स्मार्त काळासही आरंभ झाला. तेव्हां श्रौत काळ व स्मार्त काळ या दोहोंमध्यें फारसें अंतर मानण्याची जरूरी नाहीं. "श्रुति" ह्मणजे संहिता, ब्राह्मणें व आरणें. या तिहींचा जो काळ, तो श्रौतकाळ. "स्मृति" ह्मणजे कल्पसूत्रें व गृह्यसूत्रें. या दोहोंचा जो काळ, तो स्मार्त काळ. वास्तविक पाहूं गेलें असतां स्मार्त काळास तरी आरंभ वेदव्यासानेंच जुनी पांडव कथा हातीं घेऊन करून ठेविलेला. तरी पहिल्यानें ब्राह्मणांची मंत्रांवर विशेष श्रद्धा असल्यामुळें, ऋषींच्या वचनांपुढें पांडवकथेचें तेज पडेना. तेव्हां श्रौत काळ व स्मार्तकाळ या दोहोंमध्यें फारसें पौर्वापर्य समजण्याची बिलकूल जरूरी नाहीं. एका प्रदेशांत श्रौत काळ होता, तेव्हांच दुसऱ्या प्रदेशांत स्मार्तकाळ होता अशा प्रकारें दोन काळांमध्यें सहभाव कल्पिणें अधिक सोपपत्तिक होय. श्रौतकाळ जिकडे होता तिकडच्या लोकांचें स्मार्त संप्रदायाकडेस विशेष लक्ष गेलें नाहीं; व स्मार्तकाळ जिकडे होता तिकडच्या लोकांचें श्रौत संप्रदायाकडेस फारसें लक्ष पोंचलें नाहीं. सारांश, श्रौत काळ व स्मार्तकाळ हे दोन्ही प्रायः निर्जीव काळ आह्मी समजतों. कांहीं ध्यानांत ठेविण्यासारिखा जीव दाखविला, एका याज्ञवल्क्यानें व त्याच्या फळीनें. तरी आरण्यकें व उपनिषदें हीं अरण्यांत अध्ययन करावीं लागत, व अवजड कर्मकांड संपल्यानंतर तीं हातीं येत, ह्मणून औपनिषद संप्रदायापासून व्हावा तसा फायदा आर्यांतील ब्राह्मणेतर वर्णांस झाला नाहीं. तशांत भारदस्त श्रौत खटाटोप सोडून देऊन सोप्या गृह्य धर्माची प्रवृत्ति झाली, ह्मणून उपनिषदांतल्या ब्रह्माकडेस विशेष लक्ष लावण्यास लोकांस सवड सांपडली नाहीं. सारांश, चांगला संप्रदाय केवळ ग्रंथांत राहून साधारण लोकांमध्यें त्याचा अंमल सांगण्यासारखा पसरला नाहीं.

संस्कृत हें नांव किती जुनाट आहे, त्याचा नीट पत्ता लागत नाहीं. हें नांव कांहीं मूळचें देशाचें किंवा लोकांचें नव्हे. संस्कृत नांवाचे लोक पूर्वीं प्रसिद्ध नव्हते, व संस्कृत नांवाचा देशही पूर्वीं प्रसिद्ध नव्हता. संस्कृत शब्दाचा अर्थ "नीटनेटकी केलेली" असा होतो. सारांश, संस्कृत नांव पावलेली भाषा एव्हांच्या मराठी, गुजराथी वगैरे भाषांप्रमाणें जिवंत झऱ्याचें पाणी पूर्वीं कधींही नव्हती. संस्कृतांत जेथें जेथें संस्कृत शब्द येतो, तेथें तेथें प्राकृत हाही शब्द येतो. तेव्हां संस्कृत हा शब्द होता, त्या काळीं प्राकृत हा शब्दही निःसंशय होता.

संस्कृत भाषा दोन प्रकारची आहे—वैदिक संस्कृत व लौकिक संस्कृत. वैदिक संस्कृत म्हणजे ज्या संस्कृतांत वैदिक ग्रंथ लिहिले गेले, तें संस्कृत; व लौकिक संस्कृत म्हणजे ज्या संस्कृतांत पांडवकथा वगैरे वेदव्यासानें लिहिल्या, तें संस्कृत. शौनक वगैरे ऋषी झाले, त्यांनीं छंदें केलीं तीं जागत्या भाषेंत केलीं, असें म्हणण्यास कांहीं आधार नाहीं. मंत्रकाळाच्या आरंभीं ज्या भाषेंत मंत्र रचले गेले, ती निःसंशय बरीच जागती असावी. पण अखेरीसही ती जागती होती, असें समजण्याची जरूरी नाहीं. पुरुषसूक्त वगैरे सूक्तें "दिसलीं" त्या काळीं जी पूर्वीं मंत्रांची भाषा होती, त्याच भाषेंत नवीन ऋषींस सूक्तें दिसलीं. नवीन ऋषी झाले, तेव्हां मंत्रांची भाषा जागती होती, असें म्हणण्यास प्रमाण काय? एकदा काव्याची भाषा पडली म्हणजे पडली. थोडे बहुत नवे शब्द पुढें झालेले कवी प्रसंग पाहून काव्यांत ढकलतात, हें खरें आहे. तरी जी भाषा पुढें कवी वापरतात, ती म्हणजे तशीच प्रयोगांत असते असें नाहीं. एव्हांही जो मराठींत कविता करितो, तो प्राचीन मराठी कवींचे व भाषेचे शब्द व रूढी जशा सांपडतात तशाच प्रायः उचलतो. पण तितक्यावरून ते शब्द व त्या रूढी एव्हांच्या काळीं जागत्या आहेत, असें कोणाच्यानेंही म्हणविणार नाहीं. हाच न्याय पूर्वींच्या काळास लागू करायाचा. मंत्रकाळाच्या आरंभीं मंत्रांची भाषा जागती

होती. पण पुढें जे ऋषी झाले, त्यांनीं त्या भाषेंतील शब्द व रूढी घेऊन प्रसंगीं कांहीं नवे शब्दही ढकलल, व नवे मंत्र रचले. याप्रमाणें हळू हळू मंत्रांची जी भाषा झाली, ती मंत्र करणारे व समजणारे जे झाले त्यांसच सुबोध होऊन, इतरांस दुर्बोध होत गेली. या मंत्रांच्या मूळच्या जागत्या पण लोकरच मंत्रांत मात्र राहिलेल्या भाषेस हळू हळू संस्कृत हें नांव मिळालें. सारांश, संस्कृत नांव पावलेली भाषा केवळ धर्म भाषा होय. ती कधींही जिवंत झऱ्याचें पाणी नव्हती. जें मूळचें मंत्रांच्या भाषेचें जागतें रूप होतें, त्यास संस्कृताचें मानवी रूप असें नांव दिल्यास साजेल; कारण ऋषींच्या गोत्रांमध्यें मनूच्या संततीची संख्या विशेष असल्यामुळें, त्यांच्या भाषेची छटा इतर गोत्रांच्या भाषेवर अधिक पडलेली असण्याचा संभव आहे.

ज्या काळीं पाणिनि झाला, त्या काळीं संस्कृतास स्वर होते. पाणिनि प्रत्ययादिकांचें विधान करितो, तें पुष्कळ ठिकाणीं स्वरसंहित असतें. हल्लींच्या काळीं ऐतरेयकांसारखीं कांहीं ब्राह्मणें व अरण्यकें आहेत, तीं स्वरांशिवाय आहेत. हे अस्वरित ग्रंथ निःसंशय "पाणिनि"-काळाच्या पश्चात् झालेले होत. असल्या ग्रंथांत जे वैदिक प्रयोग आढळतात, ते पूर्वीच्या वैदिक ग्रंथांच्या भाषेचें अनुकरण करून घातलेले, यांत कांहीं शंका नको. वैदिक संस्कृत व लौकिक संस्कृत या दोहोंमध्यें मोठा भेद हाच कीं पूर्वीचें स्वरित असतें व नंतरचें अस्वरित असतें.

"स्मार्त" काळाचे दोन विभाग होतात—पहिला सौत्र काळ व दुसरा पौराणिक काळ. सौत्र काळांतले ग्रंथ सूत्रमय किंवा गद्यमय होत. पौराणिक काळांतले ग्रंथ अनुष्टुब्बद्ध असतात. हल्लीं आपण स्मृति शब्द लावितों, तो वर्णाश्रमधर्म सांगणाऱ्या अनुष्टुब्बद्ध ग्रंथांस लावितों. कथामय जे ग्रंथ असतात, त्यांस पुराण शब्द लाविण्यांत येतो. या स्मृती व हीं पुराणें पौराणिक काळांत झालेलीं.

"पौराणिक" काळांतच काव्यकाळाचाही अंतर्भाव झाला पाहिजे. अनुष्टुभ् वृत्ताचा प्रायः त्याग करून, इतर वृत्तांत जे ग्रंथ रचले गेले, ते "काव्यें" झाले. "काव्य"संस्कृत हें लौकिक संस्कृताचेंच एक अधिक आर्वाचीन रूप होय

### ९—कालनिर्णय.

संस्कृत ही ज्या पक्षीं केवळ धर्म भाषा पडली, त्यापक्षीं तींत प्राचीन ऐतिहासिक ग्रंथ बिलकूल नाहींत; त्यांत कांहीं नवल नाहीं. पूर्वीच्या लाटिन, ग्रीक वगैरे भाषांत ऐतिहासिक ग्रंथ आहेत, कारण त्या जागत्या भाषा होत्या. जशा त्या त्या काळच्या लोकांच्या रोजच्या बोलायाच्या भाषा होत्या, तशा धर्मांच्या ही होत्या. संस्कृत ही केवळ धर्माची व धर्मगुरूंची भाषा पडली. तेव्हां तींत ऐतिहासिक ग्रंथ होणार कोठून ! जर संस्कृत जागती भाषा असती व ती रोज व्यवहारांत बोलणारे लोक असते, तर ऐतिहासिक ग्रंथ संस्कृतांत झाल्यशिवाय रहातेना.

अशी स्थिति संस्कृताची असल्यामुळें, कालानिर्णकरणें हें फारच जोखिमाचें काम होतें. संस्कृतांतील कालानिर्णयाचा सर्व एतद्देशीय भार बौद्धांच्या व जैनांच्या ग्रंथांवर पडतो. बिंदुसार वगैरे राजे मगधदेशाचे झाले, त्यांचीं प्राकृत भाषांमध्यें चरित्रें रचलेलीं होतीं. पण ब्राम्हणांचें व ब्राम्हणी धर्माचें जेथें जेथें पाऊल पडत गेलें, तेथून तेथून प्राकृत भाषांचा उठाव होत चालला; व त्यामुळें पूर्वींचीं चरित्रें लुप्त होऊन, नवीं चरित्रें लिहिण्यास उत्तेजन मिळालें नाहीं. तेव्हां बौद्ध व जैन यांच्या कडील माहिती व ब्राम्हणांच्या कांहीं दंतकथा यांच्यावर कालानिर्णय केला पाहिजे. थोडी बहुत मदत कालानिर्णय करितांना व्याकरण शास्त्राचीही मिळेल.

मोरे कुळींतील चंद्रगुप्त नांवाच्या राजाच्या हातीं मगधदेश गेला, तेव्हां शिकंदर नांवाचा पश्चिम दिशेस नांवाजलेला यवनांचा राजा पंजाबांत कांहीं दिवस तळ देऊन राहिला होता. या काळीं मगध देशांतील ब्राम्हण व क्षत्रिय यांच्यामध्यें तंटा लागला होता. नंद नांवाचे राजे मगध देशावर राज्य करीत होते, ते ब्राम्हणांचें पारडें फारसें वाढू देतना. तेव्हां ब्राम्हण त्यांचा द्वेष करूं लागले, व मोरे कुळींतील चंद्रगुप्त नांवाचा राजा होता, त्याच्या मदतीनें नंदांचें ब्राम्हणांनीं वाटोळें केलें, व मगध देश चंद्रगुप्ताच्या घरांत घातला. चंद्रगुप्त हा राजा मूळचा अवंति म्हणजे माळवा या देशाचा असावा. ब्राम्हणांमध्यें या काळीं चाणक्य नांवाचा पुढारी होता. आपल्या सूत्रांमध्यें मगध दे-

शांतील लोकांस व्रात्यांमध्यें घातलें आहे, त्यापक्षीं ब्राम्हणांच्याच मतें मगध देश आर्यावर्तांतील नव्हता, याविषयीं शंका नको. सारांश, मगध देशावर नंदांचें राज्य होतें, त्या काळीं ब्राह्मणांचा व त्यांच्या धर्माचा विशेष प्रसार तेथें झालेला नव्हता, व ब्राह्मणांचें वजनही फारसें राज्यप्रकरणीं लोकांमध्यें पडत नव्हतें. ज्या कात्यायनानें किंवा वररुचीनें पाणिनीच्या सूत्रांवर वार्तिकें रचिलीं, तो नंदांच्या कारकीर्दींत होता, अशी ब्राह्मणांमध्यें दंतकथा आहे. याच कात्यायनानें प्राकृतप्रकाश नांवाचें एक प्राकृत भाषांचेंही व्याकरण रचलें आहे. जर मोऱ्यांच्या कुळीनें ब्राह्मणांचा मान पुरा ठेविला असता, तर चंद्रगुप्तास व त्याच्या वंशजांस अस्सल क्षत्रियत्व निःसंशय मिळतें. पण चंद्रगुप्ताचा नातु अशोक हा मोठा पराक्रमी व चक्रवर्ती राजा झाला, व त्यानें धर्मप्रकरणीं जसा ब्राह्मणांस आश्रय दिला तसा बौद्धांसही दिला. अशी स्थिति झाल्यामुळें, ब्राम्हणांनीं चंद्रगुप्तास व त्याच्या वंशास शूद्रांमध्यें ढकललें. मोरे कुळीनें मगध देशावर १३७ वर्षें राज्य केलें. मोरे कुळीचा शेवटचा राजा बृहद्रथ झाला. त्याचा पुष्पमित्र नांवाचा सेनापति होता. पुष्पमित्रानें बृहद्रथाचा खून केला, व गादी आपण बळकाविली. या पुष्पमित्रास त्या काळचे अस्सल ब्राह्मण तरी अस्सल क्षत्रिय समजत. जर ते अस्सल क्षत्रिय पुष्पमित्रास न समजते, तर त्यास अश्वमेध करूं न देते, व त्याच्यापासून यज्ञांत दक्षिणा न घेते. शूद्रास यज्ञ करण्याचा अधिकार नाहीं, व त्याच्यापासून दक्षिणा घेणें हें मोठें पाप होय, असे लेख ब्राम्हणांच्या शास्त्रांत येतात. व्याकरणावरील महाभाष्याचा कर्ता पतंजलि हा महाभाष्यावरून पुष्पमित्राचा याजक ठरतो. यावरून पतंजलीच्या काळाचें स्थूल अनुमान करितां येतें. चंद्रगुप्ताचें व मोरे या राजकुळीचेंही नांव महाभाष्यांत आढळतें. पाणिनि व कात्यायन हे समानकालीन होते, अशी ब्राह्मणांमध्येंच आख्यायिका आहे. हवें असल्यास शंभर, दीडशें किंवा दोनशें वर्षांचें अंतर दोहोंमध्यें खुशाल कल्पावें. तेव्हां पाणिनीच्या काळाचेंही स्थूळ अनुमान होतें. पाणिनि झाला, तेव्हां संस्कृतास स्वर होते; इतकेंच नाहीं, तर पाणिनीच्या काळीं जशीं जुनीं ब्राह्मणें तशीं नवीं ब्राह्मणें व जशीं जुनीं कल्पसूत्रें तशींच नवीं कल्पसूत्रेंही होतीं. सारांश, श्रौत काळ शालिवाहनशकाचे पूर्वीं स[illegible] शतकें घातला ह्मणजे त्याच्या जुनाटपणाची पराकाष्ठा झाली. शौनक वगैरे बरेच ऋषी व वेदव्यास वगैरे मंडळी या काळाच्या पलीकडेस घालण्यांत बिलकूल अर्थ नाहीं. मंत्रकाळास आरंभ झाला केव्हां, याचा निर्णय करणें केवळ अशक्य होय. रामायण, महाभारत व हरिवंश या तिहींचा पाया निःसंशय जुनाट होय. कोसल देशच पहिल्यानें आर्यावर्ताच्या बाहेर पडतो. सूर्यवंश व कुरुवंश यांतील प्राचीन राजांस ब्राह्मणांनीं ब्राह्मणधर्मी केलें, जसें त्यांसच बौद्धांनीं बौद्ध केलें, व जैनांनीं जैन केलें. कौरवपांडवांमध्यें मोठा तंटा चालला, त्या काळचे राजे ब्राह्मणधर्मी नव्हते, बौद्ध नव्हते व जैनही नव्हते. अशा रीतीनें जुनाट राजांबरोबर संबंध लावून आपापल्या धर्माचें माहात्म्य वाढविणें प्रत्येक धर्माच्या भिक्षूंस इष्ट असतें. राम, कृष्ण वगैरे मंडळी देवतेच्या नांवानें बकरें किंवा घोडकेंही कापून खात होती, असें समजण्यास अडचण नाहीं. हल्लीं अविंधांमध्यें अजमेध रोज होतो, व कित्येक तातार लोकांमध्यें अश्वमेधाचेंही बरेच प्रसंग येतात. या प्रकारचे अजमेध व अश्वमेध कौरवपांडवांचे काळीं होते, असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. पण अठरा ऋत्विजांची मदत घेऊन सव्यापसव्य करीत बसणें हें मात्र त्या काळीं होतें, असें पुरावा करणें निदान आह्मांस केवळ अशक्य भासतें.

मंत्रकाळाचे दोन भाग केले पाहिजेत. ब्राह्मणांची जी टोळी पश्चिमेकडेस पसरली, तिचा गंधर्व असुर व सर्प या तिन्ही जनांबरोबर पुष्कळ संबंध जडला. पण पिशाच नांवाच्या लोकांनीं पंजाब वगैरे प्रांत बळकाविले, तेव्हांपासून ब्राह्मणी धर्माचें हिंदुस्थानांतील कर्मठ रूप पश्चिमेकडील कर्मठ रूपापासून निराळें पडलें. पिशाचांच्या स्वाऱ्या केव्हांपासून होऊं लागल्या, तें नीट कळत नाहीं. पण शौरसेनी भाषा मागधी व पैशाची या दोन्ही प्राकृत भाषांची प्रकृति कात्यायन समजतो, त्या पक्षीं शूरसेनांचा पूर्वीं कधीं तरी नर्मदेच्या उत्तरेस अंमल असावा; व तो क्षीण होऊं लागला तेव्हां पश्चिमेकडेस पिशाच व पूर्वेस मगध हे दोन लोक जोरावले, असें अनुमान निघतें. पिशाच हे मूळचे ब्राह्मण-

धर्मी नव्हत, याविषयीं शंका नको. शालिवाहनाच्या पूर्वी सातव्या किंवा आठव्या शतकांत पिशाचांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या, असें आपण समजूं. "पिशावर" हें मूळचें "पिशाचपूर" असून, तें हळू हळू पिशाचांची राजधानी समजलें गेलें, असें वाटतें. पिशाचांच्या स्वाऱ्या सुरू होऊन इकडील ब्राह्मणी धर्म निराळा पडल्यानंतर, कुरुक्षेत्रांतील यज्ञविध्वंस भरतें आलें, व सोमाची वगैरे खटपट वाढत चालली. एव्हांच्या आपल्या संहिता वगैरे श्रौत ग्रंथ उपलब्ध आहेत, ते प्राय: पिशाचांच्या स्वाऱ्यांनीं ब्राह्मणधर्मी लोक दुभागल्यानंतरचे. पश्चिमेकडेस जे ब्राह्मणधर्मी लोक निराळे पडले, त्यांच्या धर्मांत असुरांची छटा थोडीबहुत मारूं लागली, व ते "पल्हव" झाले. पिशाच होते ते कांहीं काळानें ब्राह्मणधर्मी झाले. तेव्हां या पिशाचांचे व पल्हवांचे धर्मसंबंधानें तंटे लागले. हे ब्राह्मणधर्मी "पिशाच" इतिहासांत "बाल्हीक" नांवानें नांवाजले. हल्लीं ज्यास "बल्ख" म्हणतात तो "बाल्हीक" शब्दाचा अपभ्रंश होय. देवांची जर प्राकृत भाषा नाटकामध्यें घालायाची[३३], तर ती "बाल्हीकी" असावी, असें आलंकारिक म्हणतात. पाल्हवी व बाल्हीकी या दोहोंचीही प्रकृति पैशाची समजावी. इतकेंच कीं बाल्हीकी होती, ती अधिक शुद्ध पैशाची होती. पाल्हवी होती, ती असुरादिकांच्या भाषेबरोबर पुष्कळ संकीर्ण झालेली समजावी. क्षहरात्र नांवाचा जो राजा शिलालेखांत येतो, तो मूळचा पिशाच असावा. ज्या वंशास शिलालेखज्ञ क्षत्रपवंश किंवा शाह्विंश म्हणतात, तो वंशही मूळचा पिशाचांचा होय. बाल्हीकांचा पहिला राजा देवदत्त याचा 'थिओडोटस' ( Theodotus) असा यवनांनीं अपभ्रंश केला आहे. बाल्हीकांची सत्ता क्षीण झाली, तेव्हां सिंधु नदीवरील पिशाच स्वतंत्र झाले, व त्या काळचा "चष्टन" नांवाचा 'क्षत्रप' होता, त्यानें राजा शब्द आपल्या नांवास जोडिला. क्षत्रप शब्दाचा मूळचा अर्थ सुभेदार होय. चष्टनाचा नातु रुद्रदाम यानें ब्राह्मणभोजनें घातलेलीं शिलालेखांत[३४] वाचण्यांत येतात. एव्हांच्या पारशांचा धर्म हें पल्हवांच्या धर्माचें पिलूं होय. पल्हवांची मूळची ऋतुविद्या आपल्या ऋतुविद्येप्रमाणें पिशाचांच्या स्वाऱ्या सुरू झाल्यानंतरची. जसे आपल्या एव्हांच्या संहितेंत कित्येक मंत्र पुष्कळ जुनाट आहेत, तसे पारशांच्या धर्मग्रंथांतही असतील. पण हल्लीं जो पारशांचा कर्मकांडात्मक मंत्रसमाम्नाय आहे, तो जवळ जवळ ख्रिस्त शिकंदराच्या पाठून तीनशें वर्षांनीं झालेला असावा.

१०—ब्राह्मणी धर्म हा व्यक्तिनिष्ठ धर्म नव्हे.

भूपृष्ठावर आज जे धर्म विराजमान आहेत, ते प्राय: व्यक्तिनिष्ठ धर्म होत. ख्रिस्ती, महंमदी वगैरे धर्म व्यक्तिनिष्ठ होत. ख्रिस्त नांवाचा एक पुरुष झाला व महंमद नांवाचाही एक पुरुष होऊन गेला. ख्रिस्त नांवाच्या व्यक्तिविशेषानें जो धर्म स्थापिला, तो ख्रिस्ती धर्म. बौद्ध व जैन हे धर्मही व्यक्तिनिष्ठ होत. मोशे नांवाचा एक पुरुष झाला, त्यानें जो धर्म स्थापिला, तो यहुदी धर्म. जरत्स्तोत्र नांवाच्या पुरुषानें जो धर्म स्थापिला, तो पारशांचा धर्म. ख्रिस्तास मानल्याशिवाय स्वर्ग नाहीं, हें ख्रिस्त्यांचें म्हणणें. महंमदास पैगंबर समजणार नाहीं, तो नरकीं जाईल, हें अविंधांचें म्हणणें. बौद्धांचा, जैनांचा, यहुद्यांचा व पारशांचाही सिद्धांत असाच. त्या त्या व्यक्तीवर व त्या त्या व्यक्तीच्या वचनावर विश्वास ठेविला नाहीं, तर स्वर्गसुख नाहीं, हा अशेष व्यक्तिनिष्ठ धर्मांचा सिद्धांत होय. ब्राम्हणी धर्म हा मूळचा व्यक्तिनिष्ठ धर्म नव्हता, व हल्लींही व्यक्तिनिष्ठ धर्म नाहीं. रूमी लोकांचा व यवन ( ग्रीक ) लोकांचा, हेही धर्म व्यक्तिनिष्ठ नव्हते. हे सर्व धर्म जातिनिष्ठ होत. ब्राह्मणी धर्म हा मूळचा, ब्रह्म नांवाचे जे लोक ब्रह्मावर्तांतील होते त्यांचा धर्म होता. पुष्कळ काळ लोटल्यावर जाती ऐकान्तिक होऊन बसल्या, तेव्हां ब्राह्मण नांवाची विशिष्ट जात उत्पन्न झाली; व त्यामुळें जातिनिष्ठपणा धर्माचा विगलित होऊन, जातिविशिष्टनिष्ठपणा त्यास आला. हा जातिविशिष्टनिष्ठपणा पूर्वींच्या मिस्र देशांतील धर्मांत मात्र होता. मिस्र देशांतील लोकांमध्यें[३५] पूर्वींच्या काळीं पुजारी, शिपाई, पशुपाळ, डुकरपाळ, व्यापारी, दुभाषी व नावाडी अशा सात जाती असून, पुजाऱ्यांच्या जातीच्या हातीं धर्माची सर्व कळ असे, व ब्राम्हणी धर्मांतल्या एव्हांच्या जातींप्रमाणेंच या जाती जरी अगदीं पूर्वी ऐकांतिक नव्हत्या, तरी शेंकडो वर्षांनीं पुढें ऐकांतिक होऊन पडल्या होत्या. या पूर्वींच्या मिस्री धर्मास सोडून ब्राम्हणी धर्मा-

सारखा दुसरा जातिविशिष्टनिष्ठ धर्म या भूमंडळावर ऐकिवांत किंवा वाचण्यांत नाहीं.

आपल्या हिंदुस्थानांत उपास्यनिष्ठ धर्मही बरेच आहेत. ज्यांचा उपास्य शिव, त्यांस शैव म्हणतात; व ज्यांचा उपास्य विष्णु, त्यांस वैष्णव म्हणतात. ब्राम्हणी धर्म हा मूळचा उपास्यनिष्ठ धर्म समजण्यासही हरकत नाहीं. जितके मंत्र म्हणून होते, तितक्यांचें 'ब्रम्हन्' हें समूहार्थी नांव होय. हें 'ब्रह्मन्' ज्यांचें उपास्य ते ब्राम्हण, व ब्राम्हणांचा जो धर्म तो ब्राम्हणी धर्म, अशी व्युत्पत्ति निदान आम्हांस अधिक मनोरम वाटते. सारांश, ब्राम्हणी धर्म व वैदिक धर्म हे शब्द पर्याय होत.

११—ब्राम्हणी धर्माचीं प्राचीन काळचीं स्वरूपें.

अति प्राचीन काळीं "मेध" हें ब्राह्मणी धर्माचें स्वरूप होतें. हें मेध्य स्वरूप जेव्हां अग्नीचा लाभ झाला, तेव्हां बरेंच पालटलें. पुरुषमेध बंद झाला, तेव्हां मेधाचें एक मुख्य अंगच गळलें. मेध्य स्वरूप व आग्नेय स्वरूप या दोहोंचा काळें करून मिलाफ झाला. पुढें भात पिकणाऱ्या मुलखांतील लोकांबरोबर संबंध जडला, व त्यामुळें "इष्टि" नांवाच्या अपूर्व स्वरूपाचीही ब्राह्मणी धर्मावर सावली पडली. तरी एक कर्ममार्ग काय तो याकाळीं ब्राम्हणांस माहित होता. सारांश, वर निर्दिष्ट केलेलीं सर्व स्वरूपें कर्मठ होत.

पुढें आर्यावर्ताच्या बाहेर ब्राम्हण पसरले, तेव्हां पुरुषविशेषीं विशेष परिचय ठेवणाऱ्या लोकांबरोबर त्यांचा परिचय होऊं लागला. त्यामुळें ज्ञानकांडाची प्रवृत्ति होऊन, ब्रम्हमय स्वरूप ब्राम्हणी धर्मास एक अपूर्व मिळालें. हीं ब्राम्हणी धर्माचीं स्वरूपें सगळीं "श्रौत" होत. पुढें यज्ञाचें सव्यापसव्य हळू हळू ब्राम्हणांनीं सोडून दिलें, व "स्मार्त" स्वरूपाचें परिधान ब्राम्हणी धर्मास घातलें.

उपनिषदें व आरण्यकें यांचें अध्ययन अरण्यांत होऊं लागलें, व क्रतू वगैरे करून उतार वयांत औपनिषद् संप्रदायाकडेस लक्ष पोंचविण्याची वहिवाट पडली, त्यामुळें त्या संप्रदायापासून व्हावा तितका फायदा लोकांस झाला नाहीं, हें पूर्वीं सांगण्यांत आलें आहे. अशी स्थिति झाल्यामुळें बुद्धाच्या धर्मास अवकाश मिळाला. रूढि निराळी व शास्त्र निराळें, हा संप्रदाय ब्राम्हणांनींच घातला. शास्त्रांत ब्राम्हणांचा व अब्राम्हणांचा बेटीव्यवहार सांगितलेला होता, व हळूहळू शूद्रास वरची जात मिळते, असाही उल्लेख होता. काहीं पिढ्या गेल्या म्हणजे कडू असतात ते गोडे होऊन, त्यांस जनकाच्या जातींचा लाभ होतो, असें कित्येक श्लोकमय[३६] स्मृतींतही आढळतें. पण रूढि हळूहळू निराळी पडली किंवा पाडली. क्षत्रिय व वैश्य हे वर्ण समूळ नाहींसे झाले, असें ग्रंथांत लिहून ठेविण्याची रूढि ब्राम्हणांनींच पाडली, व बौद्ध धर्माचा मान ठेविणाऱ्या मोऱ्यांस ग्रंथांत शूद्र ठरवून ठेविलें. विदेहांतील मूळचे लोक, मगध देशांतील मूळचे लोक, आंध्र देशांतील मूळचे लोक, कलिंग देशांतील मूळचे लोक, अवंति देशांतील मूळचे लोक झाडून संकीर्ण ठरविले, व त्यांच्याबरोबर रोटीव्यवहारही बंद पाडिला. अशा अनेक निमित्तांनीं बौद्ध धर्मास पसरण्यास चांगली सवड सांपडली.

बुद्ध हा मूळचा राजपुत्र होता. ब्राह्मणांनीं चार ज्ञाती जवळ जवळ रूढींत तरी ऐकांतिक करून ठेविल्या होत्या. बौद्ध धर्मांत त्यागी व संसारी या काय त्या दोन जाती झाल्या. जो संसारी विरक्त झाला असेल, त्यानें खुशाल त्यागी व्हावें व भगवें परिधान करावें. हें भगवें एकदां परिधान केलें व सांसारिक सुखावर लाथ मारली, म्हणजे मूळचा कितीही निकृष्ट जातीचा किंवा धंद्याचा असला, तरी तो राजास देखील वंद्य झाला. याप्रमाणें शास्त्र व रूढि या दोहोंमध्यें बिलकूल अंतर न ठेविल्यामुळें, बौद्ध धर्म पसरूं लागला. बुद्धानंतर शें दीडशें वर्षांनीं जैन धर्माचा स्थापक महावीर जन्मला. महावीर जन्मला त्या काळीं मगध देशावर नंदिवर्धन नांवाच्या राजाचें राज्य होतें. बौद्ध व जैन या दोहोंमध्यें मोठा भेद हा कीं बौद्धापेक्षां जैन अधिक अहिंसावादी होत. जितकें जैनांनीं अहिंसेकडेस लक्ष पोंचविलें, तितकें बौद्धांनीं पोंचविलें नाहीं. ब्राम्हणांच्या समजाप्रमाणें इंद्र पडला संसारी. त्यास बायको होती, मुलगा होता, हत्ती होता व सर्व कांहीं संसाऱ्यास असतें, तें होतें; म्हणून बौद्धांनीं व जैनांनीं आपल्या बुद्धाची व जिनाची पायरी इंद्राच्या वरची ठरविली.

बुद्धाच्या पूर्वीं व जिनाच्या पूर्वीं जें ब्राम्हणधर्मी नव्हते, ते प्राय: शैव होते. शिव हें मूळचें सूर्याचें

स्वरूप होय. जगताचें कल्याण करणारा म्हणून सूर्यास शिव हें नांव मिळालें. बाप न समजतां आई समजणें ज्यांस अधिक इष्ट होतें, त्यांनीं "शिवा" असें स्त्रीलिंगीं स्वरूप सूर्यास दिलें. दराबेस्त योगी शिवास आद्य गुरु समजतात. शिवलिंग हें सूर्याचें 'लिंग' = सूचक, व 'पिंडी' = आकाश. या असलच्या स्वरूपांत अश्लीलता बिलकूल भासत नाहीं. आकाशांत जसा सूर्य असतो, तसें पिंडींत लिंग ठेवण्याचा संप्रदाय पडला. ज्ञान व ध्यान हीं देवाचा लाभ करून घेण्याचीं साधनें मूळचीं शैवांचीं होत. याज्ञवल्क्य सूर्यास शरण गेला, या दंतकथेंतही शिव व सूर्य आम्हीं अभिन्न समजतों. शिव हा असुरांचा देव, अशी पौराणिक प्रसिद्धी आहे. शिव, सुर व बार हे तीन्ही शब्द असुरांच्या शिलालेखांत पर्याय मानिले जातात. "बार" हें "विराचन" = सूर्य या संस्कृत शब्दाचें संक्षिप्त रूप होय. मय नांवाचा असुर सूर्यास शरण गेला व सूर्यानें जो ज्योतिषाचा सिद्धांत त्यास प्रकाशित केला, तो ज्योतिषी लोकांमध्यें 'सूर्यसिद्धांत' या नांवानें प्रसिद्ध झाला, अशी आख्यायिका सूर्यसिद्धांताच्या आरंभींच दिली आहे. तेव्हां सूर्य, शिव व असुर या तिहींचा पुष्कळ संबंध सिद्ध होतो. ज्या शैवांबरोबर ब्राह्मणांचा प्रसंग पडला, ते कांहीं कर्मठ नव्हते. त्यांची यज्ञयागावर बिलकूल श्रद्धा नव्हती. शिव हा 'मखमथन' = यज्ञाचा विध्वंस करणारा समजतात. शैवांमध्यें स्त्री व पुरुष या दोहोंचेंही हक्क सारखे असत. शिवाचें स्वरूप जें कल्पिलें आहे, तें बरोबर अर्धे पुरुष व अर्धें स्त्री, असेंच कल्पिलें आहे. "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" व "भार्या पुत्रश्च दासश्च त्रयस्ते निर्धनाः स्मृताः" हें ब्राह्मणांचें मूळचें शास्त्र. स्त्रीस स्वतंत्र कर्माधिकार तर बिलकूल नाहीं, हा मीमांसकांचा एक मुख्य सिद्धांत. अशी सर्व स्थिति असल्यामुळें ज्या शैवांचा व ब्राह्मणांचा पहिल्यानें संबंध जडला, त्या दोहोंचें सहावस्थान केवळ अशक्य होतें. असल्या शैवांबरोबर प्रसंग पडल्यामुळें, ब्रह्ममय स्वरूप त्र्यीस मिळालें, असा आमचा तर्क आहे.

ब्राह्मणांनीं "स्मार्त" काळीं अवजड श्रौत धर्माचे ऐवजीं सोप्या स्मार्त धर्माची योजना केली खरी. तरी श्रौत कर्माविषयीं व त्यांतील सव्यापसव्याविषयीं आपली पूज्यबुद्धि त्यांनीं कायम राखिली. इंद्रास ऐंद्र पद मिळालें, तें त्यानें शंभर यज्ञ केले म्हणून. तेव्हां अर्थातच यज्ञकांडाची पायरी इंद्राच्या वरची झाली. यज्ञकांडास ब्राह्मणांनीं नवीन स्वरूप देऊन, विष्णु ही देवता निर्माण केली. विष्णु हा यज्ञपुरुष. सर्व यज्ञ होतात, ते विष्णुसाठीं. यज्ञकरणाऱ्या ब्राह्मणांचें रक्षण करणारा एक विष्णु. शैवांचा शिव वर्णानें श्वेत, तर ब्राह्मणांचा विष्णु वर्णानें श्याम किंवा कृष्ण. हें विष्णूचें स्वरूप आकाशाचा रंग घेऊन कल्पिलेलें. विष्णूचें स्थान शिवाच्याही वर, म्हणजे आकाश सूर्याच्याही वर दिसतें. आकाश सूर्यापेक्षां मोठें दिसतें, म्हणून विष्णूचें माहात्म्य शिवापेक्षां मोठें ठरलें. देवी शिवाच्या अर्धांगीं, तर लक्ष्मी विष्णूचें पादसंवाहन करणारी. अशा प्रकारानें प्रतिद्वंद्विभावाची कल्पना निघून विष्णूचें स्वरूप निष्पन्न झालें; व हळूहळू अनेक गुणांचा आरोप त्याच्यावर करण्यांत आला. त्यामुळें स्मार्त धर्माचेंही माहात्म्य मावळून, हळूहळू सर्व प्रकारें शिवप्रतिद्वंद्वी विष्णु कर्मठांनीं कल्पिला; व जे पूर्वी ब्राह्मण म्हणवीत, तेच या रूपांतराचा परिग्रह करून पुढें आपणांस वैष्णव म्हणवूं लागले.

वीरांची पूजा करण्याचा संप्रदाय पुष्कळ दिवसांपासून पूर्वीच्या काळीं पडलेला होता. अवतारांची कल्पना वीरपूजेपासून पहिल्यानें निघालेली. भक्तिमार्ग हा मूळचा वीरपूजकांचा मार्ग आम्हांस दिसतो. वाचेनें, कायेनें व मनानें वीरांची सेवा करणें व स्वप्नींही त्याच्या आज्ञेचा अतिक्रम न करणें, ही मूळची भक्ति. शरीरधारी पुरुष डोळ्यापुढें असल्याशिवाय, ही भक्ति शक्य नाहीं. शरीरधारी वीर पुढें असेल तेव्हांच तद्विषयक भक्तीचा मनांत प्रादुर्भाव होईल. वीरपूजा ही प्रतिमापूजेचें बीज होय. जे वीर पूर्वी होऊन गेले, त्यांची प्रतिमा करून सांनिध्य कल्पिण्याचा प्रघात पडला, तेव्हांच प्रतिमापूजेस आरंभ झाला. राम, कृष्ण व मारुति हे मोठे वीर पूर्वीच्या काळीं होऊन गेले. यांच्या प्रतिमा करून पूजा करण्याची चाल पूर्वीच्या काळीं जिकडे तिकडे पडलेली होती. या चालीस हातीं धरल्यामुळें, जेव्हां जेव्हां असुर माजले व इंद्रादिक देवांस पीडा करूं लागले तेव्हां तेव्हां इंद्रादिक देव विष्णूस शरण गेले; व विष्णूनें यज्ञकांडाचें रक्षण होऊन, असुरांचा संहार व्हावा म्हणून राम वगैरे अवतार घेतले, ही कल्पना

ब्राम्हणांमध्यें निघाली. सारांश, जसें बौद्धांमध्यें बुद्धाचें व जैनांमध्यें जिनाचें, तसें ब्राम्हणामध्यें विष्णूचें माहात्म्य वाढूं लागलें. इतकेंच कीं बुद्ध व जिन हे मूळचे शरीरधारी असून, विष्णु हें स्वरूप मूळचें केवळ कल्पनासृष्टींतील होय. तेव्हां ब्राम्हणांच्या मूळच्या कर्मठ स्वरूपास जेव्हां वैष्णव स्वरूप सांपडलें, तेव्हां त्यांत पुनः पालट झाला; व वीरपूजेच्या वाऱ्यानें अवतारकल्पना निघून, प्रतिमापूजेचें बीज ब्राह्मणांमध्यें पेरलें गेलें. बौद्धांमध्यें व जैनांमध्यें जी प्रतिमापूजा सुरु झाली, तिचेंही बीज वीरपूजा होय. वीर अनेक प्रकारचे असतात. जसे रणवीर असतात, तसे दानवीर असतात व दयावीरही असतात. बुद्ध व जिन हे दोघेही दयावीर समजण्याचा संप्रदाय संस्कृतांत आहे.

जर ब्राह्मणांस वैष्णव स्वरूपाचा लाभ झाला नसता, तर बौद्ध धर्म व जैन धर्म हे दोन्ही ब्राह्मणी धर्मास निःसंशय हांकवून देते; पण वैष्णव स्वरूपाचा लाभ झाल्यामुळें, आपल्या धर्माचें पूर्वीचें स्वरूप पालटण्यास ब्राह्मणांस सवड सांपडली, व एका प्रकारचा अपूर्व आवेश त्यांच्यामध्यें आला. अहिंसेवर ब्राम्हणांची पुरी श्रद्धा बसली, व यज्ञाखेरीज प्रसिद्धपणें हिंसा करण्यास ब्राम्हणांचें मन घेईना. इतका अहिंसेकडेस ब्राह्मणांच्या मनाचा ओघ वळला, त्याचें कारण बौद्धांचा व जैनांचा परिचय हेंच होय. वैष्णव बनलेले ब्राम्हण व पूर्वीच्या काळचे ब्राम्हण यांच्यामध्यें जमीन अस्मानाचें अंतर दिसतें. पूर्वीच्या काळची मोठी देवता ब्राम्हणांची इंद्र. पण या काळीं विष्णु हा ब्राम्हणांच्याच मतें इंद्राच्याही वरच्या पायरीचा ठरला. असें व्हावें, हें कांहीं दोन काळांच्या ब्राम्हणांमध्यें लहान अंतर नव्हे. यज्ञांत हिंसा तर केली पाहिजे. जर हिंसा नाहीं, तर अजीबात कर्मकांडच उडून जाऊं पहातें. हिंसेकडेस पुष्कळ ब्राह्मणाचें मन लागेना; व मूळचें कर्मकांड टाकलें, तरी त्यावरची पूज्यबुद्धि उठून जाईना. याप्रमाणें एका बाजूस विहीर व एका बाजूस आड, अशी या काळीं ब्राम्हणांची स्थिति झाली. यज्ञास फारसें उत्तेजन ब्राह्मणांकडून मिळेना; व यज्ञ करूं नयेत, असें तर उघडपणें लोकांस सांगवेना. महाभारतामध्यें शांतिपर्वांत अहिंसाप्रतिपादक बराच भाग येतो, तो बौद्धांची व जैनांची सावली वर पडल्यामुळें होय. गोघ्नता सर्व प्रकारें टाकून दिली, व गोमेध कलियुगीं निषिद्ध मानला जाऊन, गोमांस सर्वथा ब्राम्हणसंततीस निषिद्ध झालें, तें बौद्धांच्या व जैनांच्या संगतीनें ब्राम्हणांची हिंसाबुद्धि या काळीं थंडगार पडून गेली, म्हणूनच निषिद्ध झालें. पूर्वीच्या पुष्कळ ब्राम्हणांस गोमांस चालें, व गोमधही ते करीत. पण या काळीं इतर मेध पूर्वींचे बाहेरून तरी ठेवून, गोमेध सर्वथैव ब्राम्हणांनीं निषिद्ध केला, व विष्णूस गोब्राम्हणप्रतिपाळक ठरविलें. हळूहळू बुद्धास विष्णूचाच नववा अवतार ठरवून, बुद्धास ज्याच्या खालीं ज्ञान उत्पन्न झाल्यामुळें दरोबस्त बौद्ध पूज्य मानूं लागले, त्या पिंपळाचेंही माहात्म्य ब्राम्हणांनीं वाढविलें. ब्राम्हणांचा मूळचा पूज्य वृक्ष एक उंबर होय. तेव्हां या ब्राम्हणी धर्मास व पूर्वींच्या ब्राम्हणी धर्मास एक कोण म्हणेल?

१२-ब्राह्मणी धर्माचें मध्यंतरीय काळचें स्वरूप.

संस्कृत भाषेंत तीन "रीती" समजल्या जातात. 'रीती' ह्मणजे लिहिण्याची शैली. संस्कृतांत स्वतंत्र गद्यग्रंथ पूर्वी नव्हतेच. तेव्हां लिहिण्याची ह्मणजे गद्य लिहिण्याची नव्हे, तर पद्य लिहिण्याची शैली समजावी. वैदर्भी, गौडी व पांचाली हीं तिन्ही रीतींचीं नांवें उघड देशावरून पडलेलीं होत. विदर्भ ह्मणजे वऱ्हाड, व गौड ह्मणजे बंगाल. हे दोन्ही देश आर्यावर्ताच्या बाहेरचे होत, तेव्हां आर्यावर्ताच्या बाहेर ब्राह्मण व ब्राह्मणी धर्म पसरला, तेव्हां लौकिक संस्कृतांत पद्य होण्यास आरंभ झाला. पांचाली रीति ही मात्र खुद्द आर्यावर्तांतील होय. मगध देशाची सत्ता शालि० शकाच्या तिसऱ्या शतकाच्या अखेरीस किंवा चवथ्या शतकाच्या आरंभीं मावळली. तेव्हां गौडी रीति या काळाच्या पुढची होय. मगध देशांतील लोकच पहिल्यानें शुद्ध नव्हत. तर त्यांच्या पलीकडेस ह्मणजे पूर्वेस रहाणारे गौड हे शुद्ध नव्हत, याविषयीं शंका नको. जसे मगध देशांत तसे गौड देशांत जे ब्राह्मणांच्या धर्मांत आले, ते ब्राम्हण झाले; मग ते मूळचे कोणत्याही लोकांमधील असोत. विदर्भ हा महाराष्ट्र देशाचा भाग मानला गेल्यामुळें, वैदर्भीस क्वचित् "माहाराष्ट्री" असेंही ह्मणतात.

विदर्भामध्यें ब्राह्मणांच्या वसाहती झाल्या केव्हां

तें नीट कळत नाहीं. जे महाराष्ट्र लोक लिहिणाऱ्या जातीचे पूर्वीच्या काळीं महाराष्ट्रांत होते, त्यांपैकीं ज्यांच्या वसाहती विदर्भात झाल्या होत्या त्यांतून पुष्कळांनीं ब्राह्मणी धर्माचा आदर केला व ब्राह्मण झाले. महाराष्ट्रमंडळचे शालिवाहन वंशाचे राजे होते, ते सर्व शैव होते. ते कांहीं ब्राह्मणधर्मी नव्हते. गौडांचा उदय झाला, त्याच सुमारास विदर्भ देशांत ब्राह्मणधर्मी झालेल्या मराठ्यांनीं संस्कृत भाषेत पद्यें रचण्यास आरंभ केला. या काळीं अंतर्वेदीस पांचाल हें नांव मिळालेलें दिसतें. पांचाल हें नांव मूळचें अंतर्वेदींतील उत्तरेकडच्या लहानशा प्रांताचें होतें. याप्रमाणें शालि० शकाच्या चवथ्या शतकाच्या आसपास या तीन रीती तीन मुलखांतील लोकांवरून निघाल्या. गौडी रीति क्लिष्ट असून लांबलचक समासांनीं व फाजिलपणानें भरलेली असे. वैदर्भी रीति साधी व सोपी असून बाळबोध होती. पांचालीमध्यें कांहीं गुण गौडांचे व कांहीं वैदर्भीचे होते, त्यापक्षीं गौडांतील व विदर्भांतील लोकांनीं पहिल्यानें लौकिक संस्कृतांत पद्यें रचण्यास आरंभ केला, व पुढें पांचालांनीं गौडांचें व वैदर्भांचें अनुसरण व अनुकरण केलें, असें ह्मणणें भाग पडतें.

या प्रमाणें संस्कृत भाषेच्या काव्यकाळास आरंभ झाला शालि० शकाच्या चवथ्या शतकाच्या आरंभीं. ह्मणून पुढें दोन किंवा तीन शतकें संस्कृत भाषा यौवनावस्थेंत होती. ही यौवनावस्था केवळ ब्राह्मणांनीं तीस आणिलेली.

सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा व वेदान्त हीं ब्राह्मणाचीं सहा शास्त्रें. सांख्य शास्त्र कपिल मुनीनें केलें, असें ह्मणतात. या शास्त्राचीं सूत्रें हल्लीं बिलकूल उपलब्ध नाहींत. कपिल हा बुद्धाच्या पूर्वीचा होय. योग शास्त्राचीं सूत्रें व्याकरणमहाभाष्याचा कर्ता पतंजलि यानें रचलीं. एक मुख्य देव सांख्य शास्त्रास कबूल नाहीं. योग शास्त्रांत एक मुख्य देव असून, तो सर्वज्ञ व सर्वांच्या कल्याणासाठीं झटणारा आहे, असें सांगितलें आहे. न्याय व वैशेषिक हीं शास्त्रें सर्व भौतिक सृष्टि परमाणूंपासून झाली, असें ह्मणतात. मीमांसा कर्मकांडच मुख्य व आदरार्ह मानिते. वेदान्तांत औपनिषद संप्रदायाचा खुलासा केलेला असतो. वेदान्ताचीं सूत्रें बादरायणानें रचलीं. या बादरायणानें पतंजलीच्या योगसूत्रांवर भाष्यही रचिलें आहे. हीं सर्व सूत्रें बौद्ध व जैन या दोहोंचा चांगला प्रसार चाललेला असतां रचलीं गेलीं.

शालिवाहन शकाच्या चवथ्या किंवा पांचव्या शतकाच्या सुमारास कुमारिल स्वामी झाला. यानें मीमांसेवर वार्तिकें केलीं. कुमारिल स्वामीस सुधन्वा नांवाच्या राजाचा आश्रय होता. कुमारिलानें वादांत बौद्धांस हटविलें, व नंतर ज्यांनीं बौद्ध धर्माचा त्याग करून ब्राह्मणी धर्माचा परिग्रह केला नाहीं, त्यास तेलाच्या घाण्यांत घालून मारिलें, अशी दंतकथा आहे. कुमारिलस्वामी हा नांवावरून द्रविड दिसतो. मीमांसेचे भाष्यकार शबरस्वामी हेही द्रविड दिसतात. शालि० शकाच्या आरंभाच्या पूर्वी ब्राह्मणी धर्माचा तेलंगणांत पाय पडला. ज्या पुष्पमित्रानें मौर्यांची मगध देशांतील गादी बळकाविली, तो कोणत्या मुलखांतील होता, तें नीट कळत नाहीं. पुष्पमित्राच्या वंशास शुंग वंश ह्मणतात. शुंगांच्या पाठीं काण्व राजे झाले. काण्व हा वंश तेलंगी होता. काण्वांच्या पाठीं मगध देशाची सत्ता आंध्रांच्या हातीं गेली. हे तेलंगणाच्या वल्हाटींतले होत, कारण तेलंगणाच्या खालाटीस कलिंग व वल्हाटीस आंध्र ह्मणतात. शुंग वंशाचे राजे ब्राम्हणधर्मी होते. काण्व वंशाचें राजे नांवानें ब्राम्हणधर्मीच दिसतात. आंध्र वंशाचे पहिले राजे निःसंशय ब्राह्मणधर्मी होते. पण पुढील राजांनीं बौद्धांस देखील बराच आश्रय दिलेला दिसतो. तेलंगणांत ब्राह्मणांचा व ब्राह्मणी धर्माचा पाय पडला, तो जसा मगध देशांतून तसाच विदर्भ देशांतूनही पडलेला असावा. विदर्भ देशांतून ब्राह्मणांच्या वसाहती अधिक झालेल्या असाव्या, कारण अजूनही तेलंगणांत वैदर्भ नांवाचा ब्राम्हणांचा पोटभेद क्वचित् ऐकण्यांत येतो. द्रविडमंडळांत ब्राम्हणी धर्म जसा कलिंगांतून स्थलमार्गानें तसाच जलमार्गानेंही आलेला असावा. विदर्भांत, तेलंगणांत व द्रविडमंडळांत जे ब्राम्हण आले, ते सर्व बौद्धांच्या व जैनांच्या संगानें हिंसेस विटलेले आले. जरी ते आले तेव्हां हिंसक होते, अशी यथाकथंचित् कल्पना केली, तरी लौकरच यज्ञव्यतिरिक्त हिंसा त्यांच्यामध्यें बंद पडली व ते निवृत्तमांस बनले. अशा काळीं ब्राम्हण व बौद्ध कि-

वा जैन यांच्यामध्यें भक्ष्यभेद फारसा राहिलेला नव्हता, काय तो आगमभेद त्यांच्यामध्यें होता. अशा काळीं कुमारिल स्वामी झाले, म्हणून बौद्धांस ब्राम्हणी धर्मामध्यें घेण्यास अडचण पडली नाहीं. कुमारिलाच्या पश्चात् लौकरच शंकराचार्य झाले, तेही द्रविड होते. शंकराचार्य संन्यासी होते, त्यापक्षीं ब्राम्हणी धर्मामध्यें या काळीं निःसंशय संन्यासाची पुष्कळ प्रवृत्ति होती. शंकराचार्य हे शिवाचा अवतार समजण्याचा संप्रदाय आहे. तेव्हां याकाळीं शिवाची पूजा करणारे ब्राह्मणही पुष्कळ होते. गांवोगांवीं व देशोदेशीं फिरून आपल्या धर्मतत्त्वाची प्रवृत्ति करणें, हें कांहीं मूळचें कोणत्याही ब्राह्मणी धर्माचें लक्षण नव्हे. उपनिषद् व आरण्यक या दोहोचे यौगिक अर्थ ध्यानांत आणले, म्हणजे एक ठिकाणीं किंवा अरण्यांत बसून विचार करणें, हें ब्रह्ममय ब्राम्हणी धर्माचें लक्षण होतें. तेव्हां संन्यास या आश्रमाची प्रवृत्ति ब्रम्हमय ब्राम्हणांमध्यें बौद्धांच्या व जैनांच्या संगानें झालेली दिसतें. शिव ही देवता कांहीं मूळची ब्राम्हणांची नव्हे. तरी ती ब्राम्हणांमध्यें घुसली;व ती मूळचीच "मखमथन" असल्यामुळें मखविरोधी ब्रम्हमय ब्राम्हणांचा व तिचा अत्यंत नैकटिक संबंध जडला. कोणत्याही देवतेचा एकदा ब्राह्मणी धर्माच्या एका रूपांत प्रवेश झाला, म्हणजे दुसऱ्या रूपांत प्रवेश होण्यास सहसा अडचण पडत नाहीं. एकदा ब्रह्ममय ब्राह्मणी धर्मांत शिवाचा प्रवेश झाला, व लौकरच शिवाची पूजा व उपासना करणारे ब्राह्मणांमध्येंही वाढले. शंकराचार्यांचे काळीं ब्राह्मणांमध्यें शैव होते, वैष्णव होते, सौर होते, गाणपत्य होते व शाक्तही होते. या पांचांमध्यें अभेदाचें प्रतिपादन करून, शंकराचार्यांनीं आपल्या लोकांमध्यें पंचायतनाची प्रवृत्ति केली व आपापसांतील द्वेष मिटविला. शंकराचार्यांनीं जीव व शिव हे मूळचे अभिन्न, असा सिद्धांत केला. या सिद्धांतास अद्वैतसिद्धांत म्हणतात. शंकराचार्यांनीं वेदांतसूत्रांवर गहन भाष्य केलें आहे. अत्युपयुक्त अशा दहा उपनिषदांवरही त्यांचीं भाष्यें आहेत. शंकराचार्यांनीं बौद्धांचा छळ केलेला नव्हे बौद्धांचा छळ केला कुमारिलानें. कुमारिलाप्रमाणें पुष्कळांस ब्राह्मण मात्र शंकराचार्यांनीं केलें, अशी आख्यायिका आहे.

भगवद्गीतेचा काळ ठरविणें अशक्य होय. श्रीकृष्ण आपणास वृक्षांमध्यें पिंपळ म्हणतो, व जनकाचें नांव घेऊन सांख्य व योग या दोन्ही शास्त्रांचीं नांवें येतात, त्यापक्षीं शालि० शकाच्या पूर्वी कांहीं वर्षे किंवा लौकरच नंतर ही रचली गेली असावी, व "वृक्षांमध्यें पिंपळ" या वचनावरून बुद्धास विष्णूचा अवतार समजण्यास सवड सांपडली असावी, असें आम्हांस वाटतें. "भगवद्गीतासूपनिषत्सु" असें प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं येतें, त्यापक्षीं उपनिषदें गोळा केलीं गेलीं त्याकाळीं किंवा त्या काळाच्या नंतर लौकरच भगवद्गीता एखाद्या वैष्णवानें अस्तित्वांत आणिलेली असावी. भक्तिमार्गाचा पाया वीरपूजा, असें पूर्वी म्हटलें आहे. कृष्ण हा विष्णूचा पूर्णावतार मानला गेला, त्यामुळें ब्राह्मणांमध्यें भक्तिमार्गास कोंभ फुटला. भक्तिमार्ग किंवा ज्ञानमार्ग हे दोन्ही कर्ममार्गाचे विरोधी. भक्त किंवा उपासक असतात, ते अवतारांचीं चारित्रें गातात, व त्यांतच परमपुरुषार्थ समजतात. त्यांस यज्ञादिक खटपट केवळ निष्प्रयोजन भासते. ज्ञानमार्गास जसा जातिभेद मान्य नाहीं, तसा भक्तिमार्गासही नाहीं. तरी भक्तिमार्ग हा निःसंशय एका प्रकारचा कर्ममार्ग होय. चरित्रें गाणें व षोडशोपचारांनीं पूजा करणें, ही सर्व एका प्रकारची यागादिक खटपटींसारखीच खटपट होय. तेव्हां जातिभेदाचा तिरस्कार शैवांपासून घेऊन अश्रौत वीरपूजेचें अवलंबन केलें; व त्यामुळें हळू हळू कर्ममार्गाशिवाय चैन न पडणाऱ्या ब्राह्मणांमध्यें भक्तिमार्गासारखी एक अपूर्व खटपट कर्ममार्गाच्या पद्धतींवर सुरू झाली. या खटपटीचें बीज भगवद्गीताकाराच्या हातून पेरलें गेलें. भगवद्गीतेंत कृष्णास "योगेश्वर" म्हटलें आहे. योगेश्वर मूळचा पाहूं जातां शिव होय. पण कृष्णानें ज्या लीला केल्या त्या सर्व योगबलानें केल्या, असा समज झाल्यामुळें तो "योगेश्वर" झाला; व कृष्ण हा विष्णूचा पूर्णावतार समजला गेल्यामुळें, विष्णूसही योगेश्वरत्व अनायासें मिळालें. असे प्रकार वैष्णवांमध्येंही पडत चालले, व त्यामुळें विचारी ब्राह्मणांनीं 'शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः' असा निर्णय करून ठेविला. शंकराचार्यांच्या पश्चात् श्रीमद्भागवत हा ग्रंथ रचला गेला. भागवतकारानें भगवद्गीतेच्याच सिद्धांताचा अभिनंदनीय विस्तार केला. ब्रम्हस्तुतीवरून व वे-

दुस्तुतीवरून शांकर सिद्धांत भागवतकारास माहीत होता, याविषयीं कांहीं शंका राहत नाहीं. भागवतांत सर्व मतांची एकवाक्यता करण्यास यत्न केला आहे, व तो बराच सफळ झाला आहे. "द्रविडमंडळांत मात्र कलियुगीं कोठें कोठें भक्त रहातील" असा एक ठिकाणीं शेरा मारिला आहे, त्यापक्षीं भागवतकार निःसंशय द्रविड होता. भक्तीस भागवतासारिखा ग्रंथ संस्कृतांत नाहीं. जे लक्षपूर्वक तन्मय होऊन हा ग्रंथ वाचतील, त्यांस त्याची गोडी समजल्याशिवाय राहणार नाहीं.

ज्ञानमार्गाचा उद्धार ब्राह्मणांमध्यें शंकराचार्यांनीं केला, तसा भक्तिमार्गाचा उद्धार शालि० च्या ११ व्या शतकांत किंवा त्या शतकाच्या आसपास रामानुजाचार्य यांनीं केला. रामानुजाचार्यांच्या पश्चात् शें दोंडशें वर्षांनीं मध्वाचार्य झाले, त्यांनीं यज्ञ तर करावे, पण त्यांत साक्षात् पशु न आणितां पिठाचा पशु करावा, असा सिद्धान्त करून यज्ञांतल्याही हिंसेस हरताळ लाविला, व एका नवीन भक्तिपंथाचा पाया घातला. पुढें वल्लभाचार्य झाले, त्यांनीं तिसऱ्या भक्तिपंथाची प्रवृत्ति केली. ही सर्व आचार्यमंडळी द्रविड झाली. आर्यांमध्यें आपेकाळीं कांहीं हालचाल निःसंशय होती. पण पुढें ब्राह्मणी धर्म त्यांच्यामध्यें एखाद्या मृत पशूसारखा होऊन पडला होता. द्रविडांमध्यें पुष्कळ लोक ब्राह्मणी धर्मांमध्यें घुसले व ब्राह्मण झाले, ह्मणून ब्राह्मणी धर्मांत पुष्कळ जीव राहिला.

१३—गौड व द्रविड हे ब्राम्हणांचे दोन मुख्य भेद.

हल्लीं ब्राह्मणांचे गौड व द्राविड असे दोन मुख्य भेद करण्याचा परिपाठ आहे. या दोन शब्दांवरूनच असें सिद्ध होतें कीं हे शब्द ज्या काळीं प्रयोगांत आले, त्या काळीं गौड व द्रविड या दोन लोकांच्या हातीं राजसत्ता होती; व त्यांचे मुलूख एकमेकांस लागलेले असल्यामुळें, गौडांच्या मुलुखांतले ब्राम्हण गौड ब्राम्हण व द्रविडांच्या मुलुखांतले ब्राम्हण द्रविड ब्राम्हण असे दोन मुख्य भेद मानिले गेले. पुढें हे दोन शब्द सार्वत्रिक हिंदुस्थानांत झाले. आंध्र, कलिंग किंवा चोल या लोकांच्या हातीं राजसत्ता होती, त्या काळीं जर ब्राह्मणांच्या मुख्य भेदांचे शब्द अस्तित्वांत आले असते, तर द्रविड शब्दास निःसंशय प्राधान्य न मिळतें. हाच न्याय गौड शब्दास लागू करायाचा. द्रविड शब्द जितका जुनाट आहे, तितका गौड शब्द जुनाट नाहीं. शालि० शकाचे पूर्वी गौड लोकांचें किंवा देशाचें माहात्म्य होतें, असें ह्मणण्यास कांहीं आधार नाहीं. शालि० शकाच्या तिसऱ्या शतकांत मगध देशाचें स्वातंत्र्य बुडाल्यानंतर गौड शब्द नांवाजूं लागला. गौडमंडळ आर्यावर्ताच्या बाहेर आहे. तेव्हां द्रविडांप्रमाणें गौडही अस्सल आर्य नव्हत, याविषयीं शंका नको. असें असतां, गौड शब्द नर्मदेच्या उत्तरेकडील दरोबस्त ब्राह्मणांचा वाचक झाला, तो गौड लोकांच्या हातीं राजसत्ता होती म्हणून झाला, असें आम्हीं समजतों. गौडांची राजसत्ता अंतर्वेदींत कधींही नव्हती. मगध देशावर थोडी बहुत सत्ता गौडांची होती, असें मानण्यास हरकत नाहीं. पश्चिमेस खालीं विदर्भ देशावरही कधीं गौडांची सत्ता नव्हती. कलिंग देशावर अशोक मोऱ्यानें शा० शकाच्या पूर्वी आपला अंमल बसविला होता. कलिंग देश स्वतंत्र केव्हां झाला, तें नीट कळत नाहीं. तरी शालि० शकाच्या चवथ्या किंवा पांचव्या शतकांत तो स्वतंत्र होता, व कलिंग लोक व्यापाराच्या संबंधानें जाव्हा ( यवद्वीप ) वगैरे पूर्वेकडील द्वीपसमूहांतील द्वीपांमध्यें वसाहती करीत होते, तेव्हां ते निःसंशय स्वतंत्र होते. याप्रमाणें या काळीं गौड व द्रविड यांच्यामध्यें फारसा संबंधच स्थापन झालेला नव्हता. तर मग गौड व द्रविड हे शब्द कांहीं या काळचे नव्हत. शालि० च्या नवव्या किंवा दहाव्या शतकाच्या सुमारास द्रविड प्रांताची राजधानी कांचीपुर होती. याकाळी कलिंग देशाचें माहात्म्य मावळलेलें होतें, असा आमचा तर्क आहे. द्रविड देश या काळीं हयात होता, व कांचीपुर ही त्याची राजधानीही हयात होती. प्रसिद्ध विक्रमांक चुलुक्य याची एक बायको या देशाची राजकन्यका होती. तेव्हां या काळीं किंवा या काळाच्या सुमारास ब्राह्मणांचे गौड व द्रविड हे दोन मुख्य भेद कल्पिले गेले. हे मुख्य भेदांचे वाचक शब्द इतक्या आर्वाचीन काळीं अस्तित्वांत आले, म्हणून त्यांचा उल्लेख कोणत्याही अस्सल संस्कृत ग्रंथांत येत नाहीं. ब्राम्हणांमध्यें मूळचे भेद किंवा पोटभेद नव्हते. सरस्वती हें मूळचें नदीचें नांव खरें. पण पुढें ज्या लहानशा प्रदे-

शांतून ही नदी वहाते, त्या प्रदेशास हें नांव मिळालेलें दिसतें. सिंधु नदी ज्या मुलखांतून समुद्रांत पडते, त्या मुलखास सिंध म्हणतात, त्याप्रमाणेंच "सारस्वत" हें लहानशा प्रदेशाचें नांव पडलें. वराहमिहिराच्या कूर्मविभागांत "सारस्वत" हें एका मुलखाचें नांव आलें आहे. या सारस्वत मुलखांतील ब्राम्हण सारस्वत झाले. कनोज प्रांतांतील ब्राह्मण कनोजे झाले. गौड व द्रविड हे दोन मुख्य भेद मानण्याचें प्रयोजन भक्ष्यभेद होय. दक्षिणेंतील ब्राह्मण निवृत्तमांस पडले, व उत्तरापथांतील मांसभक्षक पडले. म्हणून दक्षिणी ब्राम्हणांस उत्तरापथांतील ब्राम्हणांबरोबर संबंध ठेवणें इष्ट वाटलें नाहीं, व त्यामुळें गौड व द्रविड हे दोन मुख्य भेद अस्तित्वांत आले. गौडांमध्यें सारस्वत, कनोजे, मैथिल वगैरे नांवें मुलखावरून पडलेलीं होत. उत्तरापथांत जे सारस्वत व कनोजे असतील, त्यांचे पूर्वज आर्यावर्तांतील समजण्यास हरकत नाहीं; मग ते शुद्ध ब्राम्हण असोत किंवा ब्राम्हणेतरांच्या रक्ताचा छाटा त्यांच्यामध्यें पडलेला असो. मैथिल, अस्सल गौड व ओड्र (आवढ्या जगन्नाथाकडील) हे तर धडधडीत आर्यावर्ताच्या बाहेरचे होत. यांच्यामध्यें आर्यांचें रक्त विशेष असण्याचा संभव नाहीं. तरी यांचे आचार व विचार पुष्कळ अंशीं आर्यांचें खरे. तेव्हां "गौड" ब्राम्हण शब्द न वापरतां, "आर्य" ब्राम्हण शब्द वापरला, तर तो अधिक शुद्ध होय.

### १४–महाराष्ट्रमंडळांतील ब्राह्मणांविषयीं कांहीं तुरळक विचार.

विदर्भ देशांतून ब्राह्मणी धर्म जसा तेलंगणांत शिरला, तसा महाराष्ट्रांतही शिरला. महाराष्ट्रमंडळाचे धर्मप्रवेशाच्या संबंधानें दोन विभाग केले पाहिजेत. उत्तरेकडील महाराष्ट्रांत ब्राह्मणी धर्म विदर्भांतून शिरला, व दक्षिणेकडील महाराष्ट्रांत तेलंगणांतून किंवा द्रविडमंडळांतून शिरला. शालिवाहन वंशाचें राज्य पैठणीं होतें, तोंपर्यंत ब्राह्मणांचा पाय महाराष्ट्र देशांत फारसा पडलेला होता, असें ह्मणण्यास प्रमाण नाहीं. पण पैठणाचें सौभाग्य मावळल्यानंतर, वातापीचे चुलुक्य झाले. ते लौकरच ब्राह्मणधर्मी झाले, व बंकापुरचे राठोड किंवा राष्ट्रकूट हेही ब्राह्मणधर्मी झाले. वातापीचे चुलुक्य किंवा चाळके यांनीं कर्नाटकाचें नांव गाजविलें, व कानडी भाषा अस्तित्वांत आणिली. राठोडांनीं मऱ्हाटी बोलणारे लोक एकवटले. शालिवाहनाच्या पांचव्या शतकाच्या अखेरीस मांग चाळके किंवा मंगलीश चाळके झाला, त्यानें ब्राम्हणांस ताम्रपट करून दिले आहेत. शालि० आठव्या शतकांतील गोविंदराव राठोड यानें ब्राम्हणांस दिलेले ताम्रपट उपलब्ध आहेत. बदामीचीं सुंदर लेणीं मंगलीशानें कोरिवलीं, व वेरूळचीं भव्य लेणीं गोविंदरावानें कोरिवलीं. मंगलीश हा बदामीच्या गादीवर बसलेल्या चाळक्यामध्यें ब्राह्मणांचा पहिला आश्रयदाता दिसतो. ज्यास चाळक्यांनीं व राठोडांनीं आश्रय दिला, ते दरोबस्त ब्राम्हण कर्मठ होते. मालखेडचे जाधव झाले, तेही ब्राह्मणधर्मी झाले. अशा रीतीनें राजाश्रय मिळाल्यामुळें ब्राम्हणांची संख्या हळू हळू वाढत चालली. कोंकणांत याच सुमारास शेलार कुळीचे राजे होते, त्यांचाही ब्राम्हणांस व त्यांच्या धर्मास आश्रय मिळाला. हे सर्व ब्राह्मण मूळचे कर्नाटकांतून आलेले व निवृत्तमांस होत. कर्मठ ब्राम्हणांचाच जर एकछत्री अंमल महाराष्ट्रमंडळांत चालता तर मऱ्हाटी भाषेची स्थिति फारच निकृष्ट झाली असती. पण शालि० च्या बाराव्या शतकाच्या आरंभीं देवगिरीच्या जाधवांच्या गादीची स्थापना भिल्लम यानें केली. या भिल्लमाचा मुलगा जैत्रपाळ हा गादीवर असतां, त्यास अद्वैत सिद्धांताचा उपदेश मराठी भाषेत मुकुंदराज नांवाचा संन्याशी होता त्यानें केला. पुढें तेरावे शतकाचे आरंभीं ज्ञानेश्वर वगैरे मंडळी झाली, तिनें मराठी भाषेंत ग्रंथ रचून मराठीचें नांव गाजविलें. याप्रमाणें ब्रह्ममय ब्राह्मणांची जी फळी होती, तिचा प्रवेश महाराष्ट्रमंडळांत झाल्यामुळें, मराठीचें माहात्म्य वाढत चाललें. ब्राह्मणांमध्यें जी कर्मठ फळी होती, तिनें संस्कृताचा फाजिल आग्रह धरून या ब्रह्ममय फळीचा पुष्कळ छळ केला. पण अखेरीस ब्रह्ममय फळीच यशस्वी झाली, व त्यामुळें जसे ज्ञानेश्वरांस महाराष्ट्रमंडळांतील ब्राह्मणेतर वंद्य समजतात, तसेच ब्राह्मणही तुकारामबोवांस वंद्य समजतात. पंढरपुरीं कर्मठ ब्राह्मणांच्या जातिभेदास उघडपणें जळांजळि देऊन ब्रह्ममय ब्राह्मण ब्राह्मणेतरांच्याही पायीं पडतात. सारांश, महाराष्ट्रमंडळांतील पूर्वींचे पुष्कळ ब्राम्हण मोठे उदार मनाचे व अद्वैतसिद्धांती होते, म्हणून

त्यांच्या मनांत जातिभेदास वाव नव्हता. कर्मठ ब्राम्हणाचें त्याकाळीं तादृश वजन नव्हतें, म्हणून मराठी भाषा प्रौढ होऊन महाराष्ट्रमंडळाचा उत्कर्ष होत गेला. अर्वाचीन मराठीचा पहिला उत्कर्ष काळ शालिवाहनाचें तेरावें शतक, व दुसरा उत्कर्ष काळ शालिवाहनाचें सोळावें शतक होय. जर कर्मठ ब्राम्हणांच्या हातीं सर्व कळ महाराष्ट्रमंडळाची दोन्ही काळीं आली असती, तर मराठी कुजत पडती व मराठेही सर्व जातीचे सत्त्वहीन होऊन जाते.

रामदेवरावाचे कारकीर्दीचे आरंभीं म्हणजे शालि० शकाच्या बाराव्या शतकाच्या अखेरीस हेमाडपंत नांवाचा एक शहाणा ब्राम्हण त्याचा मुख्य प्रधान होता. या हेमाडपंतानें मोडी लिपि दक्षिणेंतून आणिली. महाराष्ट्रमंडळांत जे प्राचीन काळीं लिहिणार लोक असत, त्यांस "परबु" किंवा 'परबु' म्हणत. या शब्दाचा मुळचा अर्थ "पढविणारा" होय हेमाडपंतानें मोडी लिपि आणिल्यामुळें पुष्कळ नवीन ब्राम्हणांस महाराष्ट्रमंडळांत येण्यास व वसाहत करण्यास सवड सांपडली असावी. हेमाडपंतानें हेमाद्रि नांवाचा एक अफाट ग्रंथ धर्मशास्त्रावर करविला, त्यांत दानादिकांचें माहात्म्य पुष्कळ वर्णन केलेलें आहे. श्रीमद्भागवत हें वोपदेवानें केलें, व वोपदेवास हेमाडपंताचा आश्रय होता, असा प्रवाद आहे, हें जर खरें असलें, तर हेमाडपंत शुद्ध कर्मठ नसावा.

महाराष्ट्र ब्राह्मणांमध्यें आर्यपणाचा अंश फारच कमी असला पाहिजे. संस्कृत नांव पावलेली भाषा व प्राचीन मऱ्हाठी या दोहोंमध्यें कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता. संस्कृतामध्यें व मऱ्हाठीमध्यें कित्येक शब्दांच्या संबंधानें सादृश्य आढळतें, तें ज्या मानवी रूपापासून संस्कृतास मदत झाली, त्याच मानवी रूपापासून मराठीस मदत झाली, म्हणून आढळतें. ज्या काळीं संस्कृत होतें, त्या काळीं प्राकृतही होतें, याचा उल्लेख पूर्वी करण्यांत आला आहे. तेव्हां संस्कृत नांव पावलेल्या भाषेमध्यें व मऱ्हाठीमध्यें थोडें बहुत सादृश्य आहे, म्हणून जी मऱ्हाठी भाषा महाराष्ट्रमंडळांतील आचांडाल लोक बोलतात, ती संस्कृतापासून निघालेली व महाराष्ट्रमंडळांतील ब्राह्मण हे सर्व आर्यावर्तातील ब्राह्मणांचे वंशज, असें समजण्याची जरूरी नाहीं तेलंगी वगैरे ब्राह्मण जातीचे द्रविड होत. द्रविड लोक कांहीं आर्यांची संतति नव्हत व द्रविड लोकांची भाषा ज्या भाषेपासून संस्कृत भाषा निघाली त्या भाषेपासून निघालेली नव्हे, या विषयीं तर शंका नकोच. तरी तेलंगी वगैरे लोक ब्राह्मणी धर्मांत येऊन व ब्राह्मण बनून पुष्कळ वर्षे झालीं, म्हणून ते आचारविचारानें तरी बरेच ब्राह्मण राहिले. बकऱ्याची सागुति खाण्याची तेलंगी ब्राह्मणांनीं सोडून दिली, कारण त्यांच्यामध्यें ज्या काळीं ब्राह्मणी धर्माचा प्रसार झाला त्या काळीं ब्राह्मण म्हणविणाऱ्या त्यांच्या गुरूंनींच जैनांचा सहवास झाल्यामुळें यज्ञव्यतिरिक्त प्रसंगीं मांसत्याग केलेला होता. याप्रमाणें यज्ञव्यतिरिक्त प्रसंगीं भक्ष्यभेद राहिला, हें एक पूर्वीच्या जुनाट काळच्या ब्राह्मणांमध्यें व नवीन झालेल्या तेलंगणांतील ब्राह्मणांमध्यें मोठेंच अंतर राहिलें. तरी कांदा व लसूण यांच्यासारखे पदार्थ जे अतिनिषिद्ध पूर्वीच्या ब्राम्हणांनीं मानिले होते, ते तेलंगी वगैरे नवीन ब्राम्हणांनीं तसेच मानिले. कर्मठपणाकडेसही तेलंगी वगैरे ब्राह्मणांचा ओढा विशेष असतो. स्नानसंध्या करणें हाच काय तो असले ब्राह्मण परम पुरुषार्थ समजतात. ब्राह्मणेतर जातींस अस्पृश्य समजून त्यांचा तिरस्कार करणें व त्यांस निकृष्ट मानणें, हेंही एक या ब्राह्मणी धर्माचें मोठें लक्षण होय. हें लक्षण तेलंगी वगैरे ब्राह्मणांचे आंगीं बरेंच मुरलेलें असतें. तेव्हां तेलंगी वगैरे ब्राम्हणांचे आंगीं आर्यपणाचें लक्षण बरेंच वसत आहे, असें म्हटल्यास त्यांत कांहीं वावगें नाहीं. पण महाराष्ट्र ब्राह्मणांमध्यें तसें कांहीं फारसें दिसत नाहीं. महाराष्ट्र ब्राह्मणांमध्यें जर आर्यपणाचें लक्षण यत्किंचितूही वसत असतें, तर कांद्याकडेस व लसणीकडेस त्यांची प्रवृत्ति बिलकुल झाली नसती. खंडोबा ही मूळची निःसंशय अब्राह्मणी देवता होय. खंडोबास पूजा धनगराची असते. खंडोबा पुष्कळ महाराष्ट्र ब्राह्मणांचें कुळदैवत आहे, व ज्यांचें हा कुळदैवत आहे, त्यांचे घरीं चंपाषष्टीचे दिवशीं कांद्याची भाजी अवश्य झाली पाहिजे. कर्मठ ब्राह्मणांनीं अतिनिषिद्ध केलेला पदार्थ खाणें हें कांहीं कर्मठ ब्राह्मणांच्या शुद्ध संततिपणाचें लक्षण नव्हे. जर कर्मठ ब्राह्मणांचें शुद्ध संततिपण खरोखरीच महाराष्ट्र ब्राह्मणांमध्यें असतें, तर वरील शास्त्रदृष्ट्या दुराचार त्यांच्यामध्यें

निःसंशय पडला नसता. ब्राम्हणेतरांच्या पायीं पडणें व चोखा मेळ्या सारख्या अतिशूद्राचें नांव घेऊन त्यास पावन करण्यास सांगणें, असलीं कृत्यें कर्मठ ब्राह्मणांच्या शुद्ध संततीपासून होणें, हें निदान आह्मीं तरी केवळ अशक्य समजतों. पण हें महाराष्ट्रमंडळांत आपण हमेश पहातों. यावरून महाराष्ट्रमंडळामध्यें कर्मठ फळी बिलकुल नाहीं, असें कोणी समजूं नये. ही फळी जशी पूर्वींच्या काळीं होती, तशीच हल्लींच्या काळींही महाराष्ट्र मंडळांत आहे. तरी पूर्वींच्या काळीं तरी बहुमत ब्रह्ममय फळीचें होतें, अशा समजुतीनें वरील लेख लिहिला आहे. महाराष्ट्रमंडळावर जे आजपर्यंत अविस्मार्य उपकार झाले आहेत, ते ब्रम्हमय फळींतील ब्राह्मणांचेच होत. ब्रह्ममय ब्राह्मणांची फळी व कर्मठ फळी या दोहोंमध्यें शाश्वतिक विरोध असून, दुसरी फळी अस्सलची व पहिली इतर लोकांच्या सत्संगानें उत्पन्न झालेली, असा लेख पूर्वीं येऊन गेला आहे. बारा वर्षे अध्ययन करावें, तेव्हां विवाहाचा अधिकार पूर्वींच्या काळीं शास्त्रानें येई. पण हल्लींचा महाराष्ट्रमंडळांतील संप्रदाय सर्वांस सुविदित आहे. सारांश, महाराष्ट्र ब्राह्मणांमध्यें विचारा अंतीं आर्यपण निदान आह्मांस यत्किंचित्‌ही दिसत नाहीं.

१९—ब्राह्मणांची व ब्राम्हणी धर्माची हल्लींची स्थिति.

नुकत्याच निर्दिष्ट केलेल्या कारणांनीं आतां तरी ब्राह्मणी नांव धर्मास देणें हें केवळ शब्दाचा अपप्रयोग करणें होय. ब्राह्मणांनीं थोडा बहुत आपला अस्सलचा धर्म इतरांस दिला खरा. पण ज्या इतरांचा व त्यांचा संग होत गेला, त्यांनीं त्यांच्याच धर्मावर अनेक निशाण्या करून ठेविल्या आहेत. त्यामुळें ब्राह्मणांची जी इतरांवर छाया पडली आहे, तिच्यापेक्षां एका प्रकारें इतरांचीच ब्राह्मणी धर्मावर छाया विशेष पडली आहे. असें जर आहे, तर हिंदु धर्म हेंच नांव ब्राम्हणांच्या हल्लींच्या धर्मास साजेल.

ब्राह्मणी धर्माप्रमाणें ब्राम्हणच धर्मगुरु ठरणार. हिंदु धर्माप्रमाणें हवा तो हिंदु धर्मगुरु होऊं शकेल. ब्राह्मणी धर्म हल्लीं कांहीं जिवंत झऱ्याचें पाणी नव्हे. ज्या काळीं जाती अनैकांतिक होत्या, त्या काळच्या ब्राह्मणी धर्मास जिवंत झऱ्याचें पाणी समजण्यास हरकत नाहीं. पण जाती ऐकांतिक झाल्या दिवसापासून ब्राम्हणी धर्म कायमच्या ठशांनीं छापलेल्या हल्लींच्या विद्यालयांतील क्रमिक पुस्तकांप्रमाणें झाला, कारण त्यांत नव्या मुद्यांस व्यवहारदृष्ट्या जागा बिलकूल राहिली नाहीं. वर्णसंकराची कल्पना करून, चातुर्वर्ण्यरूपी कायमची व्यवस्था म्हणून ब्राम्हणांनीं लावून ठेविली, त्याच काळीं ब्राह्मणी धर्माच्या जिवंतपणावर पाणी पडलें. अनादि व अजरामर तत्त्वें जीं धर्मांत असतात, तीं स्वरूपतः पालटूं शकत नाहींत. पण मनुष्यकृत व्यवस्था असतात, त्या आज नाहीं तर उद्यां पालटायाच्याच पालटायाच्या. दैवी शक्ति केवळ अचिंत्य शक्तीची होय. मानवी शक्ति कितीही सशक्त असली, तरी ती दैवी शक्तीपुढें हटलीच पाहिजे. सारांश, अचिंत्य दैवी शक्तीचा अपलाप करून स्थापन केलेली व्यवस्था कधीं तरी ढांसळल्याशिवाय रहात नाहीं. या सार्वत्रिक नियमाचें आलंबन करून ऐकांतिक वर्णव्यवस्था झुगारून दिल्यामुळें बौद्ध धर्म व जैन धर्म या दोहोंसही भरतें लागलें. ब्रम्हमय ब्राह्मणी धर्मानें काल्पनिक सारखेपणा दुरोबस्त जातींचा कबूल केला खरा. पण त्यास "आरण्यकत्व" मिळाल्यामुळें, व्यवहार निराळा व सिद्धांत निराळा, अशी स्थिति झाली. ही स्थिति सर्वथैव शोच्य होय. निवृत्तमांसतेचा ब्राम्हणी धर्मामध्यें पुरा प्रवेश झाला, तेव्हां कांहीं बौद्ध व कांहीं जैन यांस ब्राम्हणी धर्मांत ब्राम्हणांनीं घेतलें, व शंकराचार्यांनींही पुष्कळांवर ब्राम्हणत्वाचा अनुग्रह केला, हें खरें. पण जे ब्राम्हण झाले ते कर्मठ ब्राम्हणांमध्यें घुसले; व आचारप्रधानता ब्राम्हणी धर्मास आल्यामुळें, काल्पनिक शुद्धता ठेवण्यासाठीं अब्राम्हणांपासून निराळे राहून, त्यांस निकृष्ट समजूं लागले. सारांश, व्यवहाराच्या संबंधानें पाहूं गेलें असतां कर्मठ ब्राम्हणांचाच व्यवहार दुरोबस्त ब्राम्हणांमध्यें पडलेला आहे, व त्यामुळें वर्णसंकराचा व्यवहारदृष्ट्या मोठा बाऊ होऊन राहिला आहे. पुढें ब्राम्हणांमध्यें मुलखावरूनही पोटभेद मानिले गेले, व कर्मठतेचा आदर करून एक पोटभेद दुसऱ्यास हलका मानूं लागला. नामदेवासारखे ब्राम्हणेतर होऊन गेल्यामुळें जरी ब्राम्हणांचें वर्णगुरुत्व सिद्धांतदृष्ट्या राहिलें नाहीं, तरी व्यवहारदृष्ट्या राहिलें. त्यामुळें इतर जातींनींही ब्राम्हणांचेंच कित्ता उच-

लेला, व जसे ब्राह्मणांमध्यें तसे त्यांच्यामध्येंही पोटभेद होऊन बसले. ब्राह्मण व क्षत्रिय यांचा कन्याव्यवहार झाल्यास वर्णसंकर नांव साजेल तरीपण जगद्धितेच्छु (?) सारखीं वर्तमानपत्रें पुण्यांत आहेत, तीं देशस्थ ब्राम्हण व चित्पावन ब्राम्हण यांच्यामध्यें शरीरसंबंध झाल्यास वर्णसंकर समजणार. जर इंग्रज सरकारचें राज्य न होतें, तर देशावरील चित्पावन व कोंकणांतील चित्पावन या दोहोंमध्येंही बेटीव्यवहार बंद पडून एकमेकांस निरुष्ट समजण्याचा प्रसंग निःसंशय येता. कोंकणस्थ क्षत्रियांनीं ब्राह्मणांचें अनुकरण करून आपणांमधील पाट लावण्याची चाल बरेच ठिकाणीं मोडून टाकिली, व त्यामुळें देशस्थ क्षत्रियांपेक्षां आपण अधिक उंच झालों, असें ते समजतात. महाराष्ट्र मंडळांतील वाण्यांची, वणजाऱ्यांची व माळ्यांची अशीच स्थिति झाली आहे. ते आमच्याकडेस जेवितात, पण आम्ही त्यांच्याकडेस जेवीत नाहीं, असें जो तो ठांसून सांगतो. अशी स्थिति हल्लीं ब्राह्मणांची व ब्राह्मणांच्या संगतीनें दुरोबस्त हिंदु लोकांची झाली आहे. जोंपर्यंत वाचा व वृत्ति या दोहोंमध्यें संवाद पडला नाहीं, तोंपर्यंत ही स्थिति अशीच राहून हिंदूंमधील फूट मात्र वाढत जाईल.

महाराष्ट्रमंडळ हें एक घर असून, जितके ह्मणून लोक महाराष्ट्रभूमीचें पयःपान करीत आहेत, तितकीं सर्व सख्खीं भावंडें होत, असा प्रत्येकाचा समज झाला पाहिजे. पण हा समज तर दूर राहूं द्या. जे आपण सर्व हिंदु धर्माचे ह्मणवितों, त्या आपणांमध्यें प्रत्येक लहान लहान जात आपणास उंच समजते; व दुसऱ्या जातीस नीच समजते. सुशिक्षित लोकांमध्यें बाहेरून परजातीयांबरोबर वाचेनें समदृष्टिपणा दाखविणारी मंडळी बरीच आहे. पण अंतःकरण शुद्ध नसल्यामुळें त्यांची वाचा व कृति या दोहोंमध्यें अनेक प्रसंगीं विसंवाद पडतो, व त्यामुळें तिऱ्हाइतास जातिद्वेषाची बळकट शंका येते. अशा प्रकारें शंका येण्यासारखें पुढारी झालेल्या किंवा होऊंपहाणाऱ्या मोठ्या लोकांनीं आचरण करणें हें कांहीं धर्मबंधुत्वाचें किंवा देशबंधुत्वाचें लक्षण नव्हे. इतकी बंधुप्रीति ज्या लोकांमध्यें असेल, त्यांस पूर्वी कधींही बरकत आलेली असण्याचा संभव नाहीं, व पुढेंही यावयाची नाहीं. सुंभानें हत्तीस बांधतां येतें; पण त्यांतील एकच तंतु घेतला, तर हत्ती त्यास सहज तुडवून टाकील. सुंभामध्यें इतके तंतु असतात, त्यांत वरचा कोणता व खालचा कोणता? वर असतो तो वरचा, व खालीं असतो तो खालचा. जसा तंतूंचा वरचेपणा व खालचेपणा कायमचा करून ठेविण्यांत अर्थ नाहीं, तसाच देशरूपी सुंभाचे तंतभूत जे दुरोबस्त जातींचे लोक त्यांचा वरचेपणा व खालचेपणा कायमचा करून ठेवण्यांत हांशील नाहीं. ब्राह्मणास शूद्र जातीचीही मुलगी भार्या विहित आहे, हा लेख पूर्वी येऊन गेला आहे. तेव्हां "गृह्य" धर्माचे काळीं वर्णसंकराची कल्पना निःसंशय नव्हती. पुढें स्मार्त काळीं ही वर्णसंकराची कल्पना निघालेली दिसते. तेव्हां ब्राह्मणी धर्माचें कर्मठ रूप देखील वर्णसंकराविरुद्ध आहे, असें विचाराअंतीं म्हणतां येत नाहीं. तरी रूढि सर्वतोमुख बलवत्तर होऊन बसल्यामुळें आह्मां ब्राह्मणांची व आह्मांबरोबर इतर हिंदूंचीही अत्यंत शोच्य स्थिति होऊन गेली आहे. युगांतरचे ब्राह्मण फारच स्वधर्मनिष्ट व तपस्वी होते, असें ब्राह्मणांचेच ग्रंथ सांगतात. असें असतांही युगांतरीं पराशराच्या कोळणीपासून झालेल्या पुत्रास ब्राह्मणत्व मिळालें. युगांतरीं शापादिकांमुळें देवादिकांस मनुष्ययोनींत जन्म घ्यावा लागे, असें ब्राह्मणांच्या ग्रंथांत आढळतें. स्वधर्मनिष्टपणा व तपस्विपणा विशेष होता, अशा काळीं देखील जर ब्राह्मणत्व आईकडून इतरजातीय असणारास मिळत असे, तर बोलून चालून अधर्मनिष्ठपणा वाढविणाऱ्या या युगांत सूट निःसंशय अधिक असली पाहिजे. पूर्वींचे देवही तेच आहेत. जसा शापादिकामुळें देवादिकांस मनुष्यादि योनींमध्यें युगांतरीं जन्म घ्यावा लागत असे. तसा या युगींही जन्म घेऊं लागण्याचा संभव आहे. जसे विदुरादिक पूर्वींच्या काळीं होऊन गेले, त्यांच्या घरीं साक्षात् श्रीकृष्णानें दुर्योधनाच्या घरचीं पक्वान्नें सोडून कण्या झोडिल्या, तसेच या युगींही विदुरादिक जन्मण्याच्या संभव आहेच. रामचंद्रांनें भिल्लिणीचीं उष्टीं बोरें निःशंक खाल्लीं. स्नेह व भक्ति हे दोन गुण जसे युगांतरीं होते, तसे या युगींही असण्याचा संभव आहे. "कलि युगासारखें युग नाहीं, कारण नाममात्रानें काम होतें व यज्ञादिक जाड्या खटपटीची गरज पडत नाहीं"

असें भागवतकर ह्मणतात. महाराष्ट्रमंडळांतील ब्राह्मणांमध्यें कांदा व लसूण खाण्याची व क्षत्रियांमध्यें पाटाची, अशा सर्वथैव शास्त्रनिषिद्ध चाली पडून गेल्याचीही चांगलीं उदाहरणें देतां येतात.

सारांश, रूढी पडलेल्या असतील त्या अन्यथा पाडण्यास हिंदु धर्माची आडकाठी बिलकूल नाहीं. ब्राह्मण आहेत ते आपणांस हिंदु ह्मणवितात, त्यापक्षीं हिंदु धर्मांत ब्राह्मणी धर्माचा समावेश झालाच आहे. हिंदु धर्म हा हल्लीं जागता धर्म आहे. पाणी जिवंत असतें तोंपर्यंत त्याचा गढूळ झालेला थर वाहून जाण्याचा व गढूळ झालेल्या थराची नवीन स्वच्छ पाण्याच्या थरानें जागा बळकाविण्याचा क्रम चाललेला असतो. हिंदु धर्मही हल्लीं जिवंत धर्म आहे. वयाच्या मानानें आपल्या बहिरंग शरीरांत पुष्कळ पालट झाला, तरी अंतरंग आत्मा निर्विकार असतो. पालट होतो तो केवळ बहिरंगांत होतो, अंतरंगांत कधींही होत नाहीं. ब्राह्मणी धर्म पूर्वी दर्शविल्याप्रमाणें मुळेंचच अठरा धान्यांचें कोंडबोळें होय. हा त्याचा कोंडबोळेपणा हिंदु धर्म या नांवाचा आरोप झाल्यापासून विशेष वाढला आहे. दरोबस्त जाती जसजशा एकमेकांत मिसळत जातील,तसतसा हिंदु धर्माचा पाया निःसंशय अधिकाधिकमजबूत होईल.शेतांतील जमिनीची उचावचता ठेवून जर बियाणें पेरलें,तर पुष्कळ बियाणें फुकट जातें व शेत चांगलेंसें पिकत नाहीं.पण डिफळें असतील तीं खेंगऱ्यानें फोडून जर सर्व सपाट पूर्वी केलें, व नंतर बीजारोप केला,तर कुचें खाईना इतकेंही धान्य पिकतें. महाराष्ट्रमंडळरूपी शेतांतील लोकरूपी जमीन जितकी अन्नोदकाच्या संबंधानें व वैवाहिक संबंधानें सपाट होईल व केवळ कृत्रिम उचावचता टाकून देईल, तितकें ऐश्वर्याचें बीं पेरल्यास ऐश्वर्य दाट उगवेल. सगोत्र मुलीबरोबर विवाह करण्याचा निषेध शास्त्रकारांनीं केला आहे,त्याचेंही रहस्य हेंच आहे. निराळें गोत्र असल्यानें संततीमध्यें अपूर्व गुण येण्याचा संभव विशेष असतो. अशाच समजानें ब्राह्मणादिकांस असवर्ण भार्यांचें विधान सूत्रकारांनीं केलेलें दिसतें. पंचामृताचा समंगपणा नुसत्या गुळांत, नुसत्या चिंचेंत, नुसत्या मेथ्यांत, नुसत्या मिरच्यांत किंवा नुसत्या मिठांत निःसंशय नसतो, हें महाराष्ट्रमात्रास माहीत आहेच.

सारांश, कित्येक रूढी पूर्वी प्रचारांत असून त्यांचा हल्लीं लोप झाला आहे. पूर्वी ब्राह्मणांमध्यें व तदनुयायांमध्यें असण्याचा संभव बिलकुल नाहीं, अशाही रूढी हल्लीं दोहोंमध्येंही दृष्टिगोचर होतात. ज्या रूढींचा लोप झाला असेल त्या पुनः अंमलांत आणिल्या किंवा ज्या पूर्वी नसतां हल्लीं दृष्टिगोचर होतात त्या तशाच कायम ठेविल्या व ज्या स्वजातींत नसतील त्या दुसऱ्या जातींतून उचलून घेतल्या, ह्मणजे आमच्या या परम प्रिय ब्राह्मणी धर्मासारखा किंवा वैदिक धर्मासारखा किंवा हिंदु धर्मासारखा धर्म या भूपृष्ठावर नाहीं. आपल्या धर्मांत जो पंचामृतपणा सिद्धांतदृष्ट्या आहे, तोच लोकांमध्यें व्यवहारदृष्ट्या आणिला, ह्मणजे काम झालें.

## १६—उपसंहार.

आतां मी या "क्लब" चा सभासद नसतांही मला "क्लब"नें हा निबंध वाचायास परवानगी दिली, ह्मणून " क्लब " चे व " क्लब " च्या संमाननीय अध्यक्षांचे फार फार आभार मानून, हा नवीनच सोडलेला " स्कंध " बांधतों.

पण हा " स्कंध " बांधण्याचे पूर्वी या विषयाच्या संबंधानें होणाऱ्या वादविवादास उद्देशून दोन शब्द बोलणें जरूर दिसतें. कोणास तोंडीं वादविवाद करणें असल्यास तो आज अध्यक्षांच्या परवानगीनें खुशाल करावा. पण मजकडून तोंडीं जबाब मिळणें नाहीं. जर वादविवाद वर्तमानपत्रद्वारा झाला, तरच मजकडून लेखी जबाब वर्तमानपत्रद्वारा किंवा स्वतंत्र रूपानें मिळण्यास तिळभरही आळस होणार नाहीं. आतां हें खरें आहे कीं येथील कित्येक वर्तमानपत्रांची स्थिति फारशी अभिनंदनीय नाहीं. एखाद्या " क्लब "च्या विरुद्ध किंवा देशी भाषांच्या विरुद्ध पत्रव्यवहारास सहज जागा मिळून निंदा केलेल्या " क्लब " च्या बाजूचा पत्रव्यवहार आल्यास त्याच्या पोंचेस देखील जागा मिळूं नये किंवा पोंचेसाठीं तगादा लागेल तेव्हांच देशी भाषांच्या बाजूचा मजकूर यावा, अशी सार्वजनिक ह्मणविणाऱ्या बऱ्याच वर्तमानपत्रांची अलीकडेस झालेली स्थिति सर्वथैव शोच्य होय. पण नेटिव ओपिनियनचें अलीकडील वर्तन तरी तसें दिसत नाहीं. तेव्हां नेटिव ओपिनियन दोन्ही बाजूंच्या पत्रव्यवहारास निःसं-

शय स्थळ देईल. ह्मणून तोंडीं वादविवाद करण्यास उभें राहण्याची ज्या कोणाची इच्छा असेल, त्यांनीं या विषयाच्या संबंधानें आज उगाच तोंडाची वाफ न घालवितां, लेखी वादविवाद रूपा करू वर्तमानपत्रद्वारें चालवावा, अशी त्यांस माझी करद्वय जोडून सविनय विनंती आहे.

# आधार.

-:*:-

उ

ब्राह्

यां

पदू "सरस्वतीदृषद्वत्योर्देवनद्योर्यदंतरं । तं देवनि-
र्मितं देशं ब्रह्मावर्तं प्रचक्षते ॥ १७ ॥ तस्मिन् देशे य
पाडारः पारंपर्यक्रमागतः । वर्णानां सांतरालानां स
ब्राह्चार उच्यते ॥ १८ ॥ कुरुक्षेत्रं च मत्स्याश्च पां-
त्याः शूरसेनकाः । एष ब्रह्मर्षिदेशो वै ब्रह्मावर्तादनं-
लाः ॥ १९ ॥ एतद्देशप्रसिद्धस्य सकाशादग्रजन्मनः ।
पार्णं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥ २० ॥
झालेःद्रात्तु वै पूर्वादासमुद्रात्तु पश्चिमात् । तयो-
थरास्त्वद्रिंध्ययो ) रेवांतरं गिर्योरार्यावर्तं विदुर्बुधाः"
काबि ॥ ( अध्याय २, मनुस्मृति ).
जिवंतसूत्र १, कंडिका १५; सूत्र १, कंडिका १७;
रंग शर ४० , कंडिका १९–अध्याय १०, लाट्या-
त्मा निसूत्र.
रंगांत दृहिले पन्नास श्लोक, अध्याय १०, मनुस्मृ-
धर्म पूर्वी
चें कोंडचा बहिष्कृता हिमवता गंगया च बहिष्कृताः ।
र्म गां नां यमुनया कुरुक्षेत्रेण चा प्रिया ॥ ६ ॥ पंचा-
आहे. दरो नां नदीनां येऽतरा श्रिताः । तान् धर्म-
जातील, तान् वाहीकानपि वर्जयेत् ॥ ७ ॥ पंच नद्यो
काधिकमज यत्र पीलुवनान्युत ॥ ३१ ॥ शतद्रूश्च वि-
टेवून जर तीयेरावती तथा । चंद्रभागा वितस्ता च
न शेत चां हिर्गिरिः ॥ ३२ ॥ आरट्टा ( Herat ) ना-
म ते दश। नष्टधर्मा न तान् व्रजेत् ॥ ३३ ॥ पंच न-
द्यो वहंत्येता यत्र निःसृत्य पर्वतात् ॥ ४० ॥ आरट्टा
नाम वाहीका न तेष्वार्यो द्व्यहं वसेत् । बहिश्च नाम
ह्लीकश्च विपाशायां पिशाचकौ ॥४१॥ तयोरपत्यं वा-
हीका नैषा सृष्टि : प्रजापतेः" ॥ ४२ ॥ अध्याय ४३,
कर्णपर्व.

५. "प्राच्यां दिशि ये केच प्राच्यानां राजानः साम्राज्यायैव तेऽभिषिच्यन्ते सम्राळित्येनानभिषिक्तानाचक्षते...दक्षिणस्यां दिशि ये केच सत्त्वतां राजानो भौज्यायैव तेऽभिषिच्यन्ते भोजेत्येनानाभिषिक्तानाचक्षते...ये केच नीच्यानां राजानो येऽपाच्यानां स्वाराज्यायैव तेऽभिषिच्यन्ते स्वराळित्येनानभिषिक्तानाचक्षते...ये केच परेण हिमवंतं जनपदा उत्तरकुरव उत्तरमद्रा इति वैराज्यायैव तेऽभिषिच्यन्ते विराळित्येनानभिषिक्तानाचक्षते...तस्मादस्यां ध्रुवायां मध्यमायां प्रतिष्ठायां दिशि ये केच कुरुपंचालानां राजानः सवशोशीनराणां राज्यायैव तेऽभिषिच्यन्ते राजेत्येनानभिषिक्तानाचक्षते"—खंड १४, अध्याय ३, पंचिका ८.

६. "त एतेऽध्राः पुंड्राः शबराः पुलिंदा मूतिवा इत्युदंत्या बहवो भवंति वैश्वामित्रा दस्यूनां भूयिष्ठाः" खंड १७, अध्याय ३, पंचिका ७, ऐतरेय ब्राह्मण. "ततः पुंड्राधिपं वीरं वासुदेवं महाबलम् । कौशिकीकच्छनिलयं राजानं च महौजसम् " ॥ श्लोक २२ ॥ अध्याय ३०, सभापर्व.

७. "जित्वोर्वी कन्यकुब्जाद्यां तत्रत्यं स (जलोका) न्यवेशयत् । चातुर्वर्ण्यं निजे देशे धर्म्यांश्च व्यवहारिणः ॥ ११७ ॥ यथावद् वृद्धिमप्राप्तं व्यवहारधनादिभिः सामान्यदेशवद् राज्यं तावदस्मिन् हि मंडले" ॥११८॥ तरंग १, राजतरंगिणी.

८. अध्याय ९४, विष्णुपर्व, हरिवंश (कलकत्त्याचा)

९. स वा एष पशुरेवाऽऽलभ्यते यत् पुरोळाशस्तस्य यानि किंशारूणि तानि लोमानि ये तुषाः सा त्वग् ये फलीकरणास्तदसृग् यत्पिष्टं किक्नसास्तन्मांसं यत किंचित् कंसारं तदस्थि सर्वेषां वा एष पशूनां मेधेन यजते यः पुरोळाशेन यजते"—खंड ९, अध्याय १, पंचिका २. याच अध्यांतील आठवें खंडही साद्यंत पहा.

१०. सगळा ४ था प्रपाठक, कांड ३, तैत्तिरीय ब्राह्मण.

११. अध्याय ३, पंचिका ७, ऐतरेय ब्राह्मण.

१२. अध्या० २६, हरिपर्व, हरिवंश, (कलकत्त्याचा ).

१३. "The Persians have learnt from the Arabians and Assyrians to sacrifice to Venus, whom the Assyrians call Mylitta,

the Arabians Alitta and the Persions Mitrapara" 131, Book I, Carey's Herodotus.

१४. "होत्राभ्यश्छः"—१३५ सूत्र, १ पाद, ५ अध्याय.व होत्राशब्द ऋत्विग्वाची स्त्रीलिंग":-कौमुदी.

• १५. "All Ægyptians alike pay a far greater reverence to cows than to any other cattle. So that no Egyption man or woman will kiss Grecian on the mouth ; or use the knife, spit, or caldron of a Greekpara" 41, Book II, Carey's Herodotus.

१६. "Odin was always imagined to be riding in eight-legged horses, Frigga is represented as seated in a chariot drawn by cows ; horses being sacred to him and cows to her"—p. 55, vol I, Menzel's History of Germany.

१७. प्रवराध्याय आश्वलायन श्रौतसूत्राचा पहा.

१८. "मधुचभ्रवोर्ब्राह्मणकौशिकयोः"—१०८सू०, ४ पाद, ४ अध्याय.

१९. "पौराहित्यान् राजन्यविशाम् "—प्रवराध्याय, आश्वलायन श्रौतसूत्र.

२०. सूक्त १ व २, वामदेवमंडल ऋग्वेद संहितेचें "अधा मातुरुषसः सप्त विप्रा जायेमहि प्रथमा वेधसो नॄन्। दिवस्पुत्रा अंगिरसो भवेमाद्रिं रुजेम धनिनं शुचंतः" ही ऋचा विशेष पहा.

२१ कंडिका ६, प्रपाठक ८, लाट्यायन श्रौतसूत्र. ही दरोबस्त कंडिका या विषयाच्या संबंधानें मोठी महत्वाची आहे

२२. "अधर्मचर्यया पूर्वः पूर्वो वर्णो जघन्यं जघन्यं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ धर्मचर्यया जघन्यो जघन्यो वर्णः पूर्वं पूर्वं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ."

२३. "राजर्षीन् वा राज्ञां मानवैलपौरूरवसेति"—प्रवराध्याय, आश्वलायन श्रौतसूत्र.

२४. "Khshayathiya—Column I, Vol X. Jour. R. A. S. G. B. I.

२५ "शौनकादिभ्यश्छंदसि" १०६ सू०, पा०, ४ अध्याय.

२६. "व्यासवरुडनिपादचांडालबिंबानां चेति वक्तव्यं" हें "क्षुधातुरकङ् च" (९७ सू०, १ पाद ४ अध्याय) या सूत्रावरील वार्तिक पहा.

२७. कल्पसूत्राऽस्वतःप्रामाण्याधिकरण ( ११, १२, १३, पाद ३ अध्याय १, जैमिनि पूर्व मीमांसा ) पहा.

२८. "पुराणप्रोक्तेषु ब्राह्मणकल्पेषु"—सू०, ३ पा० ४ अध्याय.

२९. "शौनकादिभ्य छंदसि"—१०६ सू० पा० ४ अध्याय.

३०. "अग्निः पूर्वेभिर्ऋषिभिरीड्यो नूतनैरुत."

३१. "हौम्यं च मांसवर्जं कामं तु व्रीहियवतिलैः" विवाहप्रकरण आश्वलायनगृह्यसूत्र.

३२. "यासुट् परस्मैपदेषूदात्तो ङिच"

३३. "प्रकृतीनांच दिव्यानां बाल्हीकीं संप्रयोजयेत्" नाटकांतील भाषाविभाग, साहित्यदर्पण.

३४. रुद्रदामाचा शिलालेख No.XXII. Jour. B. B. R. A. S. पहा. "गोब्राह्मण" याच्या पुढील अक्षरें घासून गेलीं आहेत.

३५. "Priests, warriors, herdsmen, swine-herds, tradesmen, interpreters and pilots." para 164, Book II, Carey's Herodotus.

३६. "जात्युत्कर्षो युगे ज्ञेयः पंचमे सप्तमेऽपि वा" श्लोक ९६, आचाराध्याय, याज्ञवल्क्यस्मृति.

३७. "I think it safer to suppose *bar, seb* and *sur* to denote the same god"—Note 4, page 24, Rawlinsons Comment on Cuneiform Inscript. 1850.

३८. श्लोक १० सर्ग ६ विक्रमांकचरित.

३९. "सारस्वतमत्स्यमाध्यमिकाः"—गीति अध्याय १४, बृहत्संहिता.